नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

ऑगस्ट–सप्टेंबर १९६०

या अंकातील लेखक व कवि


पु. य. देशपांडे
कृष्णा चौधरी
भाऊ मांडवकर
प्रसन्नकुमार पाटील
बाळाचार्य खुपेरकर
गणपतराव बुटी
नारायण शास्त्री द्रविड
जयंत देवधर

★

मूल्य ५० नये पैसे

युगवाणी

य. देशपांडे संपादक



लो. टिळक पुण्यतिथि–निमित्त झालेल्या परिसंवादात समारोपाचे भाषण करीत असताना परमश्रेष्ठ राज्यपाल **श्री. श्रीप्रकाश.**

रंगमंचावर बसलेले-- डॉ. वा. वि. मिराशी, श्री. ना. रा. शेंडे, श्री. पु. य. देशपांडे श्री. श्री. गो. काशीकर

विदर्भ साहित्य संघ

साधारण सभेची सूचना

घटना नियम १० (आ) नुसार विदर्भ साहित्य संघाची साधारण-सभा रविवार दि. ९ ऑक्टोबर १९६० रोजी दुपारी ४ वाजता विदर्भ साहित्य संघाच्या नागपूर येथील केन्द्रीय कार्यालयातील गडकरी सभागृहात भरणार आहे. ह्या सभेपुढे पुढील विषय राहतील.

(१) मागील सभेचा अहवाल.

(२) १९५९–६० च्या आय–व्ययाचा ताळेबंद तक्ता.

(३) वि. सा. संघाच्या घटनेतील कलम २, कलम ४ (आ), कलम १० (ऊ) व कलम १९ (अ) यामध्ये "मध्यप्रदेश" शब्दाऐवजी "विदर्भ" असा शब्द घालणे

(४) वि. सा. संघाच्या घटनेत कलम १० (अ) मध्ये "एप्रिल ३०" या शब्दाऐवजी "जुलै ३१" असे शब्द घालणे.

(५) मराठी साहित्य महामंडळाच्या घटनेला संमति देणे व महामंडळाच्या स्थापनेस मान्यता देणे.

(६) अध्यक्षांच्या संमतीने येणारे इतर विषय.

टीप– गणपूर्तीच्या अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी त्याच जागी नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने भरेल.

दि. १ । ९ । १९६०
नागपूर १

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ.
(कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार)

अनुक्रमणिका

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयाकरिता मान्य झालेले)

युगवाणी

ऑगस्ट–सप्टेंबर १९६०

★ ★ ★

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

वर्ष १५] [अंक ५

कला : जीवन : समीक्षा : संस्कृति ऑगस्ट–सप्टेंबर १९६०

संपादकीय

रवींद्र जन्मशताब्दि समारोह

महाराष्ट्र राज्याचे समाजकल्याण मंत्री डॉ. नरवणे गेल्या महिन्यात येथे येऊन गेले. समाजकल्याण खात्याशी संलग्न अशा भरगच्च कार्यक्रमांच्या रामरगाड्यात त्यांनी महाकवि रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या जन्मशताब्दिनिमित्त पुढल्या वर्षी होऊ घातलेल्या राष्ट्रीय समारोहाचा प्रांतीय पातळीवर श्रीगणेशा केला. नागपुरातील अनेक विद्वान, साहित्यिक, लेखक व प्रतिष्ठित नागरिक यांची एक खास सभा भरवून केंद्रीच सरकारने पुरस्कारिलेल्या या राष्ट्रव्यापी समारोहाला महाराष्ट्रात कसा उठाव आणावा, याबाबत चर्चा होऊन वैदर्भीय विभागासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक, कादंबरीकार व पत्रपंडित श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति स्थापन करण्यात आली. शासनातर्फे केल्या जाणाऱ्या अनेक विराट् योजनांपैकी साहित्य, कला, शास्त्र व संस्कृति याबाबत फारच तोटक्या योजना हाती घेतल्या जातात. राष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास कितीहि महत्वाचा असला तरी साहित्य, कला व शास्त्र यांच्या आधारावर जी सांस्कृतिक जीवनमूल्ये जोपासली जातात, त्या मूल्यांचे अधिष्ठान जर जीवनाला लाभले नाही तर अब्जावधि रूपयांचा कसा चुराडा होतो, याचे विदारक चित्र राष्ट्रासमोर आज उभे झाले आहे.

तेरा वर्षांचा स्वातंत्र्योत्तर काल हा सांस्कृतिक जीवनमूल्यांच्या अध:पाताचाच काल म्हणून भावी भारताच्या इतिहासात नोंदला जाईल. इतक्या थोड्या अवधीत एवढा प्रचंड नैतिक व सांस्कृतिक अध:पात भारतीय इतिहासात कधीहि घडून आला असेल. असे वाटत नाही. या अध:पाताचा विचार करता त्याचे मुख्य कारण

असे दिसून येईल की, केवळ अर्थकारणाधिष्ठित अशा अर्थ–काम प्रवृत्तींना, धर्म–मोक्ष कारणांचे अधिष्ठान जर नसेल तर हजारो वर्षे जोपासिलेली सांस्कृतिक जीवनमूल्ये हा हा म्हणता कशी अर्थशून्य होऊन बसतात, याचे एक प्रात्यक्षिकच गेल्या तेरा वर्षात घडून आले आहे.

या नैतिक व सांस्कृतिक अध:पाताची जाणीव आता राष्ट्रीय नेत्यांनाहि होऊ लागली आहे, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट आहे. पण स्वातंत्र्योत्तरकालीन सरकारी यंत्रणाच अशी काही होऊन बसली आहे की, तिच्या हाती सोने जरी दिले तरी त्याची हा हा म्हणता माती होऊन जावी. याचे एक नमुनेदार उदाहरण म्हणजे गेल्या दोन तीन वर्षापूर्वी महात्मा बुद्धांची २५०० वी जयंति केंद्रीय सरकारने अवाढव्य व भव्य प्रमाणात जी साजरी केली, तिचे देता येईल. या जयंतिसाठी सुमारे दोन कोटी रुपये खर्च करण्यात आले. काही पुरातन बुद्धस्थानांचे पुनरुज्जीवन वगळल्यास हा अवाढव्य खर्च कोणत्या सत्कारणी लागला, असा प्रश्न केल्यास भयानक उद्वेग व दारुण निराशाच पदरी पडते. जीवनाचे स्वानुभवनिष्ठ यथार्थज्ञान व निष्कलंक नीतिमत्ता याचा प्रतिभाशालि संदेश देणारे भगवान् बुद्ध जर हा आमचा राष्ट्रीय समारोह पाहण्यास जातीने हजर राहिले असते, तर त्यांना काय वाटले असते? बुद्धप्रणीत अष्टांगिक मार्गातील (१) सम्यक् दृष्टि, (२) सम्यक् संकल्प, (३) सम्यक् वचन, (४) सम्यक् कर्मान्त, (५) सम्यक् आजीविका, (६) सम्यक् व्यायाम (प्रयत्न), (७) सम्यक् स्मृति, आणि (८) सम्यक् समाधि, या अष्टगुणापैकी कोणत्या गुणाचे बीजारोपण या दोन कोटींच्या खर्चामुळे घडून आले?

समारोह कसा करावा ?

केंद्रीय शासन पुरस्कृत सांस्कृतिक समारोहाचा हा नमुना पाहिला म्हणजे महाकवि रवींद्रांच्या जन्मशताब्दि समारोहाचीहि तीच गत तर होणार नाही ना, अशी शंका कोणास आल्यास एका सत्कार्याची ती व्यर्थ कुचेष्टा आहे, असे आता म्हणता येणार नाही. हा रवींद्र–समारोह कसा साजरा करावा, याची रूपरेखा श्री. भाऊराव माडखोलकरांच्या अध्यक्षतेखाली स्थापित झालेली समिति आखीलच. अर्थात् ही विदर्भापुरतीच योजना असली तरी निदान या आपल्या विदर्भात तरी महाकवि रवींद्रांच्या पुण्यस्मृतीपायी कोणत्याहि अनिष्ट व केवळ दिखाऊ भपके-बाजपणाच्या गोष्टीसाठी व्यर्थ पैशाचा चुराडा केला जाणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, अशी आपण आशा करू या.

महाकवि रवीन्द्रनाथाकडून भारताला व जगाला मिळालेली सांस्कृतिक देणगी इतकी भव्योदात्त आहे की, निदान या देणगीची विटंबना केली जाणार नाही, एवढे जरी साधले तरी राष्ट्रावर व महाकवि रवींद्रांवर ते उपकारच मानावे लागतील. रवींद्रकाव्य, रवींद्रनाटच, रवींद्रकथा, रवींद्रतत्वज्ञान, रवीन्द्र-जीवननिष्ठा इत्यादींचा

अनुक्रमणिका

परिचय बहुजनसमाजाला विशुद्ध रूपात प्रभावी रीतीने, प्रामाणिकपणे करून दिला जाईल व त्यांच्या जीवनसंदेशाचे बीजारोपण निदान उगवत्या पिढीत तरी यथायोग्य रीतीने केले जाईल, अशा स्वरूपाची योजना झाल्यास त्या कामी झालेला खर्च सत्कारणी लागला असे म्हणता येईल. अर्थात् हे काम वाटते तितके सोपे नाही. या कामाचा नाटकी देखावा सहज घडवून आणता येईल. पण हे कार्य म्हणजे परममंगल असे धर्मकार्य आहे, असे मानून गांभीर्याने, प्रामाणिक उत्साहाने व अंत:करणाच्या तळमळीने ते केले गेल्यास वर्तमान अध:पतित समाजजीवनावर अस्सल व चिरंतन सांस्कृतिक मूल्यांचे थोडेबहुत तरी लेणे चढविले जाईल. पण हे घडून येण्यासाठी सरकारी यंत्रणेला पश्चात्तापदग्ध अशी अतिविनम्र भूमिका घेण्याची सत्बुद्धि झाली पाहिजे. ज्या महाकवीच्या पुण्यस्मृतीला आम्ही उजळा देऊ पाहत आहोत त्या रवींद्रांची जीवननिष्ठा आमच्या स्वत:कडून तरी यापुढे कलंकित केली जाणार नाही आणि या जीवननिष्ठेचे व्रत अद्यापहि चालविणारे अस्सल साहित्यिक, कलावंत, शास्त्रज्ञ व तत्वज्ञ असे जे विख्यात वा अविख्यात लोक असतील त्यांनाच या समारोहात प्राधान्य देऊन त्यांच्या पौरोहित्याखालीच हा समारोह विनयशील संयमाने व अभिजात सौंदर्याने पार पाडला जाईल, अशी दक्षता घेण्यात आली पाहिजे. आणि यासाठी जे जे करणे आवश्यक आहे ते ते करण्याची तयारी शासकीय यंत्रणेने व मंत्र्यांनी दाखविली पाहिजे.

रवीन्द्र नाटचगृहे

या समारोहानिमित्ताने केंद्रीय सरकारने देशातील सर्व राज्यांच्या राजधानीच्या नगरात सुसज्जित नाटचगृहे उभारली जावी, यासाठी देणग्या देण्याचे ठरविले आहे. संकल्पित समारोहाचा हा एक त्यातल्या त्यात स्वागतार्ह भाग आहे, असे म्हणता येईल. पण या बाबतीत नागपूर नगराच्यावतीने एक सूचना आम्हाला करावीशी वाटते. नागपूर हे कालपरवापर्यंत राजधानीचे शहर होते. राजधानी गेली म्हणून नगरात अद्यापहि फार मोठा असंतोष धुमसत आहे. हा असंतोष ध्यानात घेऊनच नागपुरला पर्यायी (alternate) राजधानीचा मान देण्याचा संकल्प नव्या महाराष्ट्र शासनाने अधिकृतरीत्या प्रकट केला आहे. हे सर्व ध्यानात घेऊन नागपुरला विदर्भ साहित्य संघाने जे एक भव्य नाटचमंदिर उभारले आहे त्याचे काम पूर्ण करण्यासाठी अद्याप लाखदीडलाख रकमेची आवश्यकता आहे. नागपुरचे पूर्वीचे राजधानीपद संपुष्टात आणले गेले नसते तर ही रकम वि: सा. संघाला सरकार व धनिक लोक यांच्याकडून सहज प्राप्त करून घेता आली असती. हे अपुरे कार्य पुरे करण्याची जबाबदारी आपलीच आहे असे नव्या महाराष्ट्रराज्याने मानले पाहिजे व वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिराचे अपुरे राहिलेले काम पूर्ण केले पाहिजे. विसर्जित मुंबई राज्याने या कार्याला हातभार लावला होता. पण नव्या

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्याने या हातभारावर कळस चढविण्याचे कार्य रवींद्र–स्मारोहाच्या निमित्ताने केले पाहिजे, असे आम्हास वाटते. समारोहाची वैदर्भीय समिति ही सूचना आपलीच मानून ती कार्यान्वित करून घेण्यात यशस्वी होईल, अशी आम्ही आशा करतो.

ही सूचना प्रत्यक्षपणे अमलात येण्याच्या मार्गात काही तांत्रिक अडचणी पुढे केल्या जाण्याचा संभव आहे. पण 'इच्छा असली तर मार्ग सापडतोच,' या सुभाषितात ग्रथित झालेल्या दृष्टीने या सूचनेकडे पाहिल्यास सर्व संभाव्य अडचणी कशा दूर साराव्या, हे सहज आकळून येईल. कोणत्याहि सत्कार्याच्या बाबतीत तांत्रिक अडचणी निर्माण करण्यात व त्यावरच अडून बसण्यात मुंबई राज्य–यंत्रणेचा हातखंडा आहे; आणि हा अडवणुकीचा गुणच दक्षतेचा (efficiency चा) गमक मानण्यात पंतप्रधानापासून बहुतांश राज्यमंत्र्यांनीहि पुढाकार घेतलेला आहे. याची आम्ही केलेल्या सूचनेबाबत पुनरावृत्ति होणार नाही, अशी आम्ही आशा करतो.

– संपादक

★ ★ ★

मर्म

काजळले नभ
अंकुरले तृण
आज माझे मन
हसू लागे

इंद्रधनुष्याची
माझ्या मना साथ
निःशब्दाची कात
झडलेली

झडल्या कातीत
झाला पुनर्जन्म
जीवनाचे मर्म
उमजले

जयन्त देवधर

पुनर्जन्म झाला तर ?

लेखक : पु. य. देशपांडे

पुनर्जन्म झाला तर ?- हा प्रश्न फार चमत्कारिक आहे. जन्म आणि मरण, आपल्या स्वाधीनचे नसते, असा आपला सामान्य अनुभव आहे. मी जन्मास का आलो, कसा आलो, हे मला माहित नाही. आणि मी मरणार कसा व केव्हा, हेहि मला माहित नाही. पण मी मरणार हे निश्चित आहे. कारण जन्मास आलेले प्राणी हे अमर नसतात, अशी इतिहासाची साक्ष आहे. कमी-अधिक कालावधीचे जीवन जगून मरणात विलीन होणे, हे सर्व प्राण्यांचे विधिलिखितच आहे. मरण बरोबर घेऊनच प्राणी जन्मास येत असतो. जेथे जेथे जन्म तेथे तेथे मरण हे असतेच. म्हणून मरणाइतके निश्चित असे जीवनात दुसरे काहीच दिसून येत नाही. पण मरण हे इतके निश्चित व अटळ असले तरी त्याच्या विस्मृतीवरच आपण सारे आपले जीवन जगत असतो. उलट, मरणाची स्मृति क्षणाक्षणास जिवंत ठेवून, त्याची यत्किंचितहि भीति न वाळगता जीवन जगणे हेच वास्तवतानिष्ठ असे जगणे म्हणता येईल.

न सुटलेली कोडी

जन्म आणि मरण ही दोन्ही अद्याप न सुटलेली अशी कोडी आहेत. आधुनिक विज्ञानाच्या विस्मयजनक प्रगतीनेहि या कोड्यांवर कसलाहि प्रकाश टाकलेला नाही. पण वस्तुस्थिति अशी आहे की, या कूटप्रश्नांवर प्रकाश पडल्या-शिवाय, जीवन म्हणजे काय, हे कळणे अशक्य आहे. आणि न कळता जीवन जगत राहणे म्हणजे काळाचाकुट्ट काळोखात ठोकरा खात राहणे होय.

भारतीय अध्यात्मविद्येने मात्र या कूटप्रश्नांचाच विचार प्रामुख्याने केलेला आहे आणि त्यावर पुरेसा प्रकाशहि पाडलेला आहे. पण आम्हा आधुनिकांना त्या विद्येकडे लक्ष द्यावेसे वाटत नाही. आम्ही अध्यात्मविद्याविहीन अशा आधुनिक विज्ञानाने भारावले गेलो आहोत. पण व्यक्तिशः आपण आपल्या जीवनाकडे जरा चिकित्सक व केवळ साक्षी वृत्तीने पाहू लागलो तर जन्ममरणाचा काळाकुट्ट पडदा, किंचितसातरी विरळ होऊ लागतो आणि जीवन म्हणजे अखंड सळसळणारे, नित्य नवीन, असे सर्जनशील चैतन्य, याची साक्ष पटू लागते.

पुनर्जन्म मला नको

जीवनाकडे अशा दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न मी करीत आहे आणि या प्रयत्नाचा परिणाम असा होऊ लागला आहे की, पुनर्जन्माचे आकर्षणच मला वाटेनासे झाले आहे. म्हणून 'पुनर्जन्म झाला तर ?' या प्रश्नाचे काय उत्तर द्यावे, असा प्रश्न मला पडला आहे.

जे आपल्या हाती नाही, ते आपल्या इच्छेवरच अवलंबून आहे, असे गृहीत धरून बोलण्याचा हा प्रसंग आहे. आणि पुनर्जन्म माझ्या इच्छेवरच अवलंबून आहे असे गृहित धरले, तरी असा आणखी एक जन्म घ्यावा की घेऊ नये, असा प्रश्न माझ्यासमोर उभा राहतो. देव माझ्यासमोर उभा राहून त्याने मला सांगितले की, 'तुला जसा आवडेल तसा आणखी एक जन्म मी तुला देतो. असा जन्म मी दिला तर तू काय करशील ?' देवाने मला असे विचारल्यास मी त्याला सांगेन की, 'मला आता कसल्याहि प्रकाराचा जन्म घेण्याची मुळीच इच्छा नाही. जन्माला घालून तू सर्व प्राण्यांना आणि विशेषतः मानवांना चांगलेच बनवतोस. तुझी ही बनवाबनवी मी या जन्मातच पुरेपूरे ओळखली आहे. म्हणून मला पुनर्जन्म नको.'

माझी वृत्ति ही अशी बनल्यामुळे 'पुनर्जन्म झाला तर ?' या प्रश्नाचे काय उत्तर द्यावे हे मला अडचणीचे झाले आहे. पुष्कळांना असे वाटते की, या जन्मात आपल्या हातून घडलेले प्रमाद, आणखी एक जन्म मिळाल्यास, आपण ते टाळू आणि आपले नवे जीवन आपण अधिकाधिक सुखकर, आनंदमय व सौन्दर्यपूर्ण असे बनवू. पण हा त्यांचा भ्रम आहे. आणखी एक जन्म मिळाला तरी मागल्या जन्माची आपल्याला आठवण राहत नसते, असा सर्वांचा अनुभव आहे. म्हणून गेल्या जन्मात केलेल्या चुकांची पुनरावृत्ति टाळण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आणि समजा, मागल्या जन्मात घडलेल्या सर्व गोष्टींची स्मृति कायम राहिली, तरी जुने प्रमाद टाळून अस्खलनशील, निष्पाप सुंदर व आनंदमय जीवन आकारास आणण्याची शक्ति आपण कोठून मिळविणार ? या शक्तीच्या अभावी नव्या जन्मातहि आपण हतबल व हतप्रभच ठरणार. आणि समजा, अशी शक्ति मिळाली व आपले नवे जीवन आपण आपल्यापुरते अस्खलनशील, निष्पाप, सुंदर व आनंदमय बनविले तरी इतरांचे दुःखमय जीवन पाहून आपल्या आनंदात विरजण पडणारच. 'सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात्' ही प्रार्थना मोठी रम्य आहे. पण ही प्रार्थना विश्व निर्माण झाल्यापासून आतापावेतो केव्हाहि कोठेहि सार्थ झाली असेल, असे मानण्यास कसलाहि आधार नाही. आणि केवळ स्वप्नरंजनात मला मौज वाटत नाही.

द्वंद्वमय जीवनातील नाट्य

असे असले तरी जीवन मला नकोसे झालेले नाही. जीवनात सत्य आहे, असत्य आहे; ज्ञान आहे, अज्ञान आहे; आनंद आहे, दुःख आहे. आणि या द्वंद्वांचा अखंड संघर्ष चालू आहे. म्हणून जीवन मोठे नाट्यपूर्ण आहे. त्याचा अर्थ शोधावयाला जावे तर त्याचे नाट्य संपुष्टात येते आणि नाट्यात रमावे तर त्याच त्या पात्रांचा तोच तो अभिनय पाहता पाहता कंटाळा येतो. म्हणून जीवनांत सर्जनशील अशी नित्य नवीनता आणल्या गेल्याशिवाय, अथवा अदृश्यपणे, अव्यक्तपणे जीवनात आरंभापासूनच वसत असलेली नित्यनवीनता पूर्णपणे ओळखल्याशिवाय जीवनावर आनंदाचे व लावण्याचे लेणे चढविले जाणे अशक्य आहे.

म्हणून मी असे म्हणेन की, पुनर्जन्म झाला तर माझ्या आणि सर्व मानवांच्या जीवनाला आनंदाचे व लावण्याचे लेणे चढविण्यासाठी सर्जनशील अशा नित्यनवीनतेचे माहात्म्य पटविण्याचेच कार्य मी करीन. भूतकाळाचे, म्हणजे गतार्थाचे, भूत मानवाच्या मानगुटीवर बसणार नाही यासाठी, आणि अज्ञात भविष्यावर आशाळभूतपणे विसंबून राहणाऱ्या विचारप्रणाल्यांच्या आहारी जाऊन वर्तमानाचा विचका करून टाकणाऱ्या सर्व प्रवृत्तीपासून मानवांची मुक्तता व्हावी, यासाठी मी सतत झटेन. मृत्यु कोणत्याहि क्षणाला येऊ शकेल, हे निर्विवाद सत्य ओळखून, सारे जीवनसर्वस्व क्षणाक्षणात ओतून वर्तमान क्षणातच अनंत आनंदाचा अनुभव कसा घेता येईल, याचे तंत्र मी संशोधून काढीन. गतार्थ झालेल्या सर्व स्मृतींचे ओझे नित्य वाहत राहणे, हा कसा अभिजात मूर्खपणा आहे, आणि त्याचप्रमाणे भविष्याकडे आशाळभूतपणे पाहत राहणे हा देखील गतार्थाच्याच मगरमिठीत स्वतःला डांबून घेण्याचा प्रकार कसा आहे, हे सर्वांना पटविण्याचा मी सतत यत्न करीन. स्मृति म्हणजे गतार्थाशी गुंफण, आणि आशाळभूत भविष्य म्हणजे गतार्थाचाच अनागतावर आरोप. म्हणून अतीत, म्हणजे जे भूतकाळात कायमचे गडप झाले आहे ते, आणि अनागत म्हणजे पुढील काळात यावयाचे आहे ते, ही दोन्ही बाजूला सारून, वर्तमानाकडे पूर्वग्रहशून्य अशा दृष्टीने पाहणे व ते जसे आहे तसेच समजून घेणे, यातच जीवनाचे रहस्य कसे साठले आहे आणि हे रहस्य संशोधून काढण्यातच समग्र मानवी जीवनाचे सार्थक कसे आहे, हे सर्वांना पटविण्याचा मी यत्न करीन.

जीवन म्हणजे काय ?

एकीकडे जन्म हा अज्ञाताच्या काळोखात दडून बसलेला आणि दुसरीकडे मरण हेहि आकलनाच्या पार असलेले—अशा कात्रीत मानवी जीवन सापडले आहे. या कात्रीच्या तीक्ष्ण व निर्घृण पात्यातून आपले जीवन बाहेर पडू शकले, तरच

अनुक्रमणिका

जीवन म्हणजे काय, हे कळण्याची शक्यता आहे. म्हणून अतीत व अनागत ही जी कालात्मक नियतीच्या कात्रीची दोन तीक्ष्ण पाती, त्यांच्या मान्यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधून काढणे आवश्यक आहे. पूर्वग्रहांचा कसलाहि आरोप न करता आणि आपल्या आशाअपेक्षांचा केवळ काल्पनिक रंग त्यावर न चढविता, वर्तमानातील क्षणाक्षणावर दृष्टि केंद्रित करणे, एवढाच मार्ग आपल्या हाती उरतो. अन्य सारे मार्ग म्हणजे वास्तवावर आपल्या अज्ञानजन्य पूर्वग्रहांचे आरोप करणारे अथवा आपल्या अज्ञानाने प्रस्फुरित केलेल्या आशा-अपेक्षांचे त्यावर रंग चढविणारे होत. पुनर्जन्म झाला तर–हे जे मला आता थोडेवहुत कळू लागलं आहे ते पूर्णांशाने कळून घेण्यात आणि सर्वांना त्याची जाणीव करून देण्यातच मी तो व्यतीत करीन.

समग्र मानवी जीवन हे अतीताच्या अर्थशून्य स्मृतींनी आणि अनागता विषयीच्या भ्रामक कल्पनांनी भारावलेले व बद्ध झालेले आहे. हा भार झुगारून देणे म्हणजे मुक्ति. हा भार आहे व तो झुगारून देणे आपल्याच स्वाधीनचे आहे, याची साक्ष पटल्याशिवाय मुक्ति नाही. आणि जोवर आपले वद्ध मन विमुक्त होत नाही, तोवर जीवनातील क्षणाक्षणाला सळसळणाऱ्या नित्य सर्जनशील व नित्य नवीन अशा चैतन्याचे दर्शन नाही. हे दर्शन मला पूर्णांशाने घडावे व इतरांनाहि ते घडविता यावे, यासाठीच, मला आणखी एक जन्म मिळाला तर त्याचे मी स्वागत करीन. हे जर होणार नसेल, तर पुनर्जन्म मिळून देखील मी काय करणार ?

कांचन मृगाचा हव्यास

पुष्कळांना ही भाषा गूढ वाटण्याचा संभव आहे. याचे कारण गूढतेची आवरणे आपणच आपल्या अंतःकरणावर लादून घेण्याची वेडसर खोड मानवाला लागली आहे. पुनर्जन्म झाला, तर ही खोड नाहीशी करून टाकण्याचा, अथवा या खोडयातून मानवाला बाहेर खेचून काढण्याचा मी सतत यत्न करीन. जे अत्यंत सरळ, सोपे, सहज कळण्यासारखे असते तिकडे दुर्लक्ष करणे आणि जे हवेहवेसे वाटते त्याच्यामागे वेडयासारखे धावत सुटणें, असा आपला स्वभाव, माणसाने आपणहून वनवून घेतला आहे. आणि ‘ स्वभावो दुरतिक्रमः ’ असे सुभाषित बनवून माणूस आपल्याकडे व जीवनाकडे हताशपणे वघत वसलेला आहे. डोळे सहज उघडता येण्यासारखे असले, तरी ते आपणच घट्ट दावून ठेवावयाचे आणि, आपल्याला दिसतच नाही, असा नित्य कोलाहल करीत बसावयाचे, असा प्रकार सांप्रत चालू आहे. परमेश्वराने अथवा निसर्गाने आपल्याला काय दिले आहे आणि त्याचा आपण सुयोग्य उपयोग करतो का ?- या प्रश्नाचा विचारच आधुनिक मानव करीनासा झाला आहे. रामायणातील सीतेप्रमाणे, आधुनिक मानवाला सर्वत्र

अनुक्रमणिका

' कांचनमृग ' दिसू लागले आहेत व ते त्याला हवेहवेसे वाटू लागले आहेत. त्यांच्या अंतःकरणातला 'राम' त्याना सांगत आहे की, 'बाबांनो, कांचनाचा मृग हा भ्रम आहे. कांचनाचा मृग निसर्गाने निर्माणच केलेला नाही. त्याची हाव कशाला ? तो डोळयांना दिसतो म्हणून तो खरा असलाच पाहिजे, असे नाही. दिसते तसे असतेच असे नाही. जे दिसते ते खरे की खोटे, हे ठरविण्यासाठी मानवाला निसर्गानेच विवेकशक्ति दिलेली आहे. डोळयाबरोबरच तिचाहि उपयोग करा, म्हणजे डोळयांना दिसणारा कांचनमृग हा भ्रम आहे, हे तुम्हाला सहज उमगेल व त्याची हाव धरणे हा मूर्खपणा आहे हे, सहज आकळेल.'

अंतःकरणातला राम

पण अंतःकरणातील रामाच्या या वाणीकडे सीतेने जसे दुर्लक्ष केले आणि कांचनमृगाचा पाठलाग करण्यासाठी रामाला बाहेर घालवून दिले, तद्वत् आधुनिक मानवहि कांचनमृगाच्या हव्यासापायी आपल्या अंतःकरणातील रामाला क्षणोक्षणी बाहेर घालवून देत आहे. आणि या अट्टाहासापायी, सीतेला रावणरूपी आसुरी शक्तीच्या बंदीवासात जाऊन पडावे लागले, तद्वत् आधुनिक मानवहि आज आसुरी शक्तींचा गुलाम होऊन बसला आहे. कांचनमृगाच्या या हव्यासातून संकटपरंपरेच्या अनंत साखळीशिवाय दुसरे काय निष्पन्न होणार ?

केवळ भ्रमामुळे व मोहामुळे निर्माण होणाऱ्या संकटपरंपरेची साखळी तोडून टाकण्याचा आणि बंधमुक्त होण्याचा एकच उपाय आहे आणि तो म्हणजे आपल्या अंतःकरणातल्या रामाला शरण जाणे आणि त्याची करुणा भाकणे. पुनर्जन्म झाला तर माझ्या स्वतःच्या व अन्य सर्व मानवांच्या अंतःकरणातील ' राम ' जागविण्याच्या प्रयत्नातच मी माझ्या जीवनाचे सार्थक मानीन.

सत्य आणि सत्याभास

जीवनात सत्य आणि सत्याभास एकमेकात मिसळून गेले आहेत. हवेहवेचा हव्यास हाच सर्व आभासांचा जनक आहे. भूक लागली म्हणजे अन्न हवेसे वाटणे हे स्वाभाविक व आवश्यकहि आहे. पण किती ? हाच खरा प्रश्न आहे. शरीरपोषणास आवश्यक, रुचेल व पचेल तेवढेच अन्न हवेसे वाटणे हा स्वभाव आहे. यापेक्षा अधिकाची हाव धरणे, संचय करून इतरांच्या तोंडचा घास ओढून घेणे, अन्नधान्याचा काळा बाजार माजवून आपले व समाजाचे समग्र जीवन काळवंडून टाकणे, हा स्वाभाविक हवेपणा नसून नैसर्गिक स्वभावाची ही मानवकृत अशी भेसूर विकृति आहे. केवळ अन्नासाठीच नव्हे, तर इतर सर्व वस्तूंच्या हव्यासापायी आधुनिक मानव हा अशा विकृतींना बळी पडलेला प्राणी झाला आहे.

हवेहवेचा हव्यास आणि या हव्यासांची परिपूर्ति हेच आधुनिक मानवाला प्रगति लक्षण वाटू लागले आहे. वस्तुतः हा सर्व आसुरीशक्तीच्या आहारी जाण्याचा प्रकार आहे.

पुनर्जन्म झाला तर आसुरीशक्तींच्या बंदीवासात अडकून पडलेल्या मानवाची मुक्तता करण्याचा सतत यत्न करण्यातच मी माझ्या जीवनाचे सार्थक मानीन. 'हवे' हे सत्य, पण 'हवेहवेचा हव्यास' ही भयंकर विकृति आहे, हा भयानक आभास आहे, प्रलयंकारी व सर्वसंहारकारी असा भ्रम आहे. या भ्रमातून आपली स्वतःची व समग्र मानवजातीची मुक्तता करण्यातच मानवी पुरुषार्थाचे सार कसे साठले आहे, हे सर्वांना पटविण्याचे सामर्थ्य यावे, यासाठीच पुनर्जन्माचे मी स्वागत करीन.

विकृति आणि अविकृति

पण हे असे सामर्थ्य प्राप्त होणे शक्य आहे का? असा प्रश्न मला कोणी विचारतील. माझे उत्तर असे की, हे सामर्थ्य मानवात निसर्गदत्त आहे. जे निसर्गदत्त आहे ते दुर्लक्षिणे आणि जे निसर्गदत्त नाही त्याच्यामागे विकृत हव्यासांच्या पायी धाव घेत सुटणे, ही मानवनिर्मित दुर्घटना आहे. मानवाच्या सर्व समस्यांचे मूळ या दुर्घटनेतच दडून बसले आहे. जे स्वाभाविक आहे ते आम्हाला अर्थशून्य होऊन बसले आहे आणि जे विकृत आहे तेच आम्ही आपला 'स्वभाव' मानून बसलो आहोत. आणि 'स्वभावो दुरतिक्रमः' असे मानून आम्ही आपल्या सर्व विकृतींचे समर्थन करण्यातच धन्यता मानू लागलो आहोत.

विकृति आणि अविकृति यांच्यातील भेद ओळखण्यावरच मानवाचे भवितव्य अवलंबून आहे. मूल प्रकृति ही अविकृति आहे. या अविकृतीची यथार्थ जाणीव करून घेताच प्रकृतीची समग्र सर्गशक्ति माणसाच्या पायी लोळण घेत येईल. आपल्या विकृतींची वर्तमान अवस्था केवळ साक्षीवृत्तीने जाणून घेण्याचे तंत्र मावनाला अवगत झाले, तरच पूर्वग्रहांनी बद्ध झालेला मानव यथार्थग्रहाच्या म्हणजेच यर्थार्थ ज्ञानाच्या प्रभावामुळे पूर्ण विमुक्त होईल. प्रकृतीची प्रसव-शक्ति ही क्षोभजन्य, विकृतिजन्य आहे. म्हणून शांत, अविकृत, साक्षी वृत्तीने विकृतींचा निरास करण्याच्या प्रक्रियेला योगदर्शनात '**प्रतिप्रसव**' अशी मोठी सार्थ संज्ञा दिली आहे. हवेहवेच्या हव्यासापायी जे निर्माण होते तो प्रसव, तर हवेपणाची प्राकृतिक मर्यादा ओळखून विकृतींचा निरास करीत जाणे आणि क्षणाक्षणाच्या जीवनात अदृश्यपणे सळसळणाऱ्या चैतन्याचे दर्शन घेणे, हा प्रतिप्रसव.

प्रतिप्रसव आणि श्रद्धा

पुनर्जन्म झाला, तर या प्रतीप्रसवाचे तंत्र पूर्ण आत्मसात करून चैतन्याच्या

अखंड सर्जनशीलतेचा, प्रतिक्षणी नवता धारण करणाऱ्या अनंत आनंदाचा, साक्षात्कार सर्वांना घडविण्यात मी आपल्या जीवनाचे सार्थक मानीन. हे शक्य आहे, संभवनीय आहे, अशी माझी श्रद्धा आहे. ऋग्वेदाच्या श्रद्धासूक्तात श्रद्धेची फार सुंदर व्याख्या केलेली आहे. सायणाचार्यांनी ती येणेप्रमाणे विशद केली आहे.

'पुरुषगतोऽभिलाषविशेष: श्रद्धा'

पुरुषगत, म्हणजेच मानवगत, असा जो **'अभिलाष-विशेष'** त्याचे नाव श्रद्धा. सामान्य विकृतिजन्य अभिलाष म्हणजे हवेहवेचा हव्यास; हा सामान्य अभिलाष थोपवून धरताच अंत:करणाच्या मुळाशी असलेला आणि विकृतींच्या दडपणाखाली दडलेला **अभिलाष विशेष** आतल्याआतच जाणवू लागतो. हाच अविकृत अभिलाष होय. तो अविकृत म्हणूनच त्याला **अभिलाष विशेष** असे नाव दिले आहे. हा अभिलाष-विशेष अंत:करणात स्फुरू लागला की, सामान्य पुरुष हा **पुरुष-विशेष**, म्हणजेच परमेश्वरस्वरूपी होऊ लागतो.

पुनर्जन्म झाला तर या अभिलाष-विशेषाचे सूत्र हाती घेऊन पुरुष-विशेषापर्यन्त प्रवास करण्याचे साहस मी करीन. आणि जेवढे मानव या साहसी प्रवासात मला सहभागी करता येतील तेवढे मी करीन.

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने)

★ ★ ★

हौस !

मृगचर्म कंचोळीची
हौस मनाला भोवली
प्राक्तनाने दूर केली
तुझ्या प्रेमाची सावली !

आता कशी मुख दावू
तुझ्या लाडक्या अनुजा
रामचंद्रा ! तुझ्या आधी
त्याची करिते मी पूजा !

—कृष्णा चौधरी

अनुक्रमणिका

१ गनमनभवरी

[समीक्षक– भाऊ माडवकर]

केशवसुत जन्मले-स्वप्राणाने तुतारी फुंकायला ! तिच्या तारस्वरांनी अंतराळ भेदून...नभछेदन साधून कलीच्या कानात लाव्हा ओतायला ! -मग अनेक कारागीर आले- गेले. कारागिरीचे नक्षीकाम करून...नाजूकसाजुक बोलाफुलांची मोहनमाळ शारदेच्या गळा घालून; कधी शिळया कढीला गदका देऊन !! मर्ढेकर आले, भार्गवरामाचा परशु घेऊन कलीवर हल्ला चढवायला...नाक कान कापून त्याच्या हाती द्यायला ! . . .ते गेले-अराजक माजले ! ज्यालात्याला तिसऱ्या डोळयाने दिसू लागले. कुणी 'दातापासून दाताकडे' सैरावैरा धावू लागले. घोडा खिंकाळून चौखूर उधळला तेव्हा सहृदय चाहत्यांनी हातचा लगाम सोडून दिला. नवल घडले.-आणि आता-रंजल्यागांजल्यांच्या व्रणांवर हळुवार फुंकर घालून त्याच कलियुगाच्या डोळयात अंजन घालण्यासाठी 'गनमनभवरी' (गोलगोल फिरण्याचा एक खेळ) चे सुलक्षणी सुचक्र घेऊन, बावरलेल्यांना दिलासा देऊन सावरण्यासाठी, आपल्याला गवसलेल्या आत्म्याचे हृद्गत पथभ्रष्टांना ऐकवून, ताळयावर आणून, श्याम सोनारे शारदेच्या दरबारात रुजू झाले आहेत, मानाचे पान पटकाविण्यासाठी !! 'गनमनभवरी' वाचून असे वाटते खरे !

ही अतिशयोक्ति नव्हे ! 'मनमनभवरी' च्या पानापानावर विखुरलेले मोलाचे बोल जिवंत काव्यास्वादास आतुरलेल्या सूज्ञास खचित फोल वाटणार नाहीत ! नेहमीच चांगुलपणाकडे पाठ फिरवून नाके मुरडण्याची 'सय' असणारांनाहि' 'गनमनभवरी'चे मोल तीमधील वानगीवरून सहज पटेल असा भरवसा आहे.

'देवत्वाचे आराधन' साधून 'ऐहिकतेच्या ऐल तटाहून अमर प्रीतीचे' पूजन करीत 'चिरंजीवी संजीवना'च्या 'दुर्दम्य ध्येयप्रेमाच्या सिद्धीसाठी अगम्य नादात' श्रेयाच्या शोधार्थ 'काळपुरुषाच्या ओठावरची गणिते पुसून' 'आज उद्याशी हातमिळवणी' घडवीत कवीचा प्रवास सुरू आहे.-' चोचीत जाणिवेचा चारा, पिळवटलेल्या हृदयात नेणीवेची पुरेशी ऊब आणि पंखाच्या बहारदार स्पंदनात वाऱ्याचा उन्मत्त आवेग' घेऊन, अस्मानातील 'ध्रुवताऱ्यांना मारून-मुटकून घरातलावर आणण्यासाठी' 'हाती लाखपळांचा घुंगुरवाळा घेऊन !!-- हे काव्य मनात भरताच कवीची उंची हिमालयाइतकी वाढल्याचे प्रत्ययास आल्याखेरीज राहत नाही.

सूर्योदय झाला- केवळ इतके सांगण्यासाठी ते एकापेक्षा एक सरस रूपके योजतात- अगदी अभिनव पद्धतीने—

वाळंतरात्रीच्या
लुकलुकत्या डोळयांमधले
अवघे काजळ झरले...सरले...

प्रशान्त शांतीचे
आशीर्वच फळले. . . प्रसविले. . .
उषेच्या कोकिळकंठामधले
कोमल संगीत टयँहाँटयँहाँ ऽऽचे. . .
किलविलले
घुमू लागले. . .

भदरंग काळोखाचे काळेपण
ऐरणीवरती ठिणगी होऊन
लखलखले. . .

असल्या भव्य-दिव्य रूपकांशी खेळण्यास त्यांच्या प्रतिभेला भारी आवडते.

श्री. श्याम सोनारेंच्या कवितेत मुख्यतः चार वाण आहेत. (१) हरपलेल्या श्रेयाचा शोध घेणारी कविता (२) सामाजिक जाणीवेने आणि ध्येयवादाने भारावलेली कविता (३) आत्मकेंद्रित स्वरूपाची कविता (४) श्रृंगारिक कविता

'अधी मधी' कवि हरपलेल्या श्रेयाशी गुजगोष्टी करण्यात मशगुल होऊन जातो—

दूरताही आहे- दूरताही नाही
जवळचे मला- दिसतही नाही

हरवलेले न गवसल्याने कवीचा जीव कासावीस होतो, तेव्हा—

उले. . .मिटेना पापणी
खुपे डोळ्यात चांदणी
डहुळले. . .हेलावले. . .
साता समुद्राचे पाणी

त्या श्रेयाची परिणति शून्यात, केवळ शून्यात होताना पाहिली की कवि तिळपापड झाल्यागत होतो. वैतागतो——

आक्रोशले . . . किंचाळले . . .
उबगले मन.
विमनस्क पायपीट
रुते क्षणकण.

या प्रवासात–

भरतीची वंडी– सुलार जाहली
शिवळ बनली–गळफास.

या अनुभवाने काही केल्या कवीची कळी उमलत नाही. तरी त्याचा पिच्छा मात्र सुटत नाही–

आकाशल्या हृदयात– अनुराग उमलेना
दर्वळला ऐशधुंद– दर्प मुठीत येईना.

साम्यवादात्मक सामाजिक जाणीवेतून कवीचा ध्येयवाद जन्मला आहे. मोठे छोटचांना गिळतात, ते दृश्य–

मतलबालागी सुटते पाणी
नजर हेरते– उंदरांचे वीळ
उले दातखीळ, मिटे पापणी
रक्तमांसासाठी पोट उपाशी
जिव्हा असोशी.

म्हणून कवि निष्कर्ष काढतो की 'नरेच केला हीन किती नर' 'माणसाचा शत्रू माणूसच !' 'घरीदारी उपाशी मरण' पाहिल्यावर 'उपद्रवी नाठाळांची अस्मानी सुल्तानी' लेखकाला नकोशी वाटते. हा माणूस कसा नीच झाला आहे हे उपहासाने कवि स्पष्ट करतो–

आता माणसाने व्हावे–मिसंमिसं
लहान . . .लहान . . .
वळे तोलून पाहावे–दिसंमासं
माणसाचं मन.

पुढील ओळीमधून कवीचा ध्येयवाद मुखरित झाला आहे–

'अज्ञाताच्या छटा–माझी वाटचाल'
'बऱ्या वाईटाचा–मीच मुखत्यार'

श्री. सोनारे यांच्या अंतर्मुख वृत्तीने आत्मकेंद्रित स्वरूपाच्या कवितेला जन्म दिला आहे. बाजारबुणग्यांच्या बेफिकीर गर्दीवर ते तुटून पडतात. 'साध्या

विषया ' तील ' मोठे आशय ' सोनारेंची कविता समर्थपणे दाखवून देते. त्यांची ' अिरींगमिरींग ' याची चांगली साक्ष आहे. ह्या कवितेची गोडी काही और आहे.

त्यांच्या श्रृंगारिक कविता सात्विक प्रेमभावनेच्या परिचायक आहेत. उथळपणापासून त्यांची प्रेमकविता अलिप्त आहे. छचोरता तिला शिवतहि नाही. स्वप्नरंजनाबरोबरच वास्तवाच्या विस्तवाशी खेळायची कवीला हौस आहे. वऱ्हाडी ग्रामीण स्त्रीच्या भूमिकेशी तद्रूप होऊत रेखाटलेले ' भरताराचे सुख ' अवीट आहे.

सोनारेंची कवितारमणी ' मळवाट भुलणार नाही, पळवाट शोधणार नाही ' असे शपथपूर्वक सांगत असली तरीही वाचकांना अनेक वाटा शोधायला भाग पाडते. म्हणूनच की काय त्यांनी कवितांना नावे ठेवलेली नसावीत. कवितांच्या आशयाला बंधनात ठेवू नये, असे त्यांना वाटत असावे.

श्री. श्याम सोनारे यांनी आता कुठे विशी पार केली आहे. इतक्या अल्पवयात मराठी साहित्यांत मोलाची भर टाकण्याची त्यांची कुवत लक्षात घेतल्यास मी मी म्हणणारांनी स्वतःचे मानभावी मीपण विसरून त्यांची पाठ का थोपटू नये ?

गनमनभवरी : (कवितासंग्रह) —कवि : श्री. श्याम सोनारे; प्रकाशक अभय प्रकाशन, देशमुखपुरा, वरूड (विदर्भ) मूल्य २ रुपये. पृष्ठें ६४

२ असिधारा

[समीक्षक— **भाऊ मांडवकर**]

श्री. उदापुरे यांच्या नऊ कथांचा हा पहिला संग्रह आहे. केवळ पहिला म्हणून त्याचे कौतुक करावे, किंवा पहिल्यावहिल्या साऱ्याच गोष्टी प्रमादशील असतात, म्हणून प्रमादांना लेखकाच्या माथी मारावे, ह्या दोन्ही वृत्तींच्या टीकाकारांना या संग्रहात उक्त आग्रही अपेक्षापेक्षा काही निराळे आढळेल ! पहिला असूनहि परिणामकतेची परिणति आढळणाऱ्या या कथासंग्रहातील प्रमाद—असतील तरी-कुठल्याकुठे लोपून जातात, असे आढळून येते.

' असिधारे 'तील आठ कथांचा संसार नागरजीवनातील असला तरी 'निंदण' कथेचे वळण वेगळे आहे. या संग्रहातील ही कथा त्यामुळे उठून तर दिसतेच पण तिच्यातील गोडवाहि मनाला भुरळ पाडतो. वऱ्हाडी जीवनातील साध्या

प्रसंगातून उभे केलेले जीव जवळचे वाटतात. वऱ्हाडी वावरात निंदायला जाणाऱ्या 'लक्षिम्यां'ची भोळीभाबडी मस्त रूपडी 'निंदण' कथेत उभी केली आहेत.

उरलेल्या आठ कथांचे विषय तुमच्याआमच्या आजूबाजूलाच रेंगाळणारे वाटतात. 'जळती मेणबत्ती' लेखकाच्या अनावडीमधली काहीशी दिसते खरी; पण या कथेतील अनिल आणि बिंदू कॉलेजातील नित्याचे प्रेमवीर असूनहि त्यांच्या प्रेमातील आगळी आर्त हृदयाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाही. "बिंदू स्वतःला कुणाच्याहि स्वाधीन करण्याचं ठरविल्यास मी एक भिक्षेकरी आहे हे लक्षांत असू दे!"– अनिलच्या या वाक्यावर जळफळलेली बिंदू त्याच्यातील अवखळ, करारी अन् बेमुर्वतखोर वागणुकीतला प्रेमाचा स्निग्ध पाझर पचवू शकली नाही. तिने त्याला चांगले 'खडसावले'. त्यावेळी क्षमा मागून चूक कबूल करणाऱ्या अनिलबद्दल तिच्या वडिलांनी म्हटलं होतं, "प्रवाह संगम करतांना सोसाटत फोफावत असतो. स्त्री आणि पुरुष यांच्यात समानता यायची झाल्यास निर्झराचा खळखळाट त्यांच्यात उतरायचाच!" पुढे तोच अनिल खेळाडू म्हणून सर्वप्रिय असताना बिंदूने त्याचे कौतुक करायचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याने त्याच करारीपणाने उत्तर घाडले; "विषारी दात गळालेल्या नागिणीनं स्वतःचं रूपडं आरशात पाहिल्याशिवाय भलत्याच घाडसाला हात घालायचा नसतो." बिंदूचे विषारी दात गळाले. तिच्यातील अहंता गळाली. तिचे सर्वस्व हरवले. कालांतराने दोघांचा विवाह होतो. या कथेतील मेणबत्तीप्रमाणे जळणाऱ्या बिंदूपेक्षा तिचे वडीलच वाचकाला आपल्याकडे आकर्षित करून घेताहेत, असा अनुभव येतो.

'असिधारा' ही कथा गांभीर्यासह कारुण्याचा कळस करते. या कथेतील नायिकेला आश्रमाची वाट धरावी लागते. अशीच करुणजन्य परिस्थिति 'अंतर आणि आभास' या कथेतील वातावरणाची आहे. तीमधील तीन जीवांची तडफड वाचकांनाहि तडफडायला लावते. अंगावर पुळ्या येऊन त्यांचे रूपान्तर भयंकर रोगात होऊन जीव देणारी सुधा उपेक्षिताच्या त्यागाची जाणीव देते. तिचा पति अनंता व 'भाऊ' माधव यांच्या असीम आणि निर्व्याज प्रेमावर आधारलेल्या त्यागाकडे आपण अनायासे खेचले जातो! 'आवर्त' मधली कारकून मिस दिघे आणि 'जाणीव' मधील प्राध्यापिका दाते या पात्ररेखा इतर स्त्री–चित्रांप्रमाणेच उठावदार आहेत.

श्री उदापुरे यांचा 'सुटकेचा मार्ग' योगायोगाचा आश्रय घेतो, हे लक्षात घेतानाच, त्यांच्या सर्व कथातील सूचकता कमालीची प्रशंसनीय तशीच प्रत्ययकारी वाटते. थोडक्यात अधिक सांगण्याचा गुण लेखकाला अगदी सरावाने साधला असल्याचे प्रत्ययास येते. वर्तमानात वर्णन करण्याची स्थिरकेंद्री धाटणी हा लेख-

लेखकाचा एक स्वतंत्र विशेष आहे. उदा.- " पावसाची रिपरिप सुरू आहे. तीत लय आहे–काहीसा आवाज पण. डांबरी रस्त्यावर धारा फुटतात-तुषार उडतात साचलेले पाणी उतरणीकडे धाव घेतं–" " इतक्यात पाळण्याला डोळे फुटतात. आवाज येतो म्हणून विजया आत जाते." "एक लोंढा येतो-दुरून वाहत-आणि भोवरा नाहीसा होतो." ही अशी रचना लिहितांना लेखक मनोहर प्रतिमानांची पखरण करीत जातो, ती हृद्य असते.

श्री. उदापुरे यांच्या नऊहि कथांनी जुन्यात नवेपणा ओतला असून नव्यातहि जुनेपणाच्या खाणाखुणा असल्याचा प्रत्यय आणून दिला आहे. काहीसा तोचतोपणा जाणवतो खरा, पण तोहि प्रत्ययकारितेमुळे गौण ठरतो ! श्री. उदापुरे यांच्या ह्या विशेषाचा आढळ त्यांच्या पुढील कथांमधून आणखी व्हावा, अशी अपेक्षा कुणीहि वाचक करील !

असिधारा (कथासंग्रह) लेखक– दे. गो. उदापुरे. प्रकाशक– पु. ना. देशमुख, नागविदर्भ प्रकाशन, अमरावती. मूल्य– तीन रुपये. पृष्ठे– ११९

★ ★ ★

वांझ किनारा

वांझ किनारा नंगी वाळु खिन्न काळी रात्र,
पेंगुळला पांगळा घाट अन् बधिर बधिर गाल...

रिते, रिते आभाळं आणखी अधांतरी काजवा,
निळा सावळा पंख पसरूनि स्तब्ध उभा पारवा...

पान, पान पिवळे आणिक अखेरची सळसळ,
मुक्या मनाची दीर्घकहाणी : झाडाची भळभळ

दूर उताणी पायवाट ती—वाऱ्याची घरघर,
तियेच वेडचापरि लवलवते हिर हिरवी हुरहुर...!

प्रसन्नकुमार पाटील

अनुक्रमणिका

डॉ. दफ्तरींनी केलेले उपनिषदांचे 'मथन'

लेखक– **बाळाचार्य खुपेरकर**

विदर्भातील प्रसिद्ध संशोधक डॉ. के. ल. दफ्तरी यांचें "औपनिषदिक जीवन-सौख्य" हे पुस्तक प्रसिद्ध होऊन बरेच दिवस झाले. डॉ. दफ्तरी यांची प्रखर बुद्धिवादी म्हणून ख्याति आहेच. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतच्या पुस्तकाच्या पहिल्याच परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे "उपनिषदांचा खरा अर्थ तरी काय याचा अत्यंत निर्भेळ बुद्धिवादाने विचार" केला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हेहि या ग्रंथाला "बुद्धिवादी उपनिषद्भाष्य" असेच म्हणतात. अशा या बुद्धिवादी उपनिषद्-भाष्याची युक्तायुक्तता पाहण्याचे काम वास्तविक कोणीतरी अधिकारी व्यक्तींनी करावयास पाहिजे; पण तसे कोणी केल्याचे माझे पाहण्यात नसल्यामुळे ते काम मी यथामति करण्याचे हे धाडस करीत आहे.

अनारंभणीयत्वाचा आक्षेप

आपल्या प्राचीन दार्शनिक ग्रंथातून ग्रंथाच्या प्रारंभीच त्या त्या शास्त्रावर जे आक्षेप घेतले जातात, त्यात अनारंभणीयत्वाचा आक्षेप प्रमुख असतो. ज्या शास्त्रावर तो ग्रंथ लिहिला गेला असेल, त्या शास्त्राच्या अभ्यासाची जरुरी काय, हे प्रथम पटवून देण्याची जबाबदारी त्या ग्रंथकर्त्यावर असते. पूर्वसूरींच्या या पद्धतीस अनुसरून मीहि डॉ. दफ्तरींच्या प्रस्तुतच्या पुस्तकावर तोच आक्षेप येथे मांडून त्याला डॉक्टरांनी काही उत्तर दिलेले नाही, हे दाखविणार आहे.

डॉक्टरांच्या मते "विरुद्ध वचनापैकी जे बुद्धीस पटेल त्याप्रमाणे आज मनुष्याने वागावे. विरुद्ध वचनापैकी कोणतेच बुद्धीस पटत नसेल तर बुद्धीस पटेल त्याप्रमाणे वागावे (औ. जी. परिच्छेद १२)." यावरून त्यांच्या बुद्धिवादात कार्याकार्यविचारात अथवा धर्माधर्मविचारात बुद्धि हीच एकमेव कसोटी आहे. शास्त्रवचनांना या बुद्धिवादात काहीच स्थान नाही हे अगदी उघड आहे. मग प्रश्न असा पडतो की, मनुष्य एकदा बुद्धिप्रामाण्यवादी झाला म्हणजे त्याला शास्त्र-प्रामाण्याची अथवा शास्त्रवचनाचा अर्थ करण्याची जरुरीच ती काय ? ज्यांना वेदांचे, शास्त्रांचे अथवा उपनिषदांचे प्रामाण्य वाटत असेल त्यांना "उपनिषदांचा खरा अर्थ तरी काय" अशी जिज्ञासा होणे स्वाभाविक आहे; पण ज्यांच्या मते उपनिषदात परस्परविरोधी वचने असून त्यांचा समन्वय करण्याची जरूरी नाही,

(पहा परिच्छेद ८ व १२)–नव्हे–विरोध मिटवून जो धर्म ठरेल तो धर्म खोटा होतो, त्यांनी उपनिषदांचा "खरा अर्थ" सांगण्याचा अव्यापारेषु व्यापार करणे, सैतानाने बायबलाचा आधार घेण्यासारखे आहे.

त्यामुळे जे खरेखुरे बुद्धिवादी असतील, ते "असत्य किंवा असिद्ध गोष्टी" (परिच्छेद १६) ज्यात आहेत अशा उपनिषदांचा अर्थ लावणारे डॉ. दफ्तरींचे प्रस्तुतचे पुस्तक नुसते उघडणारहि नाहीत. मग त्याचा अभ्यास आणि मनन करण्याची व्यर्थ यातायात कोण करणार? अर्थात् जे बुद्धिवादी आहेत ते या ग्रंथाचे अधिकारी नाहीत आणि जे बुद्धिवादी नाहीत ते निर्भेळ बुद्धिवादाने विचार करीत नसल्यामुळे तेहि हा ग्रंथाचे अधिकारी नाहीत. एवं च या ग्रंथाला कोणी अधिकारी नसल्यामुळेहि या ग्रंथाला वैयर्थ्य येते.

उपनिषदे प्रमाण ?–वैयर्थ्यदोष

आपल्या या तथाकथित 'बुद्धिवादी उपनिषद्‌भाष्याची, काय' आवश्यकता आहे, याचा लेखकाने पहिल्याच परिच्छेदात विचार केला आहे; पण तो करीत असता, आपण उपनिषदे 'प्रमाण मानीत' असल्याचे ढोंग करावे लागले आहे. अर्थात् हे त्याचे प्रामाण्य काय स्वरूपाचे व किती तकलुपी आहे, हे मी वर दिलेल्या अवतरणावरून स्पष्ट होतेच; पण त्याखेरीज लेखकाने काहीहि पुरावा न देता एक गोष्ट गृहीत धरून उपनिषदांचे प्रचलित अर्थ चुकीचे आहेत, असे ध्वनित करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् त्यामुळेहि डॉ. दफ्तरींचा हेतु साध्य होत नाही ही गोष्ट वेगळी. गृहीत धरलेली गोष्ट अशी "आपण (म्हणजे कोण हे मुद्दामच लेखकाने स्पष्ट केले नाही) आजपर्यंत उपनिषद्‌ग्रंथाप्रमाणे वागत आलो." (परिच्छेद १). येथे (१) उपनिषद्‌ग्रंथाप्रमाणे वागणे म्हणजे काय? (२) आपण म्हणजे कोण (३) आजपर्यंत खरोखरच तसे वागलो काय? असे तीन प्रश्न उद्‌भवतात. पण त्यांचा काहीच विचार न करता व तिसऱ्या प्रश्नाबद्दल वळकट पुरावा देणे अवश्य असता, तोहि न देता; लेखकाने आपल्या ग्रंथाची उभारणी केली आहे. अशा तऱ्हेने ज्या पायावर विवेचनाचा डोलारा उभा केला आहे, तोच वर दाखविल्याप्रमाणे अत्यंत भुसभुशीत व कमजोर असल्यामुळे या ग्रंथावर येणारे दोन्ही दोष म्हणजे अनारंभणीयत्व व वैयर्थ्य हे अपरिहार्य आहेत.

पौरुषेय की अपौरुषेय ?

उपनिषदे ही परंपरेनुसार अपौरुषेय आहेत. अपौरुषेयत्वाची कल्पना 'बुद्धिवादात' बसत नसल्यामुळे ती पौरुषेय आहेत, हे सिद्ध करण्याची जबाबदारी डॉ. दफ्तरींची होती; पण तीही त्यांनी पार पाडली नाही. त्यांच्या मते वेद हे सप्तर्षि व मनु यांचेकडून सांगितले जात असत (परिच्छेद ४) त्याला आधार काय? तर

" प्रवर्तयन्ति वेदांश्च भुवि सप्तर्षयो द्विजा:" हे अग्निपुराणातील वचन. आता येथे सप्तर्षींनी वेद तयार केले, असे कोठे सांगितले आहे ? पण त्याच्यावर अवलंबून राहून डॉक्टरांनी उपनिषदे पौरुषेय आहेत, हे सिद्ध करण्याची जवाबदारी टाळली आहे, इतकेच नव्हे तर त्याचे आधारे उपनिषदांचा कालनिर्णय करण्याची अवघड गोष्ट केली आहे.

उपनिषदे ही एकदा पौरुषेय, नवी-जुनी ठरली की मग त्यात परस्परविरोधी वचने येणेहि अपरिहार्यच नाही काय ? ती निरनिराळ्या ग्रंथकारांनी लिहिलेली असल्यामुळे त्यांचा मेळ घालणे हेहि बुद्धिवादाला पटत नाही. (परिच्छेद ८) लेखकाला समन्वय कोठेच नको, असे मात्र नाही. पृ. १०६ वर त्याची उडालेली गाळण वाचकांनी जरूर पाहावी. पृ. १०६ वर त्याला नाइलाजाने का होइना पण समन्वयपद्धतीला मान्यता देणे भाग पडले आहे. कारण तशी मान्यता न द्यावी तर वृहदारण्यकांतील ३।५।१ आणि ४।४।२ या वचनात कर्मन्यासाचा विधि आहे, हे गळयात येते. तेथे लेखकाचा युक्तिवाद पाहण्यासारखा आहे. येथे लेखकाने आपले परिच्छेद ८ मधले तत्व बाजूस ठेऊन समन्वयपद्धतीचा अंगीकार करून आपल्या मताच्या पुष्टयर्थ गौतम, बौधायन, आपस्तंब, जैमिनि इत्यादि प्राचीन आचार्यांचे उतारे दाखल केले आहेत. हा निर्भेळ बुद्धिवाद !

' योनि ' शब्दाचा अर्थ

लेखकाला प्राचीन समन्वयपद्धति मान्य नसल्यामुळे, त्याने परिच्छेद १० मध्ये 'शास्त्रयोनित्वात्' आणि 'तत्तु समन्वयात्' या सूत्रांचे अर्थहि बदलून टाकले आहेत. त्यांचे मते ही दोन सूत्रे नसून एकच सूत्र आहे. व त्यातील 'योनि' शब्दाचा अर्थ जो 'प्रमाण' म्हणून केला जातो तोहि बरोबर नाही. कारण तसा अर्थ इतरत्र कोठेहि दिसून येत नाही किंवा कोशातहि सापडत नाही. पण वास्तविक कोशात 'योनि' याचा अर्थ 'कारण' असा दिला आहे. कारण दोन प्रकारचे असू शकते. एक जनक, दुसरे ज्ञापक. जनक कारण (उत्पत्तिस्थान) हा अर्थ तर डॉ. दफ्तरींना मान्य आहेच, मग ज्ञापक कारण म्हणजेच प्रमाण हा अर्थ त्यांना का अयोग्य वाटतो, हे समजत नाही. शिवाय मनुस्मति २·२५ येथे " एषा धर्मस्य वो योनि: समासेन प्रकीर्तिता ।" येथे योनि शब्द प्रमाण याच अर्थाने आला असून, टीकाकारहि 'योनिर्ज्ञप्तिकारणम्' असा स्पष्ट अर्थ करतात. त्यामुळे डॉक्टरांच्या आक्षेपात काहीच तथ्य उरत नाही. डॉ. दफ्तरींनी केलेला या सूत्रांचा अर्थहि निर्दोष नाही. त्यांनी 'तत्तु' याचा अर्थ ब्रम्हाचे ज्ञान असा केला आहे. पण ब्रम्हज्ञानाचा उल्लेख पहिल्या सूत्रात असून दुसऱ्या सूत्रात खुद्द ब्रम्हाचाच विचार आहे. तेव्हा तिसऱ्या सूत्रातील 'तत्तु' चा अन्वय पहिल्या सूत्रातील ब्रम्हज्ञानापेक्षा दुसऱ्या सूत्रातील ब्रम्हाशीच सुसंगत आहे. शिवाय लेखकाचा अर्थ सूत्रकारांनाहि अभिप्रेत

अनुक्रमणिका

असता तर त्यांनी "शास्त्रयोनेः" असा भाववाचकरहित प्रयोग केला असता. कारण तेवढयानेहि लेखकाचा अर्थ सिद्ध झाला असता. सूत्रे ही अल्पाक्षर व अस्तोभ असल्यामुळे सूत्रकार 'त्वात' या दोन अक्षरांचीं काटकसर करण्यास चुकले नसते. तसेच वेदांत सूत्र २।१।११ याचाहि लेखकाने केलेला अर्थ चुकीचा आहे. कारण सूत्रात 'अनुमेयम्' असा शब्द असता लेखक मात्र त्याचा अर्थ 'निर्णय करावा' असा करून, शास्त्राला अप्रतिष्ठितत्वदोष चिकटवू पहात आहे. तसेच 'योनि' शब्दाला 'प्रमाण' याअर्थी अप्रयुक्त ठरविणारा लेखक 'मेधा' शब्दाचा अर्थ 'यज्ञ' करतो (परिच्छेद ११) हेहि पाहणे गमतीचे आहे.

अर्थ करताना अध्याहार करावा लागतो, उपनिषदात परोक्षवाद आहे वगैरे तत्वे लेखकाला मान्य आहेत; पण त्यांचा उपयोग विरोधपरिहारासाठी करावयाचा नाही, हा मात्र त्यांचा मोठा कटाक्ष आहे. बुद्धिवादास अनुसरून मात्र त्यांचा उपयोग तो बिनदिक्कत करतो. (पहा परिच्छेद १४।१५।१६). अठरावा परिच्छेद वाचून तर लेखकाला लक्षणा आणि व्यंजना या दोन भिन्न भिन्न शब्दशक्ति एकच वाटतात की काय अशी शंका येते.

उपनिषदांचा विषय

उपनिषदांचा विषय काय याबद्दल खुद्द लेखकाच्याच मनात कसा गोंधळ आहे, हे पहावयाचे असल्यास परिच्छेद २१ ते २७ वाचावेत. उपनिषदांचा विषय 'आनंद' की 'आनंदप्राप्ति' याबद्दल त्याचा निश्चय होत नाही. पृष्ठ १६ वर तर लागोपाठ २-३ ओळीतच एकदा हा, तर एकदा तो, अशी त्याची घसरगुंडी झाली आहे. (पहा २१ व्या परिच्छेदाचा शेवट व २२ व्या परिच्छेदाचा प्रारंभ). लेखक परिच्छेद २१ मध्ये म्हणतो त्याप्रमाणे जर त्यांचा विषय आनंदप्राप्ति असेल व ती प्राप्ति जर ब्रम्हज्ञानाने होत असेल तर जगाची उत्पत्ति, स्थिति व लय या गोष्टीची चर्चा उपनिषदात का असू नये, हे समजत नाही. कारण आनंद ब्रम्हज्ञानाने मिळतो व ब्रम्हाचे ज्ञान व्हावयाचे म्हणजे ब्रम्ह हे जगाच्या उत्पत्तिस्थितिलयाचे कारण आहे, याचे ज्ञान झालेच पाहिजे.

डॉ. दफ्तरींच्या मते उपनिषदात कर्तव्याकर्तव्य शास्त्रच प्रामुख्याने आहे व त्या शास्त्रातील सिद्धान्तावर उपनिषदांचे आश्चर्यकारक मतैक्य दिसून येते. जर उपनिषदे हे जगदुत्पत्तिशास्त्र व अध्यात्मशास्त्र नव्हे तर त्यात जगदुत्पत्तीसंबंधी जे विचार जागोजाग विखुरलेले आहेत व ज्यांच्या अर्थाविषयी वाद माजले आहेत, ते कशाला ? त्याला डॉ. दफ्तरींचे उत्तर असे आहे की, 'नेहमी कर्म करावे' व 'सर्वांशी अद्वैतबुद्धीने वागल्याने अत्यानंदप्राप्ति होते' हे दोन स्वतंत्र प्रमाणांनीच सिद्ध होणारे सिद्धांतच स्पष्टपणे समजावून आणि ठसवून देण्याकरिताच केवळ

जगाच्या उत्पत्तीची हकीकत सांगितली. (परि. २७) यावरून हे उघड होते की, ज्या उपनिषदांचा खरा अर्थ लावण्याचा डॉ. दफ्तरी आटापिटा करत आहेत, त्या उपनिषदांना स्वतंत्र काहीच प्रामाण्य नाही. ती केवळ इतर प्रमाणांचा अनुवाद करतात.

विवर्तवाद

श्रीशंकराचार्यांचा विवर्तवाद लेखकाला अमान्य आहे. उपनिषदात परिणामवादच सांगितला आहे, अशी त्याची पक्की खात्री आहे. (पहा परिच्छेद ५३ वगैरे); पण तरी देखील परिच्छेद २७ मध्ये तो म्हणतो "म्हणून ब्रम्हच जीवनरूपाने शरीरात प्रवेश करते झाले ही केवळ कल्पनाच आहे." डॉ. दफ्तरींच्या मते उपनिषदे ही अनेकांनी लिहिली असल्यामुळे, त्यात परस्परविरोधी वचने असली तरी त्यांचा समन्वय करू नये; पण प्रस्तुतची 'औपनिषदिक जीवनसौख्य' ही एकटया दफ्तरींचीच कृति आहे. तीतहि अशी परस्परविरुद्ध विधाने आढळतात. त्यांचा तरी निदान समन्वय करावयास पाहिजे होता. तो झालेला नाही. अर्थात् त्याचे उघड कारण आहे. ते हे की, डॉ. दफ्तरी ज्या एका 'उपनिषदांचा बुद्धिवादी दृष्टीकोणातून अर्थ लावण्याच्या' कल्पनेने भारले गेले आहेत, तीच कल्पना मुळात विसंगत आहे. परिणामवाद हाच जर उपनिषदात विवक्षित आहे, असे जर लेखकाला सिद्ध करावयाचे होते, तर प्राचीन शास्त्रकारांनी परिणामवादावर घेतलेल्या आक्षेपांना त्याने उत्तरे द्यावयास हवी होती; पण तीहि गोष्ट प्रस्तुतच्या पुस्तकात अभावानेच आढळते.

ज्ञानकर्मसमुच्चय व कर्मसन्यास

ज्ञानकर्मसमुच्चयाबद्दलहि लेखकाने अशीच आग्रही वृत्ति दाखविली आहे. व त्यासाठी 'उपनिषदातील परस्परविरोधी वचनांचा समन्वय करू नये' हा आपला पहिला सिद्धान्त बाजूस ठेवला आहे. (पहा पान १०६ परि. ८८) वास्तविक त्याने आपल्या बुद्धिवादी पद्धतीस अनुसरून अनाग्रही वृत्तीने, असे म्हणावयास पाहिजे होते, की "उपनिषदात कर्मसन्यासवाद व ज्ञानकर्मसमुच्चयवाद हे दोन्ही तितक्याच स्पष्टपणे सांगितले असल्यामुळे, 'विरोधे तु विकल्पः' या न्यायाने ज्यांना जो मार्ग पसंत पडेल, त्या मार्गाने त्याने जावे," मात्र या सर्व विवेचनावरून वाचकांची एवढी खात्री पटते, की डॉक्टरसाहेब हे देखील इतराप्रमाणेच कोणत्या ना कोणत्या (म्हणजे तथाकथित बुद्धिवादाच्या, परिणामवादाच्या व ज्ञानकर्मसमुच्चय वादाच्या) मताच्या आहारी जाऊन उपनिषदांचा अर्थ लावीत आहेत.

चुकीचे अर्थ

आता डॉ. दफ्तरींनी केलेले उपनिषद्वचनांचे अर्थ कितपत बरोबर आहेत हे

पाहू. पृ. ५७ परि, ५४ मध्ये त्यांनी 'असद्वा इदमग्र आसीत्। ततो वै सदजायत।' वगैरे तैत्तिरीयश्रुतीचा अर्थ केला आहे. ते वाक्य डॉक्टरांनीच तळटीपेत दिल्याप्रमाणे असे आहे:— "असद्वा इदमग्र आसीत्। ततो वै सदजायत। तदात्मानं स्वयमकुरुत। तस्मात्तत्सुकृतमुच्यत इति। यद्वैतत्सुकृतम्। रसो वै सः। रसं ह्येवायं लब्ध्वानन्दी भवति"। डॉक्टर याचा अर्थ असा करतात. 'पूर्वी हे सर्व असत् म्हणजे अव्याकृत होते. त्यातून (तत्) व्याकृत असे सत् म्हणजे जीवात्मा उत्पन्न झाला. असताने स्वतःच (स्वयम्) आपल्याला (आत्मानम्) सत् म्हणजे व्याकृत जीवात्मा केले म्हणजे अव्याकृताला व्याकृत केले म्हणून त्याला, म्हणजे त्या जीवाला सुकृत म्हणजे चांगले केलेले असे म्हणतात.' येथे वास्तविक 'तदात्मानं स्वयमकुरुत' येथील 'तत्'चा अन्वय मागील वाक्यांतील 'सत्' कडे जात असता दफ्तरींनी तो त्याहि मागील वाक्यातील असताकडे जोडला आहे. व अशा रीतीने 'सुकृत' व 'रस' हे शब्द ब्रम्हाला न लावता जीवाला लावण्याचा प्रयत्न केला आहे; पण ते या संदर्भात मुळीच बसत नाहीत. तसेच कठ. ४।१४ "यथोदकं दुर्गे वृष्टं पर्वतेषु विधावति। एवं धर्मान् पृथक पश्यन् तानेवानुविधावति॥" याचा अर्थ करतानाहि परि. ७० मध्ये 'ब्रम्हाचे धर्मजीवाच्या धर्माहून भिन्न आहेत, असे पाहणारा' असा अर्थ केला आहे. येथे लेखकाने मूळात 'धर्मान् पृथक् पश्यन्' असे असता 'ब्रम्हाचे धर्म जीवाच्या धर्माहून भिन्न' असा पदरचे शब्द घालून अर्थ केला आहे. वास्तविक त्याचा अर्थ ब्रम्हाचे धर्म ब्रम्हाहून वेगळे नाहीत असा आहे. पृ. १५२ वरहि बृहदारण्यकातील "अरे अस्य महतो भूतस्य निःश्वसितं यदृग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्वाङ्गिरस इतिहासः पुराणं विद्या उपनिषदः श्लोकाः सूत्राण्यनुव्याख्यानानि व्याख्यानानि अस्यैवैतानि निःश्वसितानि" "या वाक्यात अपौरुषेयत्ववाद नाही, हे सांगत असता यातील इतिहास म्हणजे भारत व रामायण, पुराणे म्हणजे अष्टादशपुराणे, सूत्रे म्हणजे प्रचलित सूत्रे वगैरेसारखे अर्थ केले आहेत. आता बृहदारण्यकोपनिषद् हे डॉक्टरांच्या मते (पहा पृ. ३ परि. ५)" सर्वात जुन्या उपनिषदापैकी एक आहे. म्हणजे अर्थातच ते या सर्व वर उल्लेखिलेल्या ग्रंथापूर्वीचे आहे, हे उघड आहे. मग अशा "सर्वात जुन्या" बृहदारण्यकात या ग्रंथाचा उल्लेख आहे. असे मानण्याची आपत्ति येते. म्हणून येथे असलेल्या इतिहास, पुराण, विद्या, सूत्र, अनुव्याख्यान, व्याख्यान, वगैरेंचा अर्थ वेदातीलच निरनिराळी वचने असा घेणे सयुक्तिक आहे. आणि डॉ. दफ्तरी जर हे वचन प्रमाण मानीत असतील तर त्यांनी अपौरुषेयत्ववादाचा स्वीकार केला, असे म्हणणे भाग आहे. कारण येथे वेद हे ब्रम्हाचे निःश्वसित आहे, असे सांगितले आहे. येथे ते कोणाचीहि कृति आहे, असे म्हटलेले नाही; कारण श्वासाशिवाय निश्वास होऊच शकत नाही. वेद हे ब्रम्हाने प्रलयकाली श्वासरूपाने आत ओढून घेतले व सृष्टिकाली निश्वासरूपाने बाहेर सोडले, असा त्या वाक्याचा वास्तविक अर्थ आहे. संदर्भ सोडून केलेल्या अर्थाची

अनुक्रमणिका

ही केवळ उदाहरणे म्हणून येथे दिली आहेत. जास्त उदाहरणे विस्तारभयास्तव दिली नाहीत.

मरणोत्तर स्थिति

मरणोत्तर स्थितीसंबंधीचे डॉ. दफ्तरींचे विवेचनहि काहीसे चमत्कारिकच आहे. उपनिषदातून या विषयाबद्दल ऐकमत्य नाही. असे का ? तर त्याला दफ्तरींचे उत्तर असे की "मेल्यानंतर काय होते, ते मरणापूर्वी समजणे शक्य नाही. आणि आपली स्थिति कशी आहे, ते जिवंत असलेल्या कोणासहि मेलेला मनुष्य सांगू शकत नाही. म्हणून मृत्यूनंतरच्या स्थितीविषयी निश्चित ज्ञान होऊ शकत नाही, केवळ कल्पना करणे किंवा अनुमान करणे एवढेच शक्य आहे. कल्पना किंवा अनुमाने भिन्न असू शकतात म्हणूनच ही भिन्न मते उत्पन्न झाली." (पृ. १४८ परि. ११४). मेल्यानंतर काय होते ते मरणापूर्वी समजणे शक्य नाही, ही गोष्ट डॉ. दफ्तरींनी विनाकारण गृहीत धरली आहे; कारण ज्या उपनिषदांचा अर्थ डॉक्टर लावण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्या छांदोग्यासारख्या "जुन्या" उपनिषदातूनसुद्धा ब्रम्हज्ञानाने सर्व ज्ञान होते–एक विज्ञानाने सर्व विज्ञान होते–अशी शेकडो वचने आहेत. मग अशा ब्रम्हज्ञान्यांना झालेले मरणोत्तर स्थितीचे ज्ञान 'केवळ कल्पना किंवा अनुमान' या सदरात घालता येईल काय ? आता प्रश्न राहतो तो उपनिषद्वाक्यातून आढळून येणाऱ्या या मुद्द्यावरील मतभेदाचा. उपनिषदात परोक्षवाद प्राचुर्याने आहे, ही गोष्ट डॉ. दफ्तरी यांनीहि मान्यच केली आहे. (पहा पृ. ११ परि. १५). आणि तो उलगडण्यात खुद्द त्यांनीहि "संपूर्णत: यश आलेले नाही," अशी कबुलीहि दिली आहे. म्हणून अशा स्थळी आपातत: जरी मतभेद अथवा विरोध वाटत असला तरी त्यात परोक्षवाद आहे, हे ध्यानी घेऊन स्वतंत्र बुद्धीने तो उलगडण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा 'इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत्। बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामयं प्रतरिष्यति ॥' या वचनाला अनुसरून उलगडणे, हेच युक्त आहे. पृ. १४५ परि. ११० मध्ये डॉ. दफ्तरी म्हणतात, "एकूण याज्ञवल्क्याच्या मते सर्वच ज्ञानी किंवा अज्ञानी जीव मृत्युकाळी ब्रम्हात मळून जाऊन पुन: जन्मत नाहीत. बुद्धिवादी मनुष्यास हेच मत सर्वात जास्त पटेल असे आहे." बुद्धिवादी मनुष्यास यात खरोखर काय पटण्यासारखे आहे, हेच कळत नाही. ज्ञानी–अज्ञानी सर्वांना जर मृत्यूनंतर एकच गति प्राप्त होत असेल तर माणसाने–बुद्धिवादी माणसानेहि ज्ञानप्राप्तीची का धडपड करावी, उपनिषदे तरी का वाचावी व त्याहून पुढे म्हणजे डॉ. दफ्तरींचे हे 'बुद्धिवादी उपनिषद्-भाष्य' वाचून डोक्याला व्यर्थ शीण तरी का द्यावा ?

बुद्धिवाद म्हणजे काय ?

पुस्तकाच्या प्रारंभीच डॉ. दफ्तरींनी म्हटल्याप्रमाणे या पुस्तकात उपनिषदांचा

खरा अर्थ काय आणि अखिल मानव जातीचे जीवनसौख्य कशात आहे, याचा अत्यंत निर्भेळ बुद्धिवादाने विचार केला आहे; पण बुद्धिवाद म्हणजे काय याचा खुलासा मात्र स्पष्टपणे कोठे आढळत नाही. 'बुद्धीस पटेल तसे करणे' असा त्याचा अर्थ डॉक्टरांना अभिप्रेत असावा असे दिसते. पण बुद्धीस पटेल तसे करणे म्हणजे कोणाच्या बुद्धीस पटेल तसे ? हे मात्र अजिबात गूढ आहे. कोणा एका किंवा अनेक विशिष्ट व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या बुद्धीस पटेल ते करणे म्हणजे बुद्धिवाद, असे मानले तर त्यांच्याच बुद्धीस जे प्रमाण वाटेल तेच इतरांनी का करावे, इतरांनी आपली बुद्धि त्यांचेकडेच का गहाण टाकावी याचे उत्तर मिळत नाही. बरे प्रत्येकाने आपापल्या बुद्धिस जे पटेल तसे वागावे; असे मानले, तर प्रत्येकाची बौद्धिक पातळी व कुवत भिन्न भिन्न प्रकारची असल्यामुळे एकाच्या वर्तणुकीचा दुसऱ्याचे वर्तणुकीशी कधीच मेळ बसणार नाही, असा अनवस्था प्रसंग येईल व समाजधारणाहि अशक्य होऊन बसेल.

या व अशा तऱ्हेच्या आणखी कितीतरी शंका अनुत्तरित राहत असल्यामुळे हे पुस्तक खरोखर बुद्धिवादीहि झालेले नाही. आता बुद्धिवाद म्हणजे नास्तिकवाद-चार्वाकियत असा जर कोणाला अर्थ करावयाचा असेल तर गोष्ट निराळी ! पण ते काहीहि असले तरी डॉ. दफ्तरींनी हे पुस्तक लिहून बुद्धिवाद्यांच्याहि विचारांना जोराची चालना दिली आहे, हे मात्र प्रत्येकाने कबूल केले पाहिजे. एरव्ही उपनिषदे व इतर शास्त्रग्रंथ यांचा विचारहि न करणारे तथाकथिक बुद्धिवादी या पुस्तकामुळे त्यांच्या अभ्यासास प्रवृत्त होतील, हाहि फायदा काही कमी महत्वाचा नाही.

शेवटी डॉ. दफ्तरींनी "स्वतःस फार कष्ट देऊन स्वतःच्या बुद्धीने, उपनिषदांचे मंथन करून" हे ज्ञान काढल्याचे नमूद केले आहे; पण पुस्तक वाचून त्यात उपनिषदांचे 'मंथन' करण्याऐवजी उपनिषदांचे 'मथन'च जास्त झाले आहे, असे वाटल्यावाचून राहत नाही. वर जी काही थोडीफार टीका केली आहे, ती डॉ. दफ्तरींच्या मतावर केली आहे. त्यात त्यांचेबद्दल अनादर दाखविण्याचा किंवा त्यांच्या संशोधक बुद्धीचा अधिक्षेप करण्याचा मात्र प्रस्तुत लेखकाचा मुळीच उद्देश नाही.

★ ★ ★

अनुक्रमणिका

कालियामर्दन — एक रूपक

लेखक— श्री. गणपतराव बुटी

पुराणाच्या अभ्यासावरून मला अशी एक कल्पना सुचली की, व्यासादिकां-सारख्या मुनीवरांनी त्यांच्याच योग्यतेच्या धीरगंभीर प्रकृतीच्या महाभागांना काही घटनांची उकल व्हावी, परंतु उतावळ्या प्रकृतीच्या बहुजन समाजापासून त्या गुप्त रहाव्या ह्याकरिता त्यांनी अटोकाट प्रयत्न केलेला दिसतो. याचे कारण असे दिसून येते की, त्या घटना समाजातील विवेकी कर्णधार व आधारस्तंभ अशा नेत्यांनी दूरदर्शीपणाने साधक बाधक विचार करून त्या हाताळाव्यात आणि त्यावर उपाय-योजना करावी. उलटपक्षी अधीर वृत्तीच्या लोकांस ह्या घटना कळल्यास ते विवेकी नसल्यामुळे त्यांच्याकडून होणाऱ्या सुधारणांच्या प्रयत्नात समाजाची घडीच विस-कटण्याचा संभव या द्रष्टयांना दिसून आला. आणि म्हणूनच त्यांना ह्या तंत्राचा अवलंब करावा लागला. याचे उदाहरण म्हणजेच 'कालिया मर्दना'ची घटना.

या घटनेचा सूक्ष्म विचार केल्यास असे दिसून येते की, कालिया नावाचा महाविषारी भुजंग नसून तत्कालीन समाजातील सत्ताधारी गटाच्या अनिष्ट वृत्तीचे ते एक प्रतीक होय. धर्माची ग्लानि झाली असता परमेश्वराला अवतार घ्यावा लागतो व देशकाल परिस्थितीपरत्वे धर्मात थोडाफार बदल करून पुनश्च समाज-धारणेकरिता धर्माची नवी घडी बसविण्यात येते. भगवान श्रीकृष्णांच्या अवतारा-पर्यंत धर्माचे कोणकोणते अंग विफल झाले होते ते पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

धर्मग्लानीचे स्वरूप

जरासंध शिशुपाल द्रुपद इत्यादि जुलमी राजांच्या दुर्वर्तनावरून राजधर्माचा ऱ्हास झालेला दिसून येतो. शंतनूच्या उदाहरणावरून भीष्मास झालेल्या अन्यायामुळें पितृधर्म उल्लंघिला. पुत्र देखील आपला धर्म कसा पाळीत नव्हते हे कंसाने आपल्या पित्यास बंदीवासात टाकून सिद्ध केले. मानवधर्माविषयी समाज कसा व किती उदास होता, हे विद्वान व आदरणीय द्रोणाचार्य व सुदामा यांच्या अठराविश्वे दारिद्र्यावरून कळून येते. यावेळी जर कोणाची चलती असेल तर ती म्हणजे जुलमी राजे व त्यांच्या आश्रित असलेला तोंडपुजा पुरोहितवर्ग. हा पुरोहितवर्ग राजांची मर्जी संपादन केल्यामुळे धनिक, वजनदार व सत्ताधारी बनला होता. दुर्दैवाने हा

पुरोहितवर्ग कूपमंडुक वृत्तीचा असल्यामुळे परिवर्तनशील अशा समाजास मार्गदर्शन करण्यास असमर्थ ठरला.

प्रजेवरील जुलूमजबरदस्तीमुळे समाज जेव्हा त्रस्त होतो, तेव्हा त्याच्या प्रतिकारार्थ बंड उभारण्यापूर्वी काही धार्मिक व दैविक उपायांनी आपले क्लेश दूर होण्याची शक्यता असल्यास प्रजेचे त्यादिशेने प्रयत्न होतात. हवालदिल झालेल्या समाजास वरील धार्मिक व दैवी उपाय करून पहाण्यास ज्यावेळी पुरोहितवर्गाचे सहकार्य नाकारल्या गेले, त्यावेळेस स्वाभाविकच धर्म हा समाजाच्या धारणेकरिता आहे की मूठभर सत्ताधारी गटांच्या योगक्षेमाकरिता आहे, अशा विरुद्ध दिशेने विचारास चालना मिळाली.

वेदव्यासांचे कार्य

वास्तववादाला अनुसरून वेदव्यासांनी जर पुरोहितवर्गाचा बहुजनसमाजाशी संघर्ष, ह्या स्वरूपात तत्कालीन समाजाचे चित्रण केले असते तर आज दिसून येणाऱ्या ब्राम्हण-ब्राम्हणेतर वादास कृष्णावतारापूर्वीच सुरुवात झाली असती. पण दूरदर्शी, विवेकी व संयमी नेते बहुधा क्रांति टाळण्याचाच प्रयत्न करितात. कारण समाजाची परत घडी बसविणे हे अत्यंत कठीण असते. त्यावेळच्या दळणवळणाची साधने व ज्ञानप्रसार यांचा विचार केल्यास समाजाची पुनर्रचना करण्यास कदाचित् हजार वर्षांचा काळहि लागला असता व तोपर्यंत समाज तमोअवस्थेत राहाता.

ही अनवस्था टाळण्याकरिताच द्रष्टयांनी कूपमंडुक वृत्तीला चिकटून असलेल्या प्रतीगामी पुरोहितवर्गास समुच्चयाने 'कालिया' अशी संज्ञा देऊन समाजाचा, पुरोहितवर्गाचा आणि राज्यशासनाचा संघर्ष टाळला.

रूपकाचा अर्थ

आता 'कालियामर्दन' हे रूपक कसे, याच्या स्पष्टीकरणाचा विचार करू. युगपरत्वे मानवाची बौद्धिक प्रगति, मानसिक धारणा आणि शारीरिक शक्ति यांचा ऱ्हास होतो. म्हणून आपल्या धर्माचे स्वरूप युगांतरात भिन्न झालेले दिसून येते. कृतयुगात धर्माचे वैशिष्ट्य ध्यानधारणा, त्रेतायुगात यज्ञयाग, द्वापरात पूजोपचार आणि कलियुगात नामसंकीर्तन. धर्माच्या ह्या भिन्न वैशिष्ट्यावरून असे दिसून येईल की, तत्कालीन विवेकी समाजसुधारकांना क्रांति-अभिप्रेत नसल्यामुळे गत युगातील उपासनेवर निर्बंध टाकले नसले तरी ते, विद्यमान युगातील उपासनेचा पुरस्कार करीत असत. जर गत युगातील उपासनेचा निषेध त्यांनी केला असता, तर 'न बुद्धिभेदं जनयेदज्ञानांकर्म संगीनाम्' या गीतोक्तीला अनुसरून, त्यांच्याकडे दोष आला असता.

धर्म हा यमुना नदीच्या अनिरुद्ध प्रवाहाप्रमाणे वाहणारा असून त्याच्या

आश्रयाने मानववंशाने रागद्वेषादि विकारापासून अलिप्त राहून, प्रत्येक युगात व ठिकठिकाणी गोकुळासारख्या आनंदी, प्रेमळ व वैभवसंपन्न वसाहती वसाव्यात, हाच धर्माचा पवित्र संदेश व उदिष्ट हेतु होय. आणि त्यांच्या अशा पवित्र व संतत प्रवाहात कूपमंडुक वृत्तीचा आणि प्रतिगामी विचारसरणीचा पुरोहितवर्ग म्हणजेच व्यास महर्षींचा ' कालिया. '

परम कल्याणकारी धार्मिक तत्वांचा अशा पुरोहित वर्गाकडून स्वार्थांधतेमुळे झालेला विपर्यास म्हणजेच यमुना सरितेचे विषारी जल. पुरोहितवर्गाशी भगवान श्रीकृष्णाचा झालेला वादविवाद व त्यात त्या वर्गाचा झालेला पराजय म्हणजेच 'मर्दन.' कालियास भगवंताने करावयास लावलेले द्वीपांतर म्हणजे कूपमंडुक वृत्तीस चिटकून राहिलेल्या लोकांची हद्दपारी.

अशा रीतीने सुधारणा घडवून आणून श्रीकृष्णाने धर्मात परिवर्तन घडवून आणले व लोकांचे जीवन मंगलमय केले. इतकेच नव्हे तर पुढील जीवनातहि हाच पुरोगामी दृष्टिकोण ठेवून जुलमी राजांच्या बंदिवासातील अवमानित स्त्रियांची मुक्तता केली आणि स्वत: त्यांच्याशी विवाहवद्ध होऊन त्या अवमानित स्त्रियांना समाजात मानाचे स्थान प्राप्त करून दिले.

या समग्र विवेचनावरून द्वापर युगातील द्रष्टे आणि कलियुगाच्या प्रारंभीचे आद्य सुधारक भगवान श्रीकृष्ण होते, हे दिसून येईल.

★ ★ ★

वस्तु, घटना, क्षेत्र व ब्रह्म

लेखक– नारायण शास्त्री द्रविड
(स्नातकोत्तर तत्वज्ञान विभाग, नागपूर विद्यापीठ)

गेल्या अनेक शतकांच्या तात्विक विचारांच्या विकासाचा इतिहास लक्षपूर्वक वाचून त्याची भौतिक व इतर शास्त्रांतील विचारांच्या इतिहासाशी तुलना केली तर एक गोष्ट प्रामुख्याने दिसून येते ती अशी की, शास्त्रज्ञलोक काटेकोर प्रयोग व सूक्ष्म निरीक्षण यांच्या आधारे ज्या कल्पना वेळोवेळी जगापुढे मांडत असतात त्याच कल्पना कोणताही प्रयोग न करता व निरीक्षणाचीही खटपट न करता फक्त तर्कशुद्ध विचारांच्या मदतीनेच (व पुष्कळ वेळा शास्त्रज्ञांच्या डोक्यात त्या कल्पना शिरण्यापूर्वीच) तत्वज्ञ लोक शोधून काढतात. पण या कल्पनेचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग कसा करून घ्यावा ह्या गोष्टीचा विचार तत्वज्ञ लोक करीत नसल्यामुळे त्यांना या शोधाचे मिळावे तितके श्रेय मिळत नाही. या उलट, एखाद्या शास्त्रज्ञाने तत्वज्ञांना पूर्ण परिचित असलेली एखादी कल्पना प्रयोगाने सिद्ध करून दाखविली तर त्याचा शोध अगदी मौलिक स्वरूपाचा आहे असे समजले जाते व सर्व जगाचे त्या शोधाकडे लक्ष वेधते

या विधानाचे समर्थक असे असंख्य पुरावे प्राचीन व अर्वाचीन तत्वज्ञानातून विखुरलेले दिसून येतात. उदाहरणार्थ, भौतिक शास्त्रांतील परमाणूची कल्पना अगदी अलीकडची आहे. डॉल्टनने सर्व प्रथम परमाणूची कल्पना शास्त्रज्ञांपुढे मांडली. त्याच्यानंतर अनेक वर्षांनी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ थॉम्सन याला आपली परमाणूंच्या रचनेसंबंधीची परिष्कृत कल्पना मांडता आली. पण भारतीय नैयायिकांनी, सूक्ष्म-तम अशा दृश्यधूलिकणांचेही तुकडे असतात व त्यांची संख्या तीन आहे असे मत मांडून या अदृश्य तुकड्यांचेही तुकडे असतात व ते अविभाज्य असतात अशी परमाणुसंबंधीची फार मूलगामी अशी कल्पना शेकडो वर्षांपूर्वी जगापुढे मांडली होती. आजच्या शास्त्रज्ञांनी परमाणूंच्या Atomic number बद्दल जे सिद्धान्त मांडले आहेत ते भारतीय नैयायिकांना सुचले नाहीत हे खरे; पण याची अनेक कारणे असू शकतात. नैयायिकांचे प्रश्न वेगळे होते व त्यांची जगाकडे पाहण्याची दृष्टिही वेगळी होती. यामुळे अदृश्य अणूंच्या घटकांच्या संख्येवरूनच विश्वाच्या विविधतेची उपपत्ति लावणे त्यांना योग्य वाटले नसावे. तरी पण अणूंच्या घटकांच्या संख्येकडे त्यांचे लक्ष गेलेच नाही असे मात्र म्हणता येत नाही.

अनुक्रमणिका

जगाची उत्पत्ति शक्तिरूप तत्वापासून झाली हा आजच्या शास्त्रीय निष्कर्षाशी जुळणारा तत्वज्ञानाचा सिद्धान्त वरील विधानाचा दुसरा पुरावा आहे. यावर कोणी असे म्हणेल की भारतीय तत्वज्ञांची शक्ति कल्पना व शास्त्रज्ञांची Energy यांत पुष्कळ फरक आहे. असेलही. पण या दोन कल्पनातील साम्याचा बारकाईने विचार केल्यास व तात्विक व शास्त्रीय दृष्टिकोणातील मूलभूत भेद जमेस धरल्यास तत्वज्ञांना आधुनिक कल्पनेचा शोध लावल्याचे थोडे तरी श्रेय देणे गैर होणार नाही.

पण आपल्याला येथे, काही जुन्या कल्पनेच्या बाबतीतले तत्वज्ञान व आधुनिक शास्त्रे यांचे वरकरणी साम्यच पडताळून पहावयाचे नाही तर काही, क्रान्तिकारक ठरलेल्या अत्याधुनिक शास्त्रीय विचारांच्या बाबतीतही या साम्याचा पडताळा घ्यावयाचा आहे व त्यावरून भविष्यकाळात विज्ञानाच्या क्षेत्रात काय फेरबदल घडून येऊ शकतात याचा अंदाज बांधावयाचा आहे. हा प्रयत्न तात्विक स्वरूपाचा असल्यामुळे त्याला प्रयोग व निरीक्षणाचा आधार नाही म्हणून कोणी नाक मुरडण्याचे कारण नाही.

वस्तु–कल्पना

गेल्या एक शतकात विज्ञानाच्या क्षेत्रात जी महत्वाची वैचारिक क्रान्ति घडून आली ती वस्तूच्या कल्पनेशी संबंधित आहे. न्यूटनपूर्वीचे व त्यानंतरचे भौतिक विज्ञान सामान्य माणसाच्या वस्तुसंबंधी कल्पनेला चिकटून होते. या वस्तुकल्पने-प्रमाणे जगात दोन प्रकारचे पदार्थ असतात. एक पूर्णपणे एकजिनसी (Homogeneous) व सर्वत्र व्याप्त असा. याला अवकाश, Space, शून्य, empty space किंवा Ether असे म्हणतात. दुसऱ्या प्रकारचे पदार्थ हे बहुजिनसी (Heterogeneous) असून ते कमी जास्त वस्तुमाना (mass)ने घडविलेले असतात. हेच पदार्थ वेगवेगळ्या स्थूल वस्तूंच्या रूपाने विश्वात किंवा अवकाशात ठिकठिकाणी विखुरलेले आढळून येतात. स्थूल पदार्थ स्थूलतेमुळे नजरेत भरतात पण अवकाशासारखे सर्वत्र व्याप्त असे पदार्थ सूक्ष्मतेमुळे वेगवेगळ्याने ओळखूही येत नाहीत. म्हणून सामान्य माणसाचे व शास्त्रज्ञाचेही या सूक्ष्म पदार्थांकडे गेल्या शतकापर्यन्त फारसे लक्ष गेले नाही. फक्त तत्वज्ञ लोकच या काळातहि सूक्ष्म पदार्थांच्या अस्तित्वाची न चुकता दखल घेत असत. स्थूलवस्तु व सूक्ष्म वस्तु यामधील हा महत्वाचा फरक लक्षात घेऊन शास्त्रज्ञांनी वस्तुसंबंधीची जी कल्पना या काळात मांडली ती कल्पना सामान्य माणसाच्या पूर्ण परिचयाची असल्यामुळे तिच्या खरेपणासंबंधी फारसा कधीच आक्षेप घेतला गेला नाही. या कल्पनेप्रमाणे वस्तुमान (Mass) असणे व सूक्ष्म अवकाशाचा काही भाग व्यापणे, हे वस्तूचे लक्षण ठरले. तसेच स्थूल वस्तु एकजिनसी असणे शक्य नसल्यामुळे

तिच्यात अनेक गुणांचा प्रत्यय येणे हे वस्तु स्वभावाला धरूनच आहे असे मानले जाऊ लागले. पण पुढे वस्तूच्या रचनेसंबंधी जसजसा सूक्ष्म विचार होऊ लागला तसतसा या वस्तुकल्पनेचा अपुरेपणा शास्त्रज्ञांच्या नजरेस येऊ लागला. वस्तूत आढळून येणारे गुण (रूप, गंध, स्पर्श वगैरे) वस्तूच्या घटक अवयवांवर (म्हणजे त्यांच्या संख्येवर किंवा त्यांच्या वेगवेगळया प्रकारच्या संनिवेशावरच) अवलंबून असणे शक्य नाही. कारण काही गुण (रंग, स्पर्श, वगैरे) वस्तूत एक-सारखे दिसून येत नाहीत व या गुणांची वस्तूच्या विभिन्न रचनेवरून उपपत्ति लावता येत नाही. म्हणून प्रत्यक्ष व प्रयोगांचा पाठपुरावा करणाऱ्या शास्त्रज्ञां-नाही वस्तूच्या गुणांचे मुख्य व अमुख्य गुण, असे भाग पाडावे लागले. त्यापैकी अमुख्य गुण वस्तूत दिसत असून देखील ते वस्तूंचे नसावेत असे चाचरतच शास्त्रज्ञ बोलू लागले. या उलट मुख्य गुण परिमाण, जाडय वगैरे वस्तूच्या बहु-जिनसी Heterogeneous व Discrete स्वरूपावर आधारलेले असल्यामुळे त्याचा शास्त्रज्ञांनी पूर्णपणे स्वीकार केला. या प्रमाणे भौतिक शास्त्राच्या स्थूल वस्तुनिष्ठ दृष्टिकोणाला फारशी मुरड न घालता शास्त्रज्ञांना आपली वस्तुविषयक परंपरागत कल्पना बराच काळपर्यन्त कायम ठेवता आली.

तत्वज्ञांचे बौद्धिक धाडस

पण या काळात तत्वज्ञ लोक परंपरागत कल्पनेची री ओढत बसून राहिले नाहीत. वस्तूसंबंधीच्या वैज्ञानिक कल्पनेचा विकास होण्याच्या फार पूर्वी पाश्चिमात्य राष्ट्रात अरिस्टॉटलने Substance चे बरेच प्रगल्भ असे तत्वज्ञान जगापुढे मांडले. त्याच सुमारास भारतीय नैयायिकांनी गुण, कर्म, सामान्य, विशेष व समवाय यांचे अधिष्ठान असलेल्या द्रव्याचे सांगोपांग विचार करणारे न्याय दर्शन रचले. न्यूटनच्या समकालिक व परवर्ती शास्त्रज्ञांप्रमाणे या तत्वज्ञांनी अमुख्य गुणांच्या बाबतीत आपली भूमिका अस्पष्ट ठेवली नाही. अमुख्य गुणाचे वस्तूत अस्तित्व स्वीकारल्यामुळे शास्त्रज्ञांवर ओढवणारी आपत्ति (वस्तूंचे द्विविध वर्गीकरण सोडून देऊन वस्तू अनेकविध आहे, असे मानण्याची) भारतीय व पाश्चात्य तत्वज्ञांनी मुळातच, वस्तू अनेकविध. आहेत असे मत प्रामाणिकपणे मान्य करून दूर सारली. शास्त्रज्ञांच्याने अशा प्रकारचे बौद्धिक धाडस अगदी परवा परवापर्यंत देखील करवले नाही,

पण तत्वज्ञ लोक द्रव्यांच्या पूर्ण विकसित कल्पनेपर्यन्त पोहोचूनही तेथे स्थिरावले नाहीत. अमुख्य गुणांचा त्यांनी बारकाईने विचार करण्यास सुरवात केली. त्या-वरून त्यांना असे दिसून आले की, वस्तुचे स्थिर, स्वतंत्र व व्यक्तिनिरक्षेप असे आढळणारे स्वरूप वस्तुतः तसे नाही. क्षणोक्षणी बदलणाऱ्या संवेदनेच्या काल्पनिक एकीकरणानेच वस्तूंचे स्थिर व एकजिनसी असे स्वरूप तयार होते. म्हणजे वस्तु ही वस्तु

अनुक्रमणिका

नसून अनेक घटनांचा (Events) पुंज आहे; या वस्तुघटक घटना संवेदनारूप (Impressions) होत, असे पाश्चिमात्य तत्वज्ञांनी म्हटले. पण भारतीय (बौद्ध) पंडितांनी या घटना शुद्ध स्वलक्षण म्हणजे आत्मपूर्ण व क्षणिक अशा अवस्थाच आहेत, असे पाश्चिमात्य पंडितांच्याही पुढे जाऊन प्रतिपादन केले. द्रव्य विचारांतील स्थैर्याची कल्पना, तिच्यातील तात्विक दोष दिसून आल्याबरोबर या विद्वानांनी अजिबात सोडून दिली. बौद्ध विद्वानांचे या बाबतीतील धाडस व सूक्ष्म दृष्टि हे गुण वाखाणण्याजोगे आहेत. त्रियामात्मक (Three dimensional) स्थिर वस्तूशी अमुख्य गुणाच्या रूपाने सतत परिवर्तनशील वैयक्तिक संवेदनांचा संबंध दिसून आल्याबरोबर सर्व परिवर्तनाचा अधिष्ठान असलेला जो काल व त्याचे प्रतीक असलेले जे व्यक्तीचे चैतन्य, या दोन्ही तत्वांचा वस्तु-कल्पनेत समावेश करून बौद्ध पंडितांनी 'वस्तू म्हणजे गुण, गुण म्हणजे अवस्था, अवस्था म्हणजे क्षण, क्षण म्हणजे संवेदना व संवेदना म्हणजे आत्मा' असे बाह्य व आभ्यन्तर विश्वाला स्थलकालासमवेत एका सूत्रात गोवणारे फार महत्वाचे समीकरण मांडले.

सापेक्षतावाद

हीच गोष्ट जरा निराळ्या तऱ्हेने व जरा वेगवेगळ्या स्वरूपात आईन्स्टाईनच्या सापेक्षतावादाने साधली असे म्हणण्यास हरकत नाही. न्यूटनच्या गुरुत्वाकर्षण सिद्धान्ताने पृथ्वी व तिच्या आसपासच्या जगाचे स्वरूप द्रव्य कल्पनेच्या आधारे चांगल्या तऱ्हेने स्पष्ट करून दाखविले होते. पण सर्व विश्वात वावरणाऱ्या प्रकाशाच्या प्रसाराचे समाधानकारक असे स्पष्टीकरण गुरुत्वाकर्षण व त्याला आधारभूत असलेली द्रव्यकल्पना यांना देता आले नाही. पण या कल्पनेची ही उणीव न्यूटननंतर तीनशे वर्षांनी शास्त्रज्ञांना प्रथम तीव्रतेने जाणवली. अंतराळातून येणाऱ्या प्रकाशाच्या वक्रीभवनाचे परंपरागत वस्तुकल्पनेच्या मदतीने समर्थन करणे शास्त्रज्ञांना जड वाटू लागले. अशा वेळी परंपरागत वस्तुकल्पना सोडूनच दिली पाहिजे, असे धाडसाने सांगणारा आईन्स्टाईन पुढे आला व त्याने वस्तु ही त्रियामात्मक नसून ती चतुरायामात्मक (Four dimensional) म्हणजे घटनास्वरूप आहे असा अगदी नवा (तत्वज्ञांना नव्हे) दृष्टिकोण शास्त्रज्ञांपुढे मांडला. रूढिवादी शास्त्रज्ञांचा असा समज होता की दोन किंवा अधिक समकालिक Contemporary वस्तूमधील कालकृत संबंध (भूत, भविष्य वर्तमान, समकालिकत्व वगैरे) सारखेच असतात. आईन्स्टाईनने असे सिद्ध करून दाखविले की वस्तूला घटनारूप मानल्याबरोबर हा सारखेपणा नाहीसा होतो. कारण घटनास्वरूप वस्तूंमधील संबंध त्या त्या वस्तूच्या Frame of reference वरच अवलंबून असतो. भारतीय तत्वज्ञांनी हाच विचार जरा निराळ्या तऱ्हेने पूर्वीच मांडला होता. त्यांनी आईन्स्टाई-

प्रमाणे प्रकाशाच्या गतीला वैश्विक स्थिर तत्व न मानता चेतनाप्रवाहाला Frame of reference मानून त्यावरून वस्तूचे स्वरूप ठरवण्याचा प्रयत्न केला होता. आईन्स्टाईन व भारतीय बौद्ध यांच्या भूमिकेतील या भेदाला इतरही काही कारणे आहेत. उदाहरणार्थ, गणितज्ञांनी सापेक्षतावादाच्या उदयापूर्वीच अनेक (तीनहून अधिक) आयामात्मक अवकाशाचे गणित बसविले होते. त्यामुळे आईन्स्टाईनला चतुरायामात्मक वस्तूच्या कल्पनेपर्यंत अनायासे जाता आले. बौद्धांना अवकाशाचे गणित माहीत नव्हते तरीपण ज्या बुद्धीच्या मदतीने राइमानसारख्या गणितज्ञांना अनन्त आयामाच्या अवकाशाची कल्पना करता आली त्याच बुद्धीचा वस्तुस्वरूपांशी जो जिव्हाळ्याचा संबंध आहे तो ओळखून बौद्धांनी वस्तूंच्या जागी स्वलक्षण क्षण रूप घटना स्कंधाची स्थापना केली.

क्षेत्रकल्पना

आजचे शास्त्र आईन्स्टाईनच्या घटना कल्पनेच्याही बरेच पुढे गेलेले आहे. आता घटनेची जागा Field किंवा क्षेत्रकल्पना घेऊ पहात आहे. सापेक्षतावादाने गुरुत्वाकर्षणाला न सुटलेले असे एक कोडे सोडवले. पण त्याला विश्वातील विभिन्न प्रकारच्या (Electro magnetic, gravitational इत्यादि) प्रक्रियेची सर्वसामान्य अशी उपपत्ति लावता आलेली नाही. म्हणून घटनेच्या ऐवजी क्षेत्राची व्यापक कल्पना मांडून तिच्यात वेगवेगळ्या वाटणाऱ्या सर्व प्रक्रियेचा समावेश करून टाकावयाचा अशा विचाराने प्रेरित होऊन आईन्स्टाईन जन्मभर संशोधन करीत होता. असे म्हणतात की सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ हाइसेन बर्ग याने एक सर्वसामान्य क्षेत्रसिद्धान्त मांडण्यात यश मिळविले आहे. घटनेच्या कल्पनेवरून शास्त्रज्ञांना क्षेत्रकल्पने (Field theory) कडे का यावे लागले याची अनेक महत्वाची व समजण्यास दुरूह अशी कारणे आहेत. त्या सगळ्यांचा येथे उल्लेखही करणे शक्य नाही. पण सामान्य शब्दात या वैचारिक स्थित्यंतराचे असे कारण सांगता येईल की 'घटने'ची कल्पना पृथ्वी व पृथ्वीजवळच्या संकुचित विश्वाला लावता जरी आली तरी चतुरायामात्मक विशाल विश्वाला ती कल्पना लागू करण्यासारखी नाही. या विश्वातला अवकाश (Space) व त्यांतील वस्तु (Matter) हे एकमेकापासून पृथक करण्याजोगे राहत नाहीत. या विशाल विश्वात (Interstellar Universe) जे फेरबदल होतात ते वेगवेगळ्या स्वयंपूर्ण घटनेच्या अन्योन्यक्रियेमुळे होत असतात असे म्हणणे चूक आहे. शिवाय विश्वाच्या निरनिराळ्या क्षेत्रात (Regions) जे वेगवेगळ्या प्रकारचे फेरबदल होतात त्याचे सर्वसामान्य असे एक स्पष्टीकरण घटनाकल्पनेच्या आधारे देता येत नाही. म्हणून विश्वात आढळून येणाऱ्या वेगवेगळ्या प्रभावी क्षेत्रांचे सर्वसाधारण असे स्वरूप ठरवून, गुरुत्वाकर्षण व इतर सर्व प्रक्रियांना या स्वरूपाशी जोडणारे व्यापक असे समीकरण, गेल्या तीस वर्षापासून मोठमोठे शास्त्रज्ञ बसवू पाहात आहेत. या संभाव्य क्षेत्रसिद्धान्तालाच Unified field theory असे म्हणतात.

तत्वज्ञांची आघाडी

तत्वज्ञाकडे वळल्यास या बाबतीत तरी त्यांनी शास्त्रज्ञांच्या पुढे आघाडी मारली नसावी. कारण क्षेत्रकल्पना ही विज्ञानाच्या क्षेत्रातली फार वरच्या दर्जाची कल्पना असल्याने तत्वज्ञांना तिचा गंधही असणे शक्य नाही, असेच कोणीही म्हणेल. पण जरा सूक्ष्म विचार केल्यास क्षेत्राचीं शास्त्रीय कल्पना ही भारतीय पंडितांनी शेकडो वर्षापूर्वीच्या आपल्या ग्रंथात मांडून ठेवली आहे असे दिसून येईल. या कल्पनेच्याही निर्मितीचे श्रेय बौद्धांनाच द्यावे लागेल. योगाचार बौद्धांनी जगाची उत्पत्ति किंवा विकास विज्ञानापासून होतो, या मताचे प्रतिपादन करताना विज्ञानाचे, आलय व प्रवृत्तिविज्ञान, असे दोन प्रकार वर्णिले आहेत. यापैकी आलयविज्ञान अधिष्ठान असून त्यातून जगातल्या सर्व वेगवेगळया प्रक्रिया स्थलकालासमवेत एका विशिष्ट क्रमाने प्रकट होतात, असे बौद्धांचे म्हणणे आहे. या आलय विज्ञानांतून विकास पावणाऱ्या विज्ञानांना प्रवृत्ति–विज्ञान अशी सर्वसामान्य व अर्थपूर्ण संज्ञा त्यांनी दिलेली आहे. या संज्ञेवरून, आलयविज्ञानातून बाहेर पडणाऱ्या प्रक्रिया जशा क्रियात्मक आहेत त्याचप्रमाणे त्यातून उत्पन्न होणाऱ्या घट, पटात्मक वस्तूही क्रियात्मक – म्हणजे घटनात्मक–आहेत असे सिद्ध होते. प्रवृत्तिविज्ञानाच्या या व्यापक कल्पनेच्या द्वारे योगाचारांनी वैभाषिकांच्या घटनात्मक वस्तूंना आपल्या तत्वज्ञानात सामावून घेतले. आलयविज्ञानाचे वर्णन वाचल्यास असे वाटते की, बौद्धांनी आधुनिक क्षेत्रकल्पनेची सर्व वैशिष्टये या तत्वात अन्तर्भूत केलेली आहेत. आलयविज्ञान हे एका वाहत्या जलाशयाप्रमाणे सतत प्रवर्तमान असते असे बौद्ध म्हणतात. पण वैश्विक प्रक्रिया त्यातून बाहेर पडण्यापूर्वी एखाद्या जलाशयामधे भिन्नभिन्न जलौघांच्या परस्पर आघात–प्रत्याघाताने जसे आवर्त निर्माण होतात त्याचप्रमाणे आलयविज्ञानातच बीजरूपाने विद्यमान अशा वासनेच्या द्वारे त्यात प्रक्षोभ होतो. त्यामुळे त्यातून पहिल्या प्रथम विपाक परिणामाची उत्पत्ति होते. (वासना हा बौद्धांचा पारिभाषिक शब्द आहे, हे येथे लक्षात ठेवले पाहिजे). विपाक परिणाम हा शब्द सर्व प्रकारच्या वैश्विक प्रक्रियेच्या सामान्य स्वरूपाचा निर्देश करतो. पण आलयविज्ञानांत असणारी वासनारूप बीजे (ही विज्ञानाहून अगदी वेगळी अशी नाहीत) ही Time-bomb प्रमाणे ठराविक वेळी ठराविक स्वरूपाने क्षोभ पावणारी असल्यामुळे, वैश्विक प्रक्रियांच्या उत्पत्तीचे कारण आलयविज्ञानाबाहेर शोधण्याची गरज राहत नाही.

गणिती समीकरणे व तात्त्विक परिभाषा

क्षेत्र सिद्धान्ताला आलयविज्ञानाची कल्पना किती अनुरूप आहे, हे योगाचार दर्शनाच्या सखोल अभ्यासानेच कळू शकते. जुन्याला नेहमी नावे ठेवणाऱ्यांना आधुनिक शास्त्रातील किचकट व मोठमोठी समीकरणे पाहिल्यावर योगाचार व आधुनिक शास्त्र विचाराची वरील तुलना कदाचित अगदी पोरकटपणाची वाटेल.

पण समंजसपणे विचार केल्यास त्यांना असे दिसून येईल की, समीकरणे ही वस्तूचे गुणधर्म थोडक्यात व काटेकोरपणे निर्देशिण्याची शास्त्रीय साधने असून त्यांच्यामागे या गुणधर्मासंबंधीचा तात्त्विक विचार जर नसला तर ती समीकरणे निरुपयोगीच ठरतात. पण भारतीय पंडितांनी गणिताहून वेगळे, विचारांच्या अभिव्यक्तीला अत्यंत उपयुक्त, असे साधन (पारिभाषिक शब्दावलीच्या रूपाने) फार प्राचीन काळीच निर्माण केलेले असल्यामुळे त्यांना गणिताची फारशी गरज भासली नाही. म्हणून बौद्धांनी आपले विचार मॅक्स प्लँक किंवा आईन्स्टाईनप्रमाणे समीकरणात मांडले नाहीत येवढ्यावरूनच त्यांच्या विचारांना शास्त्रीय काही महत्व देता येत नाही, असे म्हणणे चूक ठरेल. बौद्धांच्या क्षेत्रकल्पनेचे वरील विवेचन फारच किरकोळ असल्यामुळे (जास्त स्पष्टीकरण या लेखात शक्य नाही) त्याने सूज्ञ वाचकांचे समाधान होणे शक्य नाही. जास्त माहितीसाठी वाचकांनी 'विज्ञप्तिमात्रतासिद्धि' सारखे ग्रंथ वाचले पाहिजेत.

क्षेत्रकल्पनेच्याहि पुढे

आधुनिक विज्ञान क्षेत्रकल्पनेच्या पलीकडे गेलेले नाही. पण भारतीय दर्शनांनी क्षेत्रकल्पनेलाही अपुरी ठरवून तिच्याही पुढे मजल मारली आहे असे दिसून येते. क्षेत्रापुढची कल्पना पर ब्रह्माची आहे. आधुनिक विज्ञान क्षेत्रसिद्धान्तापलीकडे जाऊ शकेल असे सध्या तरी वाटत नाही. याचे कारण असे की ज्या क्षेत्रांच्या गुणधर्माच्या परीक्षणावरून शास्त्रज्ञ सामान्य क्षेत्राच्या कल्पनेकडे वळले त्याहून अगदी वेगळ्या प्रकारच्या चैतन्याच्या क्षेत्राची दखल घेतल्याशिवाय शास्त्रज्ञांना सामान्य क्षेत्रकल्पनेत पुढे उद्‌भवू शकणाऱ्या तात्विक विसंगति दूर करणे शक्य नाही. पण त्यांचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोण जोपर्यंत कायम आहे तोपर्यन्त जड क्षेत्रापलीकडे त्यांना जाता येण्याची शक्यता वाटत नाही.

तत्वज्ञांना क्षेत्रकल्पनेत कोणती उणीव भासली व ब्रह्मकल्पनेने ती उणीव कशी भरून निघाली हे येथे पाहण्यासारखे आहे. वस्तुकल्पनेवरून घटनाकल्पनेकडे वळून तत्वज्ञांनी स्थलाशी कालाचा संबंध जोडला. त्यामुळे विशाल विश्वाच्या विचारातून उद्‌भवणाऱ्या काही तात्विक (व शास्त्रज्ञांच्या दृष्टीने वास्तविक) अशा विसंगति त्यांना नाहीशा करता आल्या व कालाला वस्तूंमधील बाह्य संबंध स्वरूप (External relation) किंवा त्यावरील बाह्य परिणाम (Influence) स्वरूप न लेखता वस्तूच्या अंतरंगातच कालाचा त्यांना समावेश करता आला. तसेच यापुढे जाऊन एकाच स्थलकालसंस्थानातून उद्‌भवणाऱ्या वेगवेगळ्या प्रक्रियांची बाह्य कारणावरून समाधानकारक उपपत्ति लावणे अवघड वाटल्यामुळे तत्वज्ञांनी आत्मनियंत्रित (Internally determined) आलयविज्ञानात्मक क्षेत्राची कल्पना पुढे आणली. या कल्पनेमुळे घटना व त्यांमधील

अन्योन्यक्रियेमुळे उत्पन्न होणारे परिणाम (Influences) या दोघांचा स्वनियंत्रित व क्रियात्मक (लाक्षणिक अर्थाने,) अशा एका तत्वात त्यांना समावेश करता आला. पण या कल्पनेतही वासनात्मक प्रेरकतत्वाची आलयविज्ञानरूप अधिष्ठानतत्वाशी पूर्ण सांगड बसू शकत नाही असे दिसून आल्यावर तत्वज्ञ लोक आलयविज्ञानरूप बाह्य क्षेत्र व वासनात्मक आन्तरिक क्षेत्र यांच्या पूर्ण एकीकरणा (Integration) कडे वळले. हे एकीकरण त्यांनी सत् असत् विलक्षण ब्रह्मकल्पनेच्या द्वारे साधले. ज्याप्रमाणे कालाचा वस्तूमधे प्रवेश केल्याने दोन समकालिक वाटणाऱ्या वस्तूंचे कालिकसंबंध शास्त्रज्ञांना (Indeterminate) अनिर्वचनीय मानावे लागले त्याचप्रमाणे बाह्य व आन्तरिकक्षेत्रांच्या एकीकरणासाठी चैतन्याचा वस्तुस्वरूपात समावेश केल्याबरोबर चैतन्याचे कार्य जो सत् असत् निर्णय त्या बाबतीतही वस्तूचे स्वरूप तत्वज्ञांना अनिर्वचनीय मानावे लागले. हा निष्कर्ष इतका तर्कशुद्ध आहे की तो टाळणे शक्यच नाही. कल्पनेचे वेगवेगळ्या आयामात (Dimension) जसजसे एकीकरण होत जाते तसतशी वस्तु त्या त्या आयामात अनिर्वचनीय होऊन बसते. उदाहरणार्थ, बिन्दूंच्या एकीकरणाने उत्पन्न होणारी रेषा कोणत्या बिन्दूत आहे, अशा प्रश्नाचे काही उत्तर देता येत नाही. तसेच रेषांच्या एकीकरणाने उत्पन्न होणारे पृष्ठभाग (Plane) कोणत्या रेषेत आहे हेही सांगता येत नाही. अनेक पृष्ठभागांच्या एकीकरणाने निर्माण झालेली स्थूलवस्तू कोणत्या पृष्ठभागात आहे ह्या प्रश्नाचे उत्तरही तसेच अशक्य आहे. याचप्रमाणे स्थूलवस्तु व काल यांच्या संघटनेतून निर्माण होणारी 'घटना' कोणत्या काळात आहे हाही प्रश्न निरर्थकच ठरतो. या पलीकडे जाऊन घटना व चैतन्य (तत्वज्ञांचे 'क्षेत्र') यांच्या एकीकरणातून निर्माण झालेले ब्रह्म 'आहे की नाही' असा प्रश्नही (कुठे व केव्हा हे प्रश्न ब्रह्माच्या बाबतीत उद्भवतच नाहीत; कारण स्थलकालांचे एकीकरण यापूर्वीच्या अवस्थेतच झालेले असते) वरच्या प्रमाणेच अनुत्तरणीय मानावा लागतो.

पण ब्रह्माच्या अनिर्वचनीयतेचा बरोबर अर्थ न समजल्यामुळे कित्येक विद्वानांनी वरील सिद्धान्तावर उलट सुलट आक्षेप घेतले आहेत. हाच सिद्धान्त एखाद्या शास्त्रज्ञाने मांडला असता तर अगदी निर्ढावलेल्या टीकाकाराचीही त्याच्याविरुद्ध ब्र काढण्याची छाती झाली नसती. पण बहुतेक तत्वज्ञांना आपल्या सत्य व क्वचित् प्रसंगी क्रान्तिकारक ठरलेल्या अशा कल्पनाही छातीठोकपणे लोकांपुढे मांडण्याचे धाडस नसल्यामुळे त्यांच्या प्रतिपादनाकडे दुर्लक्ष केले जाते किंवा त्याचा विपर्यास केला जातो.

अद्वैत वेदान्त

अद्वैत वेदान्ताने अत्यन्त प्रभावी पद्धतीने समर्थिलेली ब्रह्म व माया यांची कल्पना शास्त्रज्ञांनी देखील विचारात घेण्याजोगी आहे, हे वरील विवेचनावरून

दिसून येईल. जोपर्यन्त शास्त्रीय दृष्टीने या कल्पनेचा ऊहापोह होत नाही तोपर्यन्त वेदान्तातली सगळी चर्चा कुणालाही अवास्तव (Unrealistic) वाटण्याचाच जास्त संभव आहे. पण यासाठी शास्त्रज्ञांनी आपला परंपरागत वस्तुनिष्ठ दृष्टिकोण सोडण्याची व सत् व असत् या दोन परस्पर विरोधी समजल्या गेलेल्या (Categories) धर्माच्या पलीकडच्या अनिर्वचनीयतेकडे जाण्याची तयारी दाखविली पाहिजे. आधुनिक तर्कशास्त्रात (Intuitionism) (अनुभवाश्रित तर्कशास्त्र) व (Many valued logic) अनेकान्तवादाच्या रूपात अनिर्वचनीयतेचा शिरकाव झालेला आहे. गणितशास्त्रातही कुर्ट गोएडेलच्या (Undecidability theorem) अनिर्धार्यता सिद्धान्ताच्या रूपात अनिर्वाच्यवाद शिरू पहात आहे. भौतिकशास्त्राच्या (Theory of indeterminacy) अनिश्चयता सिद्धान्तही अनिर्वाच्यतेचे पूर्व रूप दिसू लागले आहे. आता फक्त, प्रामाणिकपणे अनिर्वाच्यवादाचा स्वीकार करून त्याचे व्यापक समीकरण बसवणे आवश्यक राहिले आहे. हे समीकरण बसवताना शास्त्रज्ञांना कदाचित् सापेक्षतावादाचा सिद्धान्त सोडावा लागेल व त्याबरोबरच आतापर्यन्त मान्य झालेले काही (Universal constants) वैश्विक स्थिराङ्क (उदाहरणार्थ, प्रकाशाची गति, वीलसबोरचा स्थिराङ्क h इत्यादि) सोडून देऊन दुसरे नवे स्थिराङ्क मांडावे लागतील. ह्या सर्व गोष्टी भविष्यकाळात घडून आल्यास आतापर्यन्त समान्तर असलेल्या शास्त्र व तत्वज्ञान यांच्या वैचारिक भूमिका एकरूप होऊन जातील, अशी आशा बाळगायला काही हरकत नाही.

★ ★ ★

अनामिकाची चिंतनिका

[एक वैचारिक आत्मकथा]

● लेखक– पु. य. देशपांडे ●

१ –

मी आता गारद होऊन, नामोहरम होऊन, पराभूत होऊन, भीष्मासारखा शरपंजरी पडलो आहे.–मरणाची, अखेरच्या क्षणाची प्रतीक्षा करीत.–माझ्या शरीराची बाह्य हालचाल अवरुद्ध झाली आहे. मला उठता येत नाही, बसता येत नाही, चालता येत नाही. माझे सर्व जिणे असहाय व परावलंबी होऊन बसले आहे. कोणी चार घास तोंडात घातले तर तेवढे मी चघळतो व आपल्या भुकेचे शमन करतो. कोणी चार थेंब तोंडात सोडले तर त्यांनीच तहान भागवितो. दुर्बल, असहाय, हताश, हतबुद्ध.–

जन्माला आलेली मुले मी पाहिलेली आहेत. त्यांच्या मातांना त्यांना पाहून पान्हा फुटतो. त्या त्यांना दूध पाजतात म्हणून ती जगतात, लहानाची मोठी होतात, परावलंबनातून मुक्त होऊन स्वावलंबी व स्वतंत्र होतात.

नुकतीच जन्माला आलेली मुले जितकी असहाय व परावलंबी असतात तितकाच मी, वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षी, असहाय व परावलंबी झालो आहे. पण मुलांना पाहून त्यांच्या मातांना जसा पान्हा फुटतो तसा मला पाहून कुणालाहि पान्हा फुटण्यासारखी माझी अवस्था नाही. कारण नुकत्याच जन्माला आलेल्या मुलाला भविष्यकाळ असतो; मला फक्त भूतकाळच उरलेला आहे. माझ्या मरणासन्न जीवनात कसल्याहि आशा–इच्छा–आकाक्षांची सफलता अपेक्षित नाही. नुकतेच जन्माला आलेले मूल म्हणजे आशा–इच्छा–आकाक्षांचे मूर्तिमंत प्रतीक. भवितव्याचे रमणीय स्वप्न. उलट, माझे शरपंजरी पडलेले जीवन म्हणजे सर्व आशा–इच्छा–आकाक्षांची मूर्तिमंत समाधि, भवितव्याची समाप्ति आणि भूतकाळात कायमच्या गडप होऊन बसलेल्या भल्याबुऱ्या घटनांची बेवंद भुताटकी.

असहायता व परावलंबित्व यांची सोवत घेऊनच मनुष्य जन्मास येतो आणि मरणकाली तेच त्याची सोबत करण्यास बाकी उरतात. इतर सर्व काही भूतकालात

गडप होऊन जाते. पण ज्यांची सोवत घेऊन मनुष्य जन्मास येतो आणि ज्यांची सोवत घेऊन तो आपली जीवनयात्रा संपवितो, त्यांना त्याच्या जीवनात कसलेहि स्थान दिले जात नाही. असहायता व परावलंबित्व यांच्याइतकी तुच्छ अवलक्षणे मानवी जीवनात दुसरी कोणती मानली जातात ?

जन्मकाल व मृत्युकाल ही मानवी जीवनरेषेची दोन टोके आहेत. पण ती दोन्ही सदैव अदृश्यच राहतात. एक अज्ञात भूतकालात स्मृतिपार झालेले व दुसरे अज्ञेय भविष्यकालात दडून बसलेले. या दोन्ही टोकांच्या विस्मरणाचा काल म्हणजेच जीवनकाल असे मानले जाते. आदि–अंताच्या विस्मरणावरच मानवी जीवनाची उभारणी केली जाते.

● ● ●

२ –

या शरपंजरी अवस्थेने माझ्या शरीराच्या बाह्य हालचालींना जितके अवरुद्ध करून टाकले आहे तितकीच मनाच्या आंतरिक हालचालींना तिने विमुक्तता प्राप्त करून दिली आहे. विस्मृतीच्या काळोखात दडलेला माझा जन्मकाल आणि क्षणाक्षणाला जवळ येणारा, आणि म्हणूनच कधीहि अविस्मृत न होणारा माझा मृत्युकाल, यांच्या अवगुंठनात दडलेले माझे जीवन माझ्या विमुक्त मनाचा एकच एक विषय होऊन बसले आहे.

असंख्य घटनांनी माझे जीवन व्याप्त झालेले आहे. पण त्यांपैकी एकाहि घटनेवर माझे मन फार वेळ स्थिरावू शकत नाही. जणू पाण्याच्या प्रवाहावरची पावले. पाण्याच्या प्रवाहावर पावलांची कसलीहि चिन्हे उमटत नाहीत. जीवनाच्या प्रवाहावर देखील कसल्याहि घटनांच्या खुणा कोरल्या जात नाहीत. जीवन येते आणि जाते. काल येतो आणि जातो. येणे आणि जाणे एवढ्यापुरते तरी काल आणि जीवन यांच्यात साम्य आहे.

काल हे एक कोडे आहे. ते आजवर कुणालाहि उकलता आलेले नाही. भूत वर्तमान, भविष्य–असे कालाचे भाग आपण पाडतो. आणि भूत वर्तमान होऊ शकत नाही, सदा भूतात जाणारा वर्तमान भविष्य होऊ शकत नाही व भविष्य काल सदैव अज्ञेयच राहतो, असे आपण मानतो. पण भूत कालात जे कायमचे गडप झालेले असते तेच कधीकधी वर्तमान जीवनावर अधिक प्रभाव पाडते आणि क्वचित् भविष्य घडविण्यासहि ते कारणीभूत झालेले दिसून येते. कधीकधी, वर्तमानातील एकादी घटना जीवनावर इतका विलक्षण प्रभाव पाडते की, त्यामुळे

अनुक्रमणिका

सारा भूतकाल अर्थशून्य झाल्यासारखा भासतो आणि भवितव्याची सारी बीजे त्या वर्तमान घटनेतच साठलेली आहेत, असे वाटू लागते. आणि कधीकधी तर मानवी दृष्टि काल्पनिक भविष्यावर इतकी केंद्रित होऊन बसते की, तिला सारा भूतकाल आणि सारा वर्तमानकाळ त्या भविष्यातील स्वप्नानेच रंगलेला आहे, असे वाटू लागते !

मनाला काही तरी **वाटणे** हेच जीवनाचे एकमात्र लक्षण असावे. काही तरी वाटत असते म्हणूनच आपण जिवंत आहोत असा अनुभव आपल्याला येतो. वाटणे संपले की जीवनहि आटोपले.

सदा **जात राहणे**, हा कालाचा धर्म. सदा **वाटत राहणे**, हा मानवी जीवनाचा धर्म. काल सदा जात असतो आणि मानवी मनाला सदा काही ना काही वाटत असते. पण पाण्याच्या प्रवाहावर पावले उमटत नाहीत तद्वत् कालाच्या प्रवाहावर मानवी भावना विचार कल्पना यांची चिन्हे उमटलेली दिसून येत नाहीत.

काल हे एक विशाल अंतराळ आहे. आकाशात भराऱ्या मारणाऱ्या पाखरांचे भ्रमण–मार्ग अंतराळावर जसे कोरले जात नाहीत तशाच मानवी भावना–विचार कल्पना यांच्या भराऱ्याहि कालाच्या अंतराळावर कोरल्या जात नाहीत.

कालगणनेच्या रूढ परिभाषेत माझा जीवनकाल त्रेपन्न वर्षांचा झाला आहे. आणखी काही दिवसात, काही महिन्यात अथवा, फार फार तर आणखी काही वर्षात माझे जीवन समाप्त होईल. मानव मर्त्य आहे म्हणून मानवी जीवनाला लहान–मोठी पण निश्चित अशी काल–मर्यादा आहे. मानवी जीवन कालाने मर्यादित आहे, पण काल मात्र कशानेच मर्यादित नाही. जीवनाला मर्यादित करणे एवढेच कालाचे कार्य आहे की काय कळत नाही.

जीवन मर्यादित करणे, अथवा ते मर्यादित आहे असे भासविणे, यापलीकडे कालाचा व जीवनाचा काही संबंध असेल असे मला तरी वाटत नाही. माझ्या आयुष्यात मला जर आधुनिक कालयंत्र, म्हणजे घड्याळ मुळीच दाखविण्यात आले नसते तर कालाचा व जीवनाचा काही संबंध आहे, याची मला जाणीवहि झाली नसती. मुले लहानाची मोठी झालेली मी पाहिली असती, झाडे लहानाची मोठी झालेली मला दिसली असती; दिवस–रात्रीचा क्रमहि मला जाणवला असता; तरी-पण त्यामुळे काल आणि माझे जीवन यांचा काही अन्योन्य संबंध आहे, याची जाणीव मला झाली असती किंवा नाही, याची शंका आहे. हळू चालणे व जलद चालणे, काम सावकाश करणे व भरभर करणे, यातील फरक मला जाणवला असता; पण त्यामुळे कालाचा माझ्या जीवनाशी जिव्हाळ्याचा संबंध आहे, हे मात्र मला मुळीच जाणवले नसते. हळू चालणे अथवा सावकाश काम करणे मला आवडले असते तर

ते चांगले आणि जलद चालणे व भरभर काम करणे हे वाईट, असे मी मानले असते, एवढेच. पण यात काल–कल्पनेपेक्षा माझ्या आवडी–निवडीचाच भाग महत्वाचा ठरला असता.

मी आता जितका विचार करतो, तितका मी पूर्वी कधीच केला नव्हता. कारण आता विचार करण्याशिवाय मला दुसरे काहीच करता येणे बाकी उरलेले नाही. आणि मी आता जितका विचार करतो तितके मला असे आढळून येते की, वस्तुतः कालाचा व जीवनाचा अर्थाअर्थी काहीच संबंध नाही. आणि असे असताहि कालाने, या घड्याळरूपी काल–यंत्राने, मानवी जीवनावर असा काही विलक्षण प्रभाव पाडलेला आहे की, बहुतांश मानव या कालयंत्राचे पूर्ण गुलाम बनलेले आहेत. सारे काही आता घड्याळाच्या काट्यांबरहुकूम चालते. सारे मानवी जीवन आता 'काळ, काम आणि वेग' यांचे जणू एक उदाहरण बनले आहे ! कालाने मानवी जीवनावर चांगलीच मात केलेली आहे. कालाने म्हणजे, मानव–कल्पित काल–कल्पनेने !

३ —

आता या निश्चल बिछान्यावर, असहाय अवस्थेत पडून, मी जेव्हा जगाचा व जीवनाचा विचार करतो तेव्हा किती तरी घटनांवर, जीवनातील अनेक समस्यांवर नवा प्रकाश पडल्यासारखे मला वाटू लागते. जीवनाच्या प्रवाहाशी समरस होऊन त्यात विमुक्तपणे संचार करीत असताना जे मला कधीहि कळू शकले नाही, ते आता कळू लागल्यासारखे वाटू लागले आहे. प्रत्यक्ष खेळात भाग घेणाऱ्यांना जे दिसत नाही ते दुरून खेळ पाहणाऱ्याला जसे दिसते, तसे मला आता दिसू लागले आहे. खेळात प्रत्यक्ष रंगण्याचा खेळाडूचा अनुभव आणि दुरून खेळ पाहणाऱ्या प्रेक्षकाचा अनुभव, यात जमीन–अस्मानचे अंतर असेल. या दोन अनुभवांची तुलना करणेहि गैर असेल. एका अनुभवाला प्राधान्य देऊन त्याच्या आधारे दुसऱ्याचे महत्वमापन करणे चूक असेल. पण ज्याने खेळात प्रत्यक्ष रंगण्याचाहि अनुभव घेतलेला आहे, आणि जो आता प्रेक्षकाच्या दृष्टीने त्या खेळाकडे पाहत आहे, त्याला दोन्ही अनुभवांच्या अंतरंगात अवगाहन करणे थोडे बहुत तरी शक्य होत असावे, असे मला वाटते.

माझ्या जीवनातील घटनांचा चित्रपट माझ्या मनःचक्षूसमोर कधीकधी उभा राहतो. कधीकधी तो भरभर मागे पुढे जातो. त्याला कालानुक्रमाचे कसलेहि बंधन असलेले दिसून येत नाही. सिनेमात जे मूक अथवा बोलके चित्रपट आपण पाहतो ते कालानुक्रमाने बद्ध झालेले असतात. हे **आधी** आणि हे **नंतर**–असा क्रम छायाचित्रांच्या शेकडो अथवा हजारो फुटांच्या गुंडाळीत कायमचा बद्ध झालेला

अनुक्रमणिका

असतो. छायाचित्रांची ही लांबच लांब गुंडाळी यांत्रिक गति आणि प्रकाशकिरणे, यांच्या साहाय्याने रुपेरी पडद्यावर उकलली जाते व चलत्–चित्रपट आपल्याला दिसतो. प्रेक्षकाला या चलत्–चित्रपटाचा बद्ध कालानुक्रम मुळीच बदलता येत नाही. पण माझ्या मनःचक्षूंना दिसणाऱ्या माझ्या जीवनाच्या चित्रपटाला असा बद्ध कालानुक्रम नाही. जी दृश्ये, जे प्रसंग, ज्या घटना मला दिसतात व ज्या क्रमाने दिसतात त्यात ऐतिहासिक कालानुक्रम मुळीच नसतो.

जीवनाच्या चित्रपटाला रूढ कालानुक्रमाचे नियम लावणे मूलतःच चुकीचे आहे, असे मला वाटते. जीवनातील प्रसंग व घटना आपल्या अंगभूत व आंतरिक संगतीने परिपूर्ण असतात. बाह्य कालानुक्रमाच्या साच्यात त्यांना जबरीने बसविण्याचे व त्या अनुसार त्यांची संगति लावण्याचे प्रयत्न किती हास्यास्पद आहेत, याची आता मला चांगलीच जाणीव होऊ लागली आहे.

काल–निरपेक्ष दृष्टीने जीवनाकडे पाहण्याची कला साधल्याशिवाय जीवनाचे अंतरंग कळणे अशक्य आहे, असे मला आता दिसून येऊ लागले आहे. पण हे विधान जर सत्य असेल, अर्थपूर्ण असेल, तर सारा इतिहास, इतिहासाबाबतची आधुनिक जगाची प्रस्थापित व सर्वमान्य कल्पना सर्वस्वी अर्थशून्य होऊन बसते ! इतिहास म्हणजे कालानुक्रमाने बद्ध अशा घटनांची श्रेणि. इतिहास व्यक्तीचा असो, एका समाजाचा वा देशाचा असो, अथवा जगाचा आणि अखिल मानवजातीचा असो, कालानुक्रम हे त्याचे मुख्य, मूलभूत अधिष्ठान मानले जाते. इतिहासाचे कोणतेहि पुस्तक उघडा. त्यात आपल्याला **आधी** हे घडले, **नंतर** हे, आणि त्या **नंतर** हे– असा क्रम बिनचुकपणे आढळतो. एवढेच नव्हे, तर जे पूर्वी घडले आणि जे नंतर घडले त्यांची संगति कालक्रमानुसार लावण्याचा प्रयत्नहि त्यात सदैव आढळतो. किंबहुना, कालानुक्रमाच्या आधारावर घटना–श्रेणींची संगति लावणे, हेच इतिहासाचे एकमात्र कार्य आहे, असे मानले जाते.

या ऐतिहासिक दृष्टीच्या भिंगातून मी जेव्हा माझ्या जीवनाकडे पाहू लागतो तेव्हां मला माझ्या जीवनात कसलीहि संगति असल्याचे आढळून येत नाही. एवढेच नव्हे, तर माझ्या जीवनाला कसलाहि अर्थ असल्याचेहि मला दिसून येत नाही. मी जन्मलो वा न जन्मलो, मी जगलो वा न जगलो, मी जे काही केले वा न केले, अथवा माझ्या हातून जे काहीं घडले वा न घडले – रूढ ऐतिहासिक दृष्टचा याला काहीच महत्व नाही, कसलाहि अर्थ नाही.

हजारो व्यक्ति या जगात रोज जन्माला येतात. काही जन्मताच अथवा त्यानंतर लवकरच मरतात. काही लहानाची मोठी होऊन बरीच वर्षे जगतात आणि शेवटी मृत्युमुखी पडून पंचमहाभूतांत विलीन होतात. यापैकी किती व्यक्तींना

इतिहासात स्थान मिळते ? इतिहासात स्थान प्राप्त होण्याकरता काही तरी लोक-विलक्षण हातून घडले पाहिजे. लोकमनावर, समाजावर, राष्ट्रावर वा जगावर प्रभाव पाडण्यासारखे काही तरी हातून घडल्याशिवाय कोणत्याहि व्यक्तीला इतिहासात स्थान प्राप्त होऊ शकत नाही. याचा अर्थ एवढाच की, इतिहाच्या दृष्टीने असंख्य प्रभावशून्य व्यक्तींच्या जीवनाला काही अर्थ नाही. त्या जगल्या काय अन् नाहीशा झाल्या काय, सारखेच. हजारात, दहा हजारात, किंवहुना लाखात एखादीच व्यक्ति इतिहासात स्थान मिळविण्यास पात्र समजली जाते. एका लाखापैकी फक्त एक व्यक्ति ऐतिहासिक महत्वाची आणि नव्याण्णव हजार नऊशे नव्याण्णव व्यक्ति इतिहासाच्या दृष्टीने अर्थशून्य !—

वस्तुस्थिति अशी आहे की, आधुनिक ऐतिहासिक दृष्टि सामान्य माणसाला आणि मानवी जीवनाला कवडीमोल मानते. पण आश्चर्य हे की मानवी जीवनाच्या कोणत्याहि अंगोपांगाचा, कोणत्याहि समस्येचा विचार जेव्हा पुढे मांडला जातो, तेव्हा ऐतिहासिक दृष्टीचा अवलंब केल्याशिवाय कोणत्याहि शास्त्रज्ञाला अथवा पंडिताला एक पाऊलहि पुढे टाकता येत नाही ! मानवी जीवनाला कवडीमोल लेखणाऱ्या अशा या ऐतिहासिक दृष्टीचा मानवानेच इतका विलक्षण वडेजाव मांडावा, यापेक्षा अधिक आत्मविरोधी दैवदुर्विलास दुसरा कोणता ?

गृहीत धरलेली काल—कल्पना आणि ऐतिहासिक दृष्टि, या दोन धारदार पात्यांच्या तीक्ष्ण कात्रीने मानवी जीवन कापून काढणे व जीवनाचे तुकडे तुकडे करणे, यालाच आता ज्ञानविज्ञानाचे माहात्म्य प्राप्त झाले आहे !

● ● ●

४ —

आतापावेतो जे मी लिहिले ते एका विशिष्ट वृत्तीच्या प्रभावामुळे. पण ती वृत्ति आता विरून गेली आहे. एका निराळयाच वृत्तीने माझ्या मनावर आता स्वामित्व प्रस्थापित केले आहे. या निराळ्या वृत्तीने माझ्या विचारांना विचित्रकलाटणी दिली आहे. सर्व काही व्यर्थ, अर्थशून्य — असे आता मला वाटू लागले आहे. गेल्या त्रेपन्न वर्षांच्या दीर्घ कालात माझ्या आयुष्यात किती तरी घटना घडल्या. त्यापैकी काहींनी माझ्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. पण आता, या विलक्षण वृत्तीच्या भिंगातून मी त्या घटनाकडे जेव्हा पाहू लागतो तेव्हा त्या सर्व, सर्व मला अर्थशून्य, महत्वशून्य वाटू लागतात. माझेच केवळ नव्हे, तर सारे मानवी जीवन मला अर्थशून्य भासू लागते. — केविलवाण्या आशा — इच्छांच्या आणि भ्रामक अहंतेच्या आहारी गेलेले हे समग्र मानवी जीवन म्हणजे नियतीचा एक क्रूर खेळ आहे, असे आता मला वाटू लागले आहे !

अनुक्रमणिका

'भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया'

सर्व भूतांच्या हृदयस्थानी ईश्वर बसलेला आहे आणि तोच, यंत्रावर चढविल्या-प्रमाणे सर्व भूतांना मायेने भ्रमवीत असतो, ही गीतेतील भगवंताची वाणी, आज ज्या वृत्तीत मी आहे त्या वृत्तीच्या प्रभावामुळे, मला अक्षरशः खरी वाटते. फक्त 'ईश्वर' या शब्दाऐवजी मला 'नियति' हा शब्द अधिक सार्थ वाटतो. ईश्वर आहे असे मानले की, एक आशास्थान उत्पन्न होते. माझ्या आजच्या वृत्तीत ही आशाहि मला भ्रामक वाटते.

'ईश्वर' म्हटला की, त्याची भक्ति, त्याची पूजा, त्याच्या प्राप्तीचे मार्ग, इत्यादि प्रकार सुरू होतात. 'नियति' या शब्दामुळे ही भ्रामक प्रकिया एकदम संपुष्टात येते. आणि म्हणून हा शब्द मला अधिक ग्राह्य वाटतो.–

पण असे विधान मी करतो न करतो तोच मार्क्सवाद्यांची 'ऐतिहासिक नियति' माझ्या नजरेसमोर दत्त म्हणून उभी राहते ! आणि मग, ईश्वर पुरवला आणि त्याची मायाहि पुरवली पण ऐतिहासिक नियतीची ही अगडवंब महामाया मात्र मुळीच नको, असे तात्काळ वाटू लागते.

● ● ●

मानवाचे मन किती विचित्र आहे! ते कोणत्या ना कोणत्या विचारश्रेणीसाठी अथवा कल्पना-श्रेणीसाठी अखंड आसुसलेले असते. एक विचारश्रेणि अथवा विचार-प्रणालि अर्थशून्य वाटू लागली की, ते लगेच दुसऱ्या विचारप्रणालीचे उंच उंच मनोरे उभारू लागते. आणि पूर्वी पहिल्या विचारप्रणालीचा जितक्या आग्रहाने ते पुरस्कार करण्यास माणसाला प्रवृत्त करीत होते तितक्याच, किंबहुना जास्त आग्रहाने ते नव्याने गवसलेल्या दुसऱ्या विचारप्रणालीचा पुरस्कार करण्यास त्याला प्रवृत्त करते ! मनाच्या या खेळालाच 'माया' हे नाव पूर्णपणे शोभते. मन हीच मायेची जननी आहे. मन हे सत्यसंशोधनाचे साधन नसून ते भ्रमनिर्मितीचे, आभास निर्मितीचे साधन आहे.

मन हे केवळ आभासाचे, विभ्रमाचे साधन मानले, तर मग बुद्धींला जीवनात कसलेच माहात्म्य उरणे शक्य नाही, असा आधुनिक बुद्धीवादी लोक तात्काळ आक्रोश करू लागतील. पण हा आक्रोशहि अर्थशून्य आहे. प्रश्न मनाचा अथवा बुद्धीचा नसून जीवनाच्या अधिष्ठानाचा आहे. मन अथवा बुद्धि जीवनाचे अधिष्ठान बनू शकत नाही. मन आणि बुद्धि ह्या इच्छानुसारिणी शक्ति आहेत. आधी इच्छा, आणि मग मन आणि बुद्धि यांची प्रक्रिया. मन आणि बुद्धि ही केवळ इच्छापूर्तीची कल्पनानिष्ठ साधने आहेत.–

'अथा तो ब्रम्हजिज्ञासा'– असे आधी म्हणावे लागते आणि मगच ब्रम्हज्ञानाची

अनुक्रमणिका

भव्य वैचारिक इमारत, मन आणि बुद्धि यांच्या साहाय्याने, त्यावर उभारली जाऊ शकते. ब्रह्मज्ञानाची जिज्ञासा अथवा इच्छाच नसली, तर ही सर्व भव्य वैचारिक इमारत तात्काळ अर्थशून्य होऊन बसते, कोलमडून पडते !

मार्क्सवादाची अथवा साम्यवादाचीहि हीच कथा आहे. यंत्रयुगाने घडवून आणलेली प्रचंड सामाजिक उलथापालथ आणि असंख्य मानवांची दुर्दशा पाहून मार्क्सच्या हृदयाला धक्का बसला. हा काय प्रकार घडत आहे, यावर मार्क्सच्या पूर्वीहि अनेकांनी आपले विचार प्रकट केले होते. कारण अनेक विचारवंतांना मार्क्स-प्रमाणेच प्रचंड सामाजिक उलथापालथ पाहून धक्का बसला होता. ही प्रचंड उलथापालथ मानवाला कुठे नेत आहे ? ती किती लोकांचे बळी घेणार आहे ? ह्या उलथापालथीचे वास्तवरूप काय आहे ? तिच्या प्रभावामुळे असंख्य मानवांच्या घरादारांवरून जो नांगर फिरविला जात आहे त्यावर काही इलाज करता येणे शक्य आहे काय ?—असे प्रश्न त्यावेळी गंभीरपणे चर्चिले जात होते. मार्क्सनेहि या प्रश्नांवर आपले विचार प्रकट करण्यास सुरवात केली. ही एक स्वाभाविक वैचारिक प्रतिक्रिया होती. पण मार्क्सने असे करताच त्याच्यावर हद्दपारीचा प्रसंग गुदरला. केवळ वैचारिक संघर्षाला प्रत्यक्ष संग्रामाचे स्वरूप प्राप्त झाल्याचे मार्क्सला दिसून आले. त्यामुळे मार्क्सची अहंता चांगलीच डिवचली गेली. संग्रामाला संग्रामानेच उत्तर दिले पाहिजे, याची जाणीव त्याला होऊ लागली. पण केवळ व्यक्ति या नात्याने हा संग्राम, हे युद्ध करता येणे मार्क्सला अशक्यच होते. पण युद्ध अनिवार्य आहे आणि ते केलेच पाहिजे, या आकांक्षेने त्याला पूर्ण घेरून टाकले. ही आकांक्षा, ही दुर्दमनीय इच्छाच वर्गयुद्धाच्या सिद्धांताची जननी ठरली.— मार्क्सवाद, साम्यवाद या नावाची विचारप्रणालि ही अशा रीतीने उदयास आली. तत्कालीन परिस्थिती-वर प्रखर प्रभाव पाडण्यास ही विचारप्रणालि जितकी समर्थ ठरली तितकी दुसरी कोणतीहि ठरू शकली नाही. जेथे जेथे यंत्रे व भांडवलशाही गेली तेथे तेथे मार्क्स-वादहि जाऊन पोचला. यंत्रांनी सारे जग पादाक्रांत केले. मार्क्सवादानेहि साऱ्या जगावर प्रभाव पाडला.

पण मार्क्सवादाने कोणताहि प्रश्न सोडविला नाही, हे आता सूज्ञ विचारवंतांस स्पष्ट दिसू लागले आहे. उलट भांडवलशाहीच्या विरुद्ध जागतिक वर्गयुद्धाची घोषणा करणाऱ्या मार्क्सवादाने भांडवलशाहीपेक्षाहि किती तरी अधिक भयानक अशी सर्वाधिकारशाही आकारास आणली आहे. मनोनिष्ठ बुद्धिवादाने एक नवा भ्रम निर्माण केला.- 'भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया'- याचे पुन्हा एकवार जगाला प्रत्यंतर मिळू लागले !

केवळ मन आणि बुद्धि हे ज्या ज्या विचारप्रणाल्यांचे अधिष्ठान बनते त्या

त्या सर्व मूलतःच भ्रामक असतात, या सत्याची मानवाला जेव्हा साक्ष पटेल तेव्हाच तो या मायामय संभ्रमातून विमुक्त होईल.

५ —

'व्यक्ति तितक्या प्रकृति'- असे एक सुभाषित आहे. ते मला नेहमीच मोठे सार्थ वाटत आले आहे. या केवळ तीन शब्दांच्या लहानशा वाक्यात जेवढे सत्य भरले आहे तेवढे दुसऱ्या कोणत्याहि लहान मोठ्या वाक्यात क्वचितच आढळून येईल.

पण आता, या शरपंजरी–अवस्थेत, माझ्या सर्व गत आचार–विचारांचे ठाम मानलेल्या मतांचे आणि निष्ठांचे जे शवच्छेदन सुरू झालेले आहे त्यामुळे अनेक अदृश्य गोष्टी मला दिसू लागल्या आहेत. आणि आजवर कधीहि न जाणवलेल्या गोष्टी जाणवू लागल्या आहेत. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या वाक्यात अथवा विधानात व्यक्ति–वैचित्र्याचे जे चित्र रेखाटले गेले आहे, ते अनंतरंगी व अनंतढंगी आहे. इतके की, प्रत्येक मानवी व्यक्ति हे एक स्वतंत्र व स्वयंपूर्ण असे विश्व आहे आणि एक व्यक्ति–विश्व दुसऱ्या व्यक्ति–विश्वाहून संपूर्णपणे भिन्न आहे; एवढेच नव्हे, तर या प्रत्येक व्यक्ति–विश्वाच्या अंतराळात चाललेल्या प्रकृतीच्या लीलाही अनंत व भिन्नभिन्न आहेत !

व्यक्ति–वैचित्र्याच्या या अनंतढंगी व अनंतरंगी स्वरूपावर दृष्टि जरा स्थिर ठेवून जगाकडे व मानवी जीवनाकडे जेव्हा मी पाहू लागतो, तेव्हा आजवर जे जे वाटले ते सर्व, एकाएकी कोलमडून पडत आहे, असे मला दिसून येते. आणि हे कोलमडणे केवळ लाक्षणिक अथवा काल्पनिक नसून अगदी खरोखरीचे आहे, याची साक्षहि मला पटू लागते.–

उधळीच्या (व्हाइट अँट्स्च्या) प्रतापाचे वर्णन मी एकदा कुठेतरी वाचले होते. एका जंगलात एक घर होते. विटा–चुन्याने व भक्कम लाकडांनी बांधलेले ते घर होते. त्यात टेबले, खुर्च्या, पलंग, कपाटे इत्यादि अनेक लाकडी वस्तु होत्या. त्यात राहण्यास गेलेली माणसे जंगलात उधळीच्याच संशोधनार्थ भटकावयास गेली आणि काही तासांनी थकून भागून विश्रांतिसाठी परत आपल्या निवासस्थानी आली. खुर्चीवर बसू लागताच खुर्ची कोलमडून पडली. टेबलावर जरा भार पडताच टेबलहि कोलमडून पडले. पलंगावर बसावयास जाताच तोहि कोलमडून पडला. सर्व लाकडी वस्तूंची हीच गत. कारण काही तासांच्या अवधीतच उधळीने ह्या सर्व वस्तु आतून पार पोखरून टाकल्या होत्या. स्थिर आणि टिकाऊ म्हणून मानल्या गेलेल्या वस्तु एकाएकी ठिसूळ आणि क्षणभंगुर होऊन गेल्या !

व्यक्ति–वैचित्र्याच्या अनंतरंगी व अनंतढंगी स्वरूपावर दृष्टि स्थिर ठेवून जगाकडे व मानवी जीवनाकडे पाहू लागताच सर्व काही कोलमडून पडत असल्याचे

जे दृश्य मला दिसले व जाणवले ते अगदी हुबेहुब असेच होते. ओळखीची व पूर्ण परिचयाची म्हणून मानलेली माणसे एकाएकी निराळी व अपरिचित भासू लागली. सर्व मानवी नाती एकाएकी ठिसूळ व क्षणभंगुर बनून गेली. घराघरातील कौटुंबिक जीवन आणि मानवामानवातील सर्व बाह्य व्यवहार, 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या रूपात अदृश्यपणे वावरणाऱ्या उधळीने, कसे सर्वत्र पोखरले गेले आहेत; जरा भार पडण्याचाच अवकाश की, सारा मानवी संसार कसा कोलमडून पडणार, अर्थशून्य होणार, याचे विराट् दर्शन मला झाले !—अर्जुनाला श्रीकृष्णाने 'विश्वरूप दर्शन' जसे घडविले तशाच प्रकारचे हे दर्शन होते !—

● ● ●

'व्यक्ति तितक्या प्रकृति' या वाक्यात व्यक्तींची व प्रकृतींची संख्या समान मानण्यात आली आहे; आणि व्यक्ति तितक्या प्रकृति जरी असल्या तरी एक व्यक्ति, स्वतःपुरती तरी एकजिनसी व स्थिर अशी वस्तु आहे, तिला जन्मापासून मरणापर्यंतच्या कालावधिपुरते निश्चित अस्तित्व आहे, एवढा तरी ठामपणा या वाक्याने ध्वनित केला आहे, ही खैरच मानली पाहिजे. पण माझ्या या शरपंजरी अवस्थेत चालू झालेल्या शवच्छेदनप्रक्रियेने मला हेहि समाधान फार वेळ लाभू दिले नाही !—

'मी एक व्यक्ति आहे', ही जाणीव प्रत्येक माणसाला स्वयंसिद्धच आहे. कारण मी माझे अस्तित्व नाकारू शकत नाही. 'मी' आहे— या विधानाला बाधा आणणारे असे मला काहीच दिसून येत नाही. एवढी एक गोष्ट तरी सत्य व निश्चित आहे, ही काय कमी समाधानाची गोष्ट आहे ?

पण 'मी आहे' हे जरी खरे व निश्चित असले तरी हा 'मी' एकच एक नसून अनेक आहेत, असे जर दिसून आले, तर व्यक्तीचा एकजिनसीपणाहि विलयास जाऊन त्या व्यक्तीच्याहि चिंधड्या चिंधड्या उडून जातील.—

—आणि माझ्या शवच्छेदनप्रक्रियेने हळूहळू मला हेहि दृश्य दाखविण्यास सुरवात केली आहे. मला आता असे दिसून येऊ लागले आहे की, आयुष्यात माझे निरनिराळ्या व्यक्तींशी जे संबंध जुळले, त्यांचे स्वरूप किती तरी निरनिराळे आहे. कोणत्याहि दोन संबंधात किती तरी अंतर आहे. माझ्या संबंधात आलेल्या 'अ' या व्यक्तीला जाणवलेला 'मी', 'ब' या व्यक्तीला जाणवलेला 'मी' आणि इतर अनेक व्यक्तींना वेगवेगळ्या प्रकारे जाणवलेला 'मी', यांच्यात किती तरी भिन्नता आहे. अनेक व्यक्तींशी संबंध जुळविणारा 'मी' मला माझ्यापुरता एकच भासत असला, तरी या निरनिराळ्या व्यक्तींना जाणवलेले निरनिराळे माझ्यातील 'मी' हे शरीराने एकच असले, तरी आशयाने अनेक असले पाहिजेत. 'अ' या व्यक्तीला जाणवणारा

गोष्टींना कायमचे प्रश्नचिन्हात्मक करून टाकले आहे ! येशूच्या या अखेरच्या उद्‌गारात त्याच्या अंतर्यामीच्या खऱ्या 'मी' चे जे यथार्थ दर्शन घडते ते त्याच्या इतर कोणत्याहि उद्‌गारातून घडत नाही. कारण अत्यंत असहाय व यातनामय अवस्थेतील त्याच्या सजीव शरीराचा हा अखेरचा आर्त उद्‌गार होता.–

जीवन हे एक प्रचंड प्रश्नचिन्ह आहे, या सत्याची मानवांना जाणीव करून देणारा येशूचा हा अखेरचा आर्त उद्‌गार, 'आरंभी शब्द होता' या गूढ वाक्यावर नवा प्रकाश पाडणारा आहे ! –

आरंभी जो शब्द होता तो कोणता ? त्याचा अर्थ काय ? – या प्रश्नांची उत्तरे येशूच्या अखेरच्या आर्त उद्‌गारातच शोधली पाहिजेत. विश्वारंभीचा, विश्वाला आकारास आणणारा 'शब्द' आणि आत्यंतिक आर्ततेने मानवाच्या अंतःकरणातून बाहेर पाडणारा अखेरचा उद्‌गार, यांच्यात एक गूढ नाते असले पाहिजे. आणि या नात्यातच मानवी जीवनाचे संपूर्ण रहस्य साठलेले असावे.–

अत्यंत असहाय व एकाकी अवस्थेत असताना आणि जीवन–मरणाच्या सीमारेषेवर तरळत ठेवणाऱ्या प्रसंगाच्या कात्रीत मानव सापडला असताना, जी आत्यंतिक आर्तता मानवी अंतःकरणाला प्राप्त होते, तीतच जीवनाच्या वास्तवतेचे अधिष्ठान दडून बसलेले असते.

बाकी सर्व, व्यक्ति तितक्या प्रकृतींचा वेताल खेळ अथवा एकाच व्यक्तीतील अनेक निरनिराळ्या 'मी'– चा सुखद अथवा दुःखद असा अल्पजीवी विलास !

(अपूर्ण)

★ ★ ★

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ याजकडून

केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभाः–

रविवार दि. २४-७-६० रोजी वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा सकाळी ८-३० वाजता संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली भरली. या सभेत पुढील विषयांचा विचार करण्यात आला.

(१) मागील सभेचा अहवाल मंजूर करण्यात आला. (२) तिमाही आर्थिक आणि कार्याचा अहवाल मंजूर करण्यात आला. (३) जिल्हा शाखा योजनेचा विचार करण्यात आला. (४) घटना दुरुस्तीचा प्रश्न व साहित्यसंस्था संघीकरणाचा प्रश्न साधारण सभेपुढे मांडण्यात यावेत असे ठरले. (५) कर्मचाऱ्यांच्या प्राव्हिडंट फंडाची आणि पगारवाढीबाबत योजना करण्यात आली. (६) श्री शिवाजी ग्रंथालयाच्या बांधकामाविषयी योजना स्वीकारण्यात आली. (७) नवीन सभासदत्वाकरिता आलेल्या आवेदनपत्रांना मंजुरी देण्यात आली.

भेट

दि. १०-७-६० रोजी डॉ. ए. यु. शेख, आयुक्त, विदर्भ विभाग नागपूर यांनी रात्रौ ८–३० वाजता विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. यावेळी त्यांना संघमंदिर आणि रंगमंदिर दाखवण्यात आले.

दारूबंदी आणि समाजकल्याण विभागाचे मंत्री डॉ. त्रि. रा. नरवणे यांनी शुक्रवार दि. १९-८-६० रोजी सायं. ६ वाजता वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी त्यांना संघमंदिरातील दालने, नियोजित श्री शिवाजी ग्रंथालयाची जागा आणि धनवटे रंगमंदिर दाखविण्यात आले. यानंतर त्यांना पुष्पहार अर्पण करून संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी वि. सा. संघाच्या आजवरच्या कार्याची माहिती निवेदन केली. कॉफी पानानंतर प्रादेशिक समाजकल्याण विभागातर्फे आयोजित केलेल्या कलापथकाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात बुलढाणा, आकोला आणि अमरावती येथील कलापथकांनी भाग घेतला होता. या समारंभाला वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळातील व्यक्ति, तसेच शिक्षण व समाजकल्याण खात्याचे चिटणीस श्री. पी. जे. चिन्मुलगुंद आणि समाजकल्याणखाते पुणे यांचे संचालक श्री. पी. जे. गवई प्रामुख्याने उपस्थित होते.

दि. २७-७-६० रोजी समाजकल्याण खात्याचे उपसंचालक श्री. कारखानीस यांनी प्रादेशिक समाजकल्याण अधिकारी श्री. व्यं. ब. पुराणिक यांचे समवेत विदर्भ

अनुक्रमणिका

साहित्य संघाला भेट दिली. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी त्यांना संघकार्यालय आणि धनवटे रंगमंदिर दाखविले.

संशोधन समिति:—

हैद्राबाद येथील आन्ध्र राज्याच्या सेंट्रल रेकॉर्डस्चे भूतपूर्व संचालक आणि आन्ध्र राज्यातील स्वातंत्र्य-संग्राम इतिहास समितीचे प्रमुख श्री. रघुनाथराव मुरलीधर जोशी यांनी दि. २८-८-६० रोजी सायंकाळी ६-३० वाजता वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी त्यांनी संघमंदिर आणि रंगमंदिर पाहून समाधान व्यक्त केले. यानंतर अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली श्री. जोशी यांनी " इतिहास संशोधन " या विषयावर उद्बोधक व माहितीपूर्ण व्याख्यान दिले.

सत्कार

श्रीमंत बाबुरावजी देशमुख यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त दि. १३ जुलै ६० रोजी वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर आणि चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी श्रीमंत बाबुरावजी देशमुख आणि सौ. माईसाहेब देशमुख यांना पुष्पहार घालून श्रीफल अर्पण केले.

वीररत्न बाजी प्रभु देशपांडे यांचा त्रिशतसांवत्सरिक उत्सव:—

चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाज आणि विदर्भ साहित्यसंघ या संस्थांच्या वतीने वीररत्न बाजीप्रभु देशपांडे यांचा त्रिशतसांवत्सरिक उत्सवाचा कार्यक्रम दि. १७-७-६० रोजी सायंकाळी ५-३० वाजता धनवटे रंगमंदिरात झाला. या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते होते. सुरुवातीला श्री. प्रभाकर गडकरी आणि चमू यांनी पोवाडा म्हणून वीररत्न बाजीप्रभु देशपांडे यांच्या पावनखिंडीत झालेल्या वीरोचित मरणाचा प्रसंग मूक अभिनयाद्वारे रंगमंचावर करून दाखविला.

यानंतर वीरबाजी प्रभु देशपांडे यांच्या प्रतिमेला विदर्भ साहित्य संघातर्फे आणि इतर संस्थांतर्फे पुष्पहार घालण्यात आल्यावर प्रमुख वक्ते साहित्याचार्य श्री· बाळशास्त्री हरदास यांचे उत्कृष्ट भाषण झाले. समारोपादाखल प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचे भाषण झाल्यावर चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी सर्वांचे आभार मानले.

लो. टिळक जयंति:—

लो. टिळक जयंतीनिमित्त नागपूर विद्यापीठाच्या राज्यशासन विभागाचे प्रमुख डॉ. ना. र. देशपांडे यांचे दि. १४-७-६० रोजी सायंकाळी ७ वाजता धनवटे रंग-मदिरात "स्वराज्याचे हक्क आणि सुराज्याचे कर्तव्य" या विषयावर भाषण झाले.

लो. टिळक पुण्यतिथिः—

परमश्रेष्ठ राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांचे अध्यक्षतेखाली १ ऑगस्ट ६० रोजी सायं. ६ वाजता धनवटे रंगमंदिरात लो. टिळक पुण्यतिथि–निमित्त परिसंवादाचा कार्यक्रम झाला. या परिसंवादात पुढील वक्त्यांनी पुढील विषयावर भाषणे दिली.

वक्ते		विषय
(१) डॉ. म. म. वा. वि. मिराशी	–	" संशोधक टिळक "
(२) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर	–	" वृत्तपत्रकार टिळक "
(३) प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे	–	" तत्त्वज्ञानी टिळक "
(४) श्री. पु. य. देशपांडे	–	" राजकारणी टिळक "
(५) प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते	–	" लोकमान्य टिळक "

समारोपादाखल राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांनी उत्कृष्ट भाषण दिले.

या समारंभाला नागपूरातील प्रतिष्ठित नागरिकानी रंगमंदिर फुलून गेले होते.

श्री शिवाजी ग्रंथालयाच्या बांधकामाचा मुहूर्त समारंभः—

शुक्रवार दि. १२-८-६० रोजी सकाळी ८-३० वा. श्री शिवाजी ग्रंथालय–बांधकामाचा मुहूर्त समारंम श्रीमंत पु. वा. काळे यांचे हस्ते करण्यात आला. पूजाविधि झाल्यावर संघाध्यक्ष श्री ना. रा. शेंडे यांनी प्रास्तविक भाषण केले. नंतर श्रीमंत पु. वा. काळे यांनी भाषण केले. यानंतर न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति आणि श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांची भाषणे झाली. शेवटी सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी आभार मानल्यावर सर्वांना प्रसाद देण्यात आला.

कै. के. चिरंजीवराव दालनाचा उद्‌घाटन समारंभः—

रविवार दि. २१-८-६० रोजी सायंकाळी ६-३० वाजता श्रीमंत के. बालमुकुंद यानी आपले वडिलांचे स्मरणार्थ दिलेल्या रु. ५००१ च्या देणगीतून बांधण्यांत आलेल्या कै. के. चिरंजीवराव दालनाचा उद्‌घाटन समारंभ न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांचे अध्यक्षतेखाली झाला. सुरुवातीला चिटणीस प्रा. भा. ल. भांबूरकर यांनी प्रास्ताविक भाषण दिले. व अध्यक्षांना के. चिरंजीवराव यांच्या छायाचित्राचे अनावरण करण्यास विनंती केली. अनावरण झाल्यावर पुष्पहार घालण्यात आला. तदनंतर के. बालमुकुंद आणि त्यांच्या कुटुंबीय मंडळींना पुष्पहार घालण्यात आले. या वेळी रा. ब. डी. लक्ष्मीनारायण यांच्या पत्नी श्रीमती बहिणाबाई यांनाहि पुष्पहार घालण्यात आला. यानंतर श्री. वा. वा. भोळे आणि न्या. मू. भवानीशंकर नियोगी यांनी कै. के. चिरंजीवराव यांच्या जीवन चरित्राचा परिचय करून दिला. समारोपादाखल न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांचे भाषण झाल्यावर प्रा. भा. ल. भांबूरकर यांनी सर्वांचे आभार मानले.

नाटककार कै. नानासाहेब जोग यांच्या अर्धपुतळ्याचा अनावरण समारंभ

वि. सा. संघाचे प्रांगणात दि. २६ ऑगस्ट १९६० (गणेश चतुर्थि) रोजी कै. नानासाहेब जोग यांचे जन्मदिनी सायंकाळी ६ वाजता अर्धपुतळा बसविण्यात आला. यावेळी न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.



"कै. नाना जोग यांच्या जन्मदिनी दि. २६-८-१९६० रोजी (गणेश चतुर्थि) विदर्भ साहित्य संघाचे प्रांगणात बसविण्यात आलेल्या पुतळ्याचे छायाचित्र."

यावेळी विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर नाटय-मंडळ, रंजन कलामंदिर आणि नागपूर साहित्य सभा या संस्थांच्या वतीने नानांच्या पुतळ्याला पुष्पहार घालण्यात आले. सुरुवातीला श्री. बाळासाहेब ढवळे यांनी प्रास्ताविक भाषण केले व कै. नाना जोग स्मारक निधीला मदत करणाऱ्या दात्यांपैकी २५ रु. वर देणग्या देणाऱ्यांची नावे वाचून दाखविली. नंतर न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति, श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. ह. ना. वैद्य, श्री. पु. व्यं. दारव्हेकर, यांनी भाषणे दिली. समारोपादाखल श्री. ना. रा. शेंडे यांनी भाषण केले. शेवटीं श्री. बाबुराव चिमोटे यांनी शिल्पकार श्री. प. वा. केळकर (पुणे), स्मारक निधीला साहाय्य करणारे दाते आणि उपस्थित मंडळी यांचे आभार मानले.

वि. सा. संघाचे ग्रंथालयाला पुस्तकरूपाने देणगी:-

वि. सा. संघाच्या ग्रंथालयाला खालील सद्‌गृहस्थांनी पुस्तकांची देणगी देऊन उपकृत केले आहे.

(१) श्री. वसंत विष्णु वैद्य औरंगाबाद यांनी आपले वडिलांचे स्मरणार्थ "योगवासिष्ठ" ग्रंथाचे ३ भाग दिले.

(२) डॉ. ना. भा. खरे यांनी दि. १२-८-६० रोजी श्री शिवाजी ग्रंथालय -बांधकामाच्या मुहूर्तावर १३ पुस्तके दिली.

(३) प्रा. भ. श्री. पंडित यांनी ५० पुस्तके दिली.

शाखावृत्त

विदर्भ साहित्य संघाच्या सावनेर, तळोधि, पुलगाव शाखांच्या निवडणूकीचे व इतर कार्यक्रमाचे वृत्त

सावनेर शाखाः–

विदर्भ साहित्य संघाच्या सावनेर शाखेची सभा दिनांक ३१-७-६० रोजी श्री. पुरुषोत्तमभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यानुसार नवीन सभासदांतून कार्यकारिणीची निवड करण्यास आली. ती येणे प्रमाणे.

अध्यक्षः–श्री. पुरुपोतभाई पटेल. उपाध्यक्षः–श्री. डॉ. नारायणराव देशमुख. चिटणीसः–श्री. यादवराव उपाध्ये, सहचिटणीसः–श्री. वा. ना. सामक. सभासदः– १. डॉ. राजे. २. श्री. मनोहरराव खेडकर. ३. श्री. निचकवडे मास्तर. ४. श्री. न. वा. दलाल. ५. श्री. परांजपे.

दिनांक १-८-१९६० रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथिनिमित्त श्री. पुरुषोत्तमभाई पटेल यांचे अध्यक्षतेखाली एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. देशमुख यांनी भाषण केले. कु. निशा राजे वय वर्षे १० या मुलीने लोकमान्य टिळकांचे चरित्रावर लहानसे भाषण केले. त्यानंतर नगराध्यक्ष श्री. दामोदरराव नाईक यांचे भाषण झाले. शेवटी डॉ. देशमुख यांनी आभार मानून झाल्यावर सर्व मंडळी कै. राम गणेश गडकरी यांची नुक्तीच बांधलेली समाधि पाहण्यास नदीकिनारी गेली. ह्या नंतर हा समारंभ समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

तळोधी शाखाः–

दिनांक ३१-७-६० रोजी तळोधी शाखेच्या सभासदांची बैठक भरून खालील सदस्यांची पुढीलप्रमाणे कार्यकारी मंडळावर निवड करण्यात आली.

अध्यक्षः–श्री. जी. बी. मेश्राम, सभासदः–कृ. स. लाडसे, पां. सि. ओवीलवार, श्री. शेख महंमद, श्री. मो. आ. शेंडे आणि श्री. वी. झो. कांवडी.

तळोधी शाखेच्यावतीने दिनांक १-८-६० रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीचा कार्यक्रम श्री. जी. बी. मेश्राम याचे अध्यक्षतेखाली झाला. यावेळी प्रा. तु. वि. गेडाम, श्री. कृ. स. लाडसे, श्री. र. ना. गजमे, आणि श्री. जी. वी. मेश्राम, यांची भाषणे झाली. याप्रसंगी जवळजवळ तीनशे माणसे उपस्थित होती.

अनुक्रमणिका

दिनांक १५-८-६० रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त झेंडा वंदनाचा कार्यक्रम झाला. दुपारी १ वाजता श्री. जी. बी. मेश्राम यांचे घरी कार्यकर्त्यांची सभा होऊन स्वातंत्र्यदिन या विषयावर चर्चा झाली.

पुलगाव शाखा:—

पुलगाव शाखेची निवडणूक दि. ३१—७—६० रोजी होऊन खालील प्रमाण पदाधिकारी कार्यकारिणीवर घेण्यात आले.

अध्यक्ष:— डॉ. द. ह. अग्निहोत्री. उपाध्यक्ष:— श्री. सी. एन्. भोसकर. चिटणीस:- श्री. रा. वा. देशपांडे. सहचिटणीस:—श्री. एस्. के. राजकारणे, सदस्य:— श्री. व्ही. एम्. पैकिने आणि श्री. पी. एन्. वांवोरीकर.

शाखेचे सभासद वाढविण्याचे कार्य सुरू आहे.

गोंडवन शाखा चंद्रपूर:—

गोंडवन शाखा चंद्रपूर शाखेची निवडणूक दि. १७-७-६० रोजी निर्वाचनाधिकारी प्रा. तु. वि. गेडाम यांनी घडवून आणली. त्यात पुढीलप्रमाणे पदाधिकारी निवडून आले आहेत.

अध्यक्ष:— श्री. भ. सो. खनके, सदस्य:—श्री. व. सी. पतरंगे, डॉ. तु. त्रि. पत्तीवार, श्री. पु. ह. धनकर, आणि श्री. द. व. झाडे.

भंडारा शाखा:—

दि. २७—८—६० रोजी भंडारा शाखेचे पुनरुज्जीवन करण्याकरिता वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली गणेशपूर येथील श्री. शेषाश्रमात सायंकाळी ६ वाजता एक खास सभा होऊन पुढीलप्रमाणे नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यात आले.

नवीन कार्यकारी मंडळ:—

अध्यक्ष:—श्रीमती लीलाताई गुप्ते, उपाध्यक्ष:—श्रीमती सुरेखा क्षत्रीय, कोषाध्यक्ष:—सौ. वेणूताई हर्डीकर, सरचिटणीस:—कु. सुगंधा शेंडे, चिटणीस:—सौ. प्रभा गजभिये व सौ. कमलाबाई जोब, सभासद:—सौ. इंदुताई रंभाड, सौ. लीलाताई वम्बावाले, कु. पूर्णाबाई बोरकर, कु. गुणाबाई मेश्राम, सौ. विमलाताई खेडीकर, सौ. सुशीलाबाई खानोरकर आणि कु. पद्मावती वेटावदकर.

या महत्वपूर्ण प्रसंगी श्री. ना. रा. शेंडे यांचे "साहित्य, कला व संस्कृति" या विषयावर मार्गदर्शनपर भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेच्या

अनुक्रमणिका

व संस्कृतीच्या अभिवृद्धयर्थ साहित्य आणि कलेचा कसा परिपोष घडविता येण्यासारखा आहे आणि ग्रामीण जनतेचा उच्च व प्रभावी दर्जा निर्माण करण्यासाठी काय केले पाहिजे याची सोदाहरण मीमांसा केली.

दि. २८–८–६० रोजी सकाळी ९ वा. भंडारा येथील मिशन माध्यमिक शाळेच्या दिवाणखान्यात नुकतेच निवडून आलेल्या वि. सा. संघ भंडारा शाखेच्या कार्यकारी मंडळाची एक खास बैठक शाखाध्यक्ष श्रीमती लीलाताई गुप्ते यांच्या अध्यक्षतेखाली भरली. यावेळी खास निमंत्रणाने श्री. ना. रा. शेंडे उपस्थित होते. या सभेत पुढीलप्रमाणे कार्य करण्याचे ठरले.

(१) वि. सा. संघाचे जास्तीत जास्त सभासद बनविणे. (२) लोकसाहित्याचे संशोधन करणे. (३) लोककलांना उत्तेजन देणे. (४) कथा, काव्य, नाट्य, आदि साहित्यप्रकारांची उच्च अभिरुचि निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. (५) उच्च सांस्कृतिक दर्जा प्रथापित करण्यासाठी झटणे.

सौ. कमलाबाई जोब यांनी आभार मानल्यावर अल्पोपहार होऊन सभा संपली.

यवतमाळ शाखा:–

दि. ८–८–६० रोजी यवतमाळ शाखेची निवडणूक होऊन त्यात पुढीलप्रमाणे पदाधिकारी निवडण्यात आले.

अध्यक्ष:– डॉ. गो. वा. पंडित, उपाध्यक्ष:– श्री, शरच्चंद्र टोंगो. कोषाध्यक्ष:- श्री. द. वा. महाजन, सरचिटणीस:– प्रा. राम डोके, चिटणीस:– श्री. विनायक पाटील, सहचिटणीस:–(व्याख्यानविभाग) प्रा. अरविंद जोशी, सभासद:– प्राचार्य ना. बा. पराडकर, श्री. जवाहरलालजी दर्डा, श्री. वि. रा. श्रीखंडे, श्री. ना. ना. हूड, सौ. सुशीलाबाई पंडित, सौ. मंगलाबाई श्रीखंडे, श्री. प्रताप बेहेरे, सौ. आशाताई बर्वे, श्री. पां. श्रा. गोरे.

पुढील समित्या स्थापन करण्यात आल्या:–

१. व्याख्यान समिति––प्रा. शरद् कळणावत् (आमंत्रक)
२. सांस्कृतिक कार्यक्रम समिति–प्रा. दीनानाथ पांडे (आमंत्रक)
३. संशोधन समिति–श्री. द. वा. महाजन. (आमंत्रक)

यवतमाळ शाखेतर्फे दि. १३ ऑगस्ट १९६० रोजी प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. डॉ. कोलते यांनी आपल्या भाषणात

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

पुस्तके		रु. पैसे
★ १ निबंध परिमल		२–२५
२ सुमन संचय		१–२५
+ ३ मराठी गद्य		१–५०
+ ४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे		२–००
५ भारती (नाटक) नाना जोग		१–५०
६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे		०–७५
७ कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २		३–००
८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans-(पूर्ण ग्रंथ) ले. कै. डॉ. तु. ज. केदार		३–००
९ „ „	(केवळ भाग ४)	१–५०
१० डॉ. केदार यांचे चरित्र	—ले. ज. रा. जोशी	५–००
११ नाट्यमहोत्सव विशेषांक		३–००

कै. गडकरी वाङमयावरील प्रबंध

१२ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
१३ नाटककार गडकरी	—द. रा. गोमकाळे	०–३१
१४ गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार—कविभूषण	प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१५ गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१६ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	—द. वि. तेंडूलकर	०–५०
१७ गडकऱ्यांची खरी भूमिका	—प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१८ गडकऱ्यांची नाट्यशैली	—प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०
१९ "युगवाणी" मासिक —वार्षिक वर्गणी रु. ५ (वि. सा. संघाचे मुखपत्र)		

★ ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन, नागपूर यांचेकडे आहेत.

+ ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.
बाकीची सर्व पुस्तके वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील.

विदर्भ साहित्य संघ

नवीन सभासद होऊ इच्छिणारास सूचना

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६० पासून सुरू झाले असून नवीन वर्षाकरिता सभासद नोंदणी सुरू झाली आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठीभाषीप्रेमी व्यक्तीला सभासद होता येते. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावे लागते. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. ३ आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यात येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पाच हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(आ) **आश्रयदाते**--एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(इ) **सहाय्यक**--पाचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(ई) **हितचिंतक**--अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(उ) **आजीव सभासद**--पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.

(ऊ) **साधारण सभासद**--वार्षिक तीन रुपये देणारे.

मराठी भाषेबद्दल प्रेम असणाऱ्या जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद व्हावे. आवेदनपत्र व वर्गणी केंद्रीय कार्यालयाकडे किंवा अधिकृत कार्यकर्त्याकडे जमा करावी व पावती घ्यावी ही विनंती.


श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ नागपूर

श्री शिवाजी ग्रंथालयाच्या इमारतीचा आराखडा

एकूण क्षेत्रफळ ६५३१ चौ.फू.



* सूची *

१ पुस्तक वितरण विभाग
२ नियतकालिक विभाग (४२ जागा)
३ त्वरित संदर्भ विभाग (२४ जागा)
४ ग्रंथ ठेवण्याची कपाटे (६०००० ग्रंथांची सोय)
५ अध्ययन कक्षा (८ खोल्या)
६ परिसंवाद कक्षा (१६ जागा)
७ ग्रंथपालाचे कार्यालय
८ नूतन ग्रंथ कक्षा
९ पुस्तक बांधणी विभाग
१० श्री शिवाजी महाराजांचा पुतळा



★

कै. सौ. अनसूयाबाई काळे

ज्यांच्या पवित्र देशसेवेच्या स्मृति-प्रित्यर्थ श्रीमंत पु. बा. काळे यांनी श्री शिवाजी ग्रंथालयासाठी २३,००० रुपयांची उदार देणगी दिली.

★

हे मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, यांनी वि. सा. संघाकरिता प्रदीप मुद्रणालय, धरमपेठ, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ याजकडून–

साधारण सभा–

वि. सा. संघाची साधारण सभा रविवार दि. ९-१०-६० रोजी दुपारी ४-३० वाजता श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली होऊन तीत पुढील कार्यवाही करण्यात आली.

१. १९५९-६० चा आयव्ययाचा ताळेबंद तक्ता मंजूर करण्यात आला.

२. वि. सा. संघाच्या घटनेतील कलम २, कलम ४ (आ), कलम १० (ऊ) व कलम १९ (अ) यामध्ये 'मध्यप्रदेश' शब्दाऐवजी 'विदर्भ' शब्द घालण्यात आला.

३. वि. सा. संघाच्या घटनेतील कलम १० (अ) मध्ये 'एप्रिल ३०' ऐवजी 'जुलै ३१' असे शब्द घालण्यात आले.

४. मिरज येथे तयार करण्यात आलेल्या मराठी साहित्य महामंडळाच्या आराखड्याला सर्वानुमते स्वीकृति देण्यात आली व महामंडळाच्या स्थापनेला मान्यता देण्यात आली.

केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा–

वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. ९-१०-६० रोजी सकाळी ८-३० वाजता संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली होऊन तीत पुढील प्रमाणे मुख्य कार्यवाही करण्यात आली.

१. सहामाही कार्यवृत्त व अर्थवृत्त स्वीकृत करण्यात आले.

२. विदर्भ साहित्य संघाचे वार्षिक अधिवेशन यंदा वणी येथे घेण्यास मान्यता देण्यात आली व संमेलनाध्यक्ष पदासाठी पुढील तीन नावे सुचविण्यात आली. १ कविभूषण प्रा. ब. ग. उर्फ अण्णासाहेब खापर्डे, २. प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, ३. श्री. कवि गु. ह. देशपांडे. वणी येथील स्वागत मंडळ यातून एकाची निवड करील.

३. महात्मा ज्योतिबा फुले यांचे तैलचित्राच्या देणगीचा स्वीकार करून ते संघमंदिरात लावण्यात यावे असे ठरले.

अनुक्रमणिका

श्रीशारदोत्सव–

दरवर्षीप्रमाणे यंदाहि दि. २७ आक्टोबर ते दि. ४ नोव्हेंबर पर्यंत शारदोत्सव साजरा झाला.

मंगळवार दि. २७-९-६० रोजी सायंकाळी ६ वाजता संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्ते पुस्तकरूपी शारदेचे पूजन झाल्यावर श्री. गाडगीळ शास्त्री यांनी सरस्वतीसूक्त म्हटले. त्यानंतर म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांनी विदर्भातील लेखकांच्या पुस्तकप्रदर्शनाचे उद्घाटन केले. नंतर डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली प्रा. श्री. भा. वर्णेकर यांचे "आधुनिक संस्कृत साहित्य" या विषयावर भाषण झाले.

बुधवार दि. २७-९-६० रोजी सायं. ६-३० वाजता श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली हिंदीचे श्रेष्ठ कादंबरीकार श्री. अ. गो. शेवडे यांचा पुष्पहार घालून आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे आणि पं. हृषीकेशजी शर्मा यांनी श्री. शेवडे यांच्या हिंदी साहित्यातील कार्याचा परिचय करून दिला. यानंतर आधुनिक 'हिंदी कादंबरी' या विषयावर श्री. अ. गो. शेवडे यांनी हिंदी भाषेतून सुश्राव्य व्याख्यान दिले.

शनिवार दि. १-१०-६० रोजी सायं. ६-३० वाजता श्री. पु. य. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली श्री. प्रा. व्ही. नागराजन् आणि मद्रासच्या "हिंदू" दैनिकाचे सहसंपादक श्री. व्ही. के. नरसिंहन् यांची 'तामीळ साहित्य' या विषयावर भाषणे झाली.

त्याच दिवशी रात्री ९ वाजता रविनगर येथील महिला कलाकारांनी वृंद-वादनाचा कार्यक्रम सादर केल्यावर सौ. विमलबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला कविसंमेलन झाले. या कार्यक्रमाचे संयोजन– सौ. उषाताई लिमये यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. या संमेलनात खालील कवयित्रींनी भाग घेतला–

सौ. विमलाबाई देशपांडे सौ. प्रमिला भागवत सौ. शांताबाई दंडिगे सौ. उषाताई लिमये, कु. दुर्गा कानगो, डॉ. पद्मावतीबाई थेरगावकर, सौ. तारा भिडे, सौ. अनुराधा परांडे आदि.

रविवार दि. २-१०-६० रोजी सायं. ६-३० वाजता "मराठी साहित्यातील नवप्रवाह" या विषयावर प्रा. भा. श्री. परांजपे आणि प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांची भाषणे झाली.

सोमवार दि. ३-१०-६० रोजी सायं. ६-३० वाजता प्रा. आर. सी. गुहा

यांचे श्री. शं. वा. शास्त्री याचे अध्यक्षतेखाली "बंगाली साहित्याची वाटचाल" या विषयावर इंग्रजी भाषेत सुश्राव्य व्याख्यान झाले.

मंगळवार दि. ४-१०-६० रोजी सायं. ६-३० वाजता प्रा. वा. कृ. चोरघडे यांचे अध्यक्षतेखाली श्री. मोहनलालजी भट्ट, मंत्री राष्ट्रभाषा प्रचार समिति वर्धा, यांचे 'आधुनिक गुजराती साहित्याची वाटचाल' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झाले.

रात्री ९ वाजता विविधभाषी कविसंमेलनाचा कार्यक्रम झाला. या कवि-संमेलनात श्री. श्रीकान्त देसाई, श्री. प्रभाकर उघडे, श्री. वामन पाठक आणि आणि प्रा. श्री. गो. काशीकर यांनी भाग घेतला.

कै. न्या. मू. म. गो. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा, विदर्भ विभाग—

मागील वर्षाप्रमाणे या वर्षी दि. १६, १७ आणि १८ सप्टेंबर १९६० रोजी विदर्भ साहित्य संघाचे वतीने विदर्भ विभागासाठी कै. न्या. मू. म. गो. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा आयोजित करण्यात आली. या वादस्पर्धेत एकूण १७ महाविद्यालयांनी आपले संघ पाठविले होते.

दि. १८-९-६० रोजी सायं. ७ वाजता स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. बक्षीस समारंभ श्री. बाळासाहेब ढवळे उपाध्यक्ष वि. सा. संघ यांचे हस्ते करण्यात आला. या स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेली फिरती 'रौप्यढाल' नागपूर महाविद्यालयाच्या श्री. मनोहर शेळके आणि कु. माया साठे या विद्यार्थ्यांनी मिळविली. वादस्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणारे श्री. बी. टी. देशमुख विदर्भ महाविद्यालय, अमरावती यांना १०० रु. चे बक्षिस देण्यात आले, व श्री. व्ही. डब्ल्यु. बापट, एस्. बी. सिटी कॉलेज, नागपूर यांचा दुसरा क्रमांक आल्याबद्दल रु. ७५ चे बक्षिस देण्यात आले.

या वादस्पर्धेचे वेळी तीनहि दिवस परीक्षक म्हणून श्री. मो. अ. बंबावाले, उपसंचालक शिक्षण विभाग नागपूर, सौ. सुशीलाबाई मोहनी आणि ॲडव्होकेट श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी काम केल्याबद्दल विदर्भ साहित्य संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे. नागपूर आकाशवाणीने दि. १८-९-६० रोजी रात्री ९ वाजता वादस्पर्धेचा अहवाल ध्वनिक्षेपित केला. याबद्दल विदर्भ साहित्य संघ नागपूर आकाशवाणीचा अत्यंत आभारी आहे.

सत्कार व भेटी–

दि. ४ सप्टेंबर १९६० रोजी दुपारी ४ वाजता केंद्रीय सरकारचे रेल्वे मंत्री माननीय श्री. बाबू जगजीवनरामजी यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी त्यांना संघमंदिर आणि धनवटे रंग मंदिर दाखविले. यानंतर पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. यावेळी अल्पोपहाराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उत्तरादाखल भाषण करतांना माननीय श्री. बाबू जगजीवनराम यांनी असे उद्गार काढले की, "साहित्यिकांनी बंधुत्व व मानवतावादाला प्रोत्साहन द्यावे आणि संतवाङ्मयाचे संशोधन करावे, असे मला वाटते. ज्ञानेश्वर व तुकाराम यांनी जो आध्यात्माचा ठेवा दिला आहे तो आपण चांगला जतन करून वाढीला लावला पाहिजे. हे कार्य विदर्भ साहित्य संघ करील अशी माझी अपेक्षा आहे." या कार्यक्रमाला वि. सा. संघाचे कार्यकारी सभासद आणि इतर निमंत्रित पाहुणे उपस्थित होते.

शनिवार दि. १७-९-६० रोजी वि. सा. संघाला सुप्रसिद्ध साहित्यिक आणि महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्री. ना. गो. चाफेकर यांनी भेट दिली. यावेळी संघमंदिर आणि रंगमंदिर पाहून त्यांनी संघाच्या कार्याविषयी समाधान व्यक्त केले. संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी त्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले.

बुधवार दि. २१-९-६० रोजी औरंगाबाद येथील सरकारी कॉलेजचे प्राचार्य डॉ. माधव गोपाळ देशमुख यांनी अनौपचारिकरीत्या विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. यावेळी चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी त्यांना रंगमंदिर दाखविले. रंगमंदिर पाहून 'सामान्य जनतेच्या पैशातून उभारले गेलेले हे रंगमंदिर भारतातील सर्व प्रथम होय' असे त्यांनी उद्गार काढले.

शनिवार दि. १ ऑक्टोबर ६० रोजी सायं. ६ वाजता 'हिंदु' (मद्रास) दैनिकाचे सहसंपादक श्री. व्ही. के. नरसिंहन् यांनी वि. सा. संघाला भेट दिली.

रविवार दि. ९-१०-६० रोजी यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ना. बा. पराडकर यांनी वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी रंगमंदिर पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले.

सुप्रसिद्ध कवि आणि वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. श्री. बा. रानडे यांनी दिनांक १३–१०–६० ला वि. सा. संघाला भेट दिली. संघमंदिर आणि रंगमंदिर पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले.

देणगी–

वि. सा. संघाच्या ग्रंथालयासाठी श्री. बाळासाहेब दवळे, उपाध्यक्ष वि. सा. संघ यांनी फिरती लाकडी आलमारी देणगी दिल्याबद्दल वि. सा. संघ त्यांचा आभारी आहे

वि. सा. संघातर्फे मदत–

टी. बी. आफ्टर केअर सेंटर, नागपूर या संस्थेच्या मदतीसाठी वि. सा. संघाने रु. ५० देणगी म्हणून दिले.

नवीन आजीव सभासद–

श्री. गोविंददास रतनलाल भाटीया, खामगाव, ५० रु.

शाखावृत्त

गोंडवण शाखा–चंद्रपूर (चांदा)

दि. २८ ऑगस्ट ६० रोजी गोंडवणशाखा चंद्रपूर येथील नवनिर्वाचित सदस्यांची बैठक शाखाध्यक्ष श्री. भ. सो. खणके यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सुरुवातीला वि. सा. संघाचे एक चिटणीस सा. भू. तु. ना. काटकर यांचे मार्गदर्शपर भाषण झाल्यावर गोंडवण शाखेचे खालीलप्रमाणे पदाधिकारी निवडण्यात आले.

उपाध्यक्ष– डॉ. तु. वि. पत्तीवार,

कोषाध्यक्ष– श्री. सो. ग. उपाख्य बाबासाहेब वारणे

सरचिटणीस– श्री. पु. ह. धनकर

सांकृतिक कार्यक्रम समितीचे आमंत्रक– श्री. व. मुं. मार्लीवार.

सदस्य– (१) श्री. व. सी. पतरंगे, (२) श्री. द. ब. झाडे.

दि. २० सप्टेंबर १९६० रोजी वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी गोंडवण शाखेला भेट दिली. या प्रसंगी "भारती" कार्यालयात आयोजित केलेल्या सभेत त्यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. याचवेळी सा. भू. तु. ना. काटकर यांचे अध्यक्षतेखाली विद्यार्थी समाजकल्याण केंद्राने प्रकाशित केलेले श्री. न. रा. निमजे लिखित 'पाटलांचा पोर' या नाटकाचे प्रकाशन श्री. ना. रा. शेंडे यांचे हस्ते करण्यात आले.

यवतमाळ शाखा–

वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री, ना. रा. शेंडे यांनी दि. ६-९-६० रोजी संघाच्या यवतमाळ शाखेला भेट दिली. त्याप्रसंगी शाखेचे अध्यक्ष डॉ. गो. बा. पंडित, उपाध्यक्ष श्री. शरच्चंद्र टोंगो, सरचिटणीस प्रा. राम डोके तसेच श्री. प्रताप वेहेरे, प्रा. पेशवे, श्री. शास्त्री आदि मंडळी उपस्थित होती. यावेळी श्री. ना. रा. शेंडे यांनी संस्थेच्या कामकाजासंबंधी चर्चा केली. यवतमाळसारख्या शहरात संस्थेचे एक कार्यालय व एखादे खुले रंगमंदिर अवश्य असावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

दि. ११-९-६० रोजी शाखेतर्फे साहित्यिकांच्या सहलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'खटेश्वर' या निसर्गरम्य स्थळी संघशाखेचे प्रायः सर्व सभासद व काही निमंत्रित मंडळी उपस्थित होती. यावेळी सिव्हिल जज्ज श्री. प्रताप वेहेरे व प्रा. राम डोके ह्यांनी करून दाखविलेले 'ब्लॅक मॅजिक' आणि कु. सुधा महाजन व प्रा. देशपांडे ह्यांनी गायिलेली भावगीते ह्यामुळे सहलीच्या कार्यक्रमात विशेष बहार आली.

सिव्हिल जज्ज श्री. प्रतापराव वेहेरे ह्यांना निरोप–

शाखेच्या कार्यकारिणीचे व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे उत्साही सदस्य सिव्हिल जज्ज श्री. प्रतापराव वेहेरे ह्यांची चांदूर येथे बदली झाल्यामुळे त्यांना निरोप देण्याचा समारंभ दि. २४-९-६० ला करण्यात आला.

वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यालयाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांची शाखेला भेट–

वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर ह्यांनी 'यवतमाळ शाखेला दि. २५-९-६० रोजी भेट दिली. ह्याप्रसंगी शाखाध्यक्ष डॉ. गो. बा. पंडित, प्रा. राम डोके, प्राचार्य ना. वा. पराडकर, श्री. टोंगो, प्रा. दीनानाथ पांडे आदि पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या कामकाजासंबंधी उद्बोधक चर्चा झाली.

शाखेने सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे येत्या जानेवारी महिन्यात मराठी नाट्यप्रयोग घेण्यासंबंधी निर्णय घेतला.

वणी शाखा–

वि. सा. संघाचे चिटणीस श्री. य. गो. मालोदे यांनी दि. २८ ऑगस्ट १९६० रोजी वणी शाखेला भेट दिली. यावेळी वणी शाखेतर्फे २३ वे वार्षिक साहित्य संमेलन घेण्याबाबत प्राथमिक विचार विनिमय करण्यात आला.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे आगामी अधिवेशन वणी येथे घेण्याचा विचार करण्यासाठी वणी शाखेचे सभासद आणि अन्य प्रतिष्ठित नागरिक यांची सभा दि. ४ सप्टेंबर १९६० रोजी सकाळी ९-३० वाजता श्रीकृष्ण भवनात भरली. ह्या सभेचे अध्यक्षस्थान श्री. धु. गो. उर्फ बाबासाहेब देशमुख यांनी मंडित केले होते. ह्या सभेसाठी वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर हेहि उपस्थित होते. यावेळी शाखेचे सरचिटणीस श्री. के. ना. काटपाताळ यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर प्रा. श्री. गो. काशीकर यांनी संमेलनाच्या स्वरूपाबाबत माहिती दिली. नंतर वणी येथे साहित्य संमेलन घेण्यात यावे, असा ठराव मांडण्यात आला व तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. संमेलनाची कार्यवाही करण्यासाठी ६० सभासदांची एक अस्थायी समिति स्थापन करण्यात आली असून संमेलन घेण्यासंबंधीचे विनंतीपत्र रीतसरपणे विदर्भ साहित्य संघाकडे पाठविण्यात आले आहे.

अमरावती शाखा–

मंगळवार दि. ११-१०-६० रोजी सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी अमरावती शाखेला भेट दिली व अमरावती शाखेचे कार्य वाढविण्याचे दृष्टीने कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे, शाखा सरचिटणीस प्रा. वैद्य व प्रा. कृ. व्यं. पेशकार आदि कार्यकर्त्यांशी चर्चा केली.

मलकापूर येथे शाखास्थापनेचे प्रयत्न–

मलकापूर येथे वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्याचे दृष्टीने सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी सोमवार दि, १०-१०-६० रोजी मलकापूरला भेट दिली; व त्या ठिकाणी डॉ. जोशी, श्री. शेंडे मुख्याध्यापक, श्री. संचीति, श्री. फडणीस, श्री. दामले, श्री. रानडे, श्री. टेंभुर्णे, श्री. उन्हेकर मुख्याध्यापक, श्री. बक्षी आदि प्रमुख नागरिकांशी चर्चा केली. रात्री ९ वाजता आदर्श महाविद्यालयांत प्रमुख नागरिकांची सभा घेण्यात आली व मलकापूर येथे वि. सा. संघाची शाखा स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

भंडारा शाखा–

शनिवार दि. १०-९-६० रोजी सौ. चारुमति भागवत यांचे भंडारा शाखेच्या विद्यमाने "स्त्री– जीवनाचा आदर्श" या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

भेट:– महाराष्ट्र राज्याचे शहर विकास मंत्री माननीय श्री. डी. झेड्. पळसपगार यांनी दि. ११-९-६० रोजी शाखेला भेट दिली.

★ ★ ★

वाङ्मय–वार्ता

– विदर्भातील ख्यातनाम महानुभावीय संशोधक डॉ. य. खु. देशपांडे यांनी लिहिलेले ' महानुभावीय मराठी वाङ्मय', श्री. वा. ना. देशपांडे यांनी संपादित केलेले ' स्मृतिस्थळ ' व डॉ. वि. भि. कोलते यांनी संपादिलेले ' श्रीगोविंदप्रभु-चरित्र '– या ग्रंथांचीं द्वितीयावृत्ति नुकतीच प्रकाशित झाली आहे.

– नागपूर येथील ' श्री विवेकसिंधु प्रकाशन समिती 'ने ' आद्यकवि मुकुंदराजकृत ' श्री विवेकसिंधु व श्रीपरमामृत ' हा ग्रंथ नुकताच प्रकाशित केला आहे. प्रस्तुन ग्रंथाचे संपादन श्री. रा. वि. बोबडे यांनी शके ११२२ च्या हस्तलिखितावरून केले असून प्रा. सुरेश म. डोळके यांनी त्याला संशोधनात्मक प्रस्तावना लिहिली आहे.

– स्वस्तिक मंडळातर्फे दि. १५-७-६० रोजी प्रा. या. मु. पाठक व दि. २१ १-६० रोजी प्रा. डॉ. मा. गो. देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. पाठक हे वरूड येथील महाविद्यालयाचे व प्रा. देशमुख हे औरंगाबाद येथील ज्ञानविज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य झाल्याबद्दल हे सत्कार करण्यात आले. दोनहि प्रसंगी प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. सुरेश म. डोळके, श्री. रा. पु. सगदेव, श्री. ज. रा. जोशी व श्री. बाबुराव कात्यायन यांची भाषणे झाली. प्रा. पंडित अध्यक्षस्थानी होते. स्वस्तिक मंडळ हे सांस्कृतिक कार्य करणारे नागपुरातील एक मित्र– मंडळ आहे.

– श्री. कृष्ण मुकुंद उजळंबकर यांनी लिहिलेल्या ' पराग ' या कादंबरीचा प्रकाशन समारंभ गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर पार पडला. या प्रसंगी प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. सुरेश म. डोळके, प्रा. श्री. मा. कुळकर्णी प्रभृति साहित्यिकांची भाषणे झाली. प्रस्तुत कादंवरी ' प्रभा प्रकाशन ' करिता श्री. के. मा. राजवैद्य यांनी प्रकाशित केली आहे.

– विदर्भ संशोधन मंडळातर्फे 'A Volume of Studies in Indology ' vol. I (डॉ. वा. वि. मिराशी), संशोधनांञ्जलि (दे. गो. लांडगे), विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह (य. खु. देशपांडे व दे. गो. लांडगे) व संशोधन मंडळ वार्षिक (इ. स. १९६०) या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ, कमिशनर डॉ. शेख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या प्रसंगी डॉ. वि. भि. कोलते, प्रा. सुरेश म. डोळके व प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांचीं ग्रंथांना अनुलक्षून भाषणे झाली.

अनुक्रमणिका

– नागपूर येथील श्री. ज. रा. जोशी यांनी लिहिलेल्या आणि नागपूर विद्यापीठाने सुवर्णपदक देऊन गौरविलेल्या डॉ. तु. ज. केदार यांच्या चरित्राच्या तूर्त २५ प्रती भारत सरकारच्या सांस्कृतिक समितीने भारताबाहेरील देशात वास्तव्य करून राहिलेल्या मराठी भाषी लोकांकरिता एक वाचनीय ग्रंथ म्हणून खरेदी केल्या आहेत. आणखीहि प्रती सदरहु समिति लौकरच खरेदी करणार आहे.

– प्रा. सुरेश म. डोळके यांनी संपादिलेले व प्रस्ताविलेले 'मराठी साहित्य दर्शन: माडखोलकर' व प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी संपादिलेले व प्रस्ताविलेले 'चिपळूणकर दर्शन' ही पुस्तके अनुक्रमे 'अनाथ विद्यार्थी गृह' व 'मॉडर्न बुक डेपो' या पुण्याच्या प्रकाशनसंस्थांनी प्रकाशित केली आहेत.

– विदर्भातील प्रसिद्ध कादंवरीकार श्री. पु. य. देशपांडे यांच्या 'सदापुली' या गाजलेल्या कादंवरीची दुसरी आवृत्ति 'देशमुख आणि कंपनी' या पुण्याच्या प्रकाशनसंस्थेने नुकतीच प्रकाशित केली आहे.

● ● ●

टीप:– 'वाङ्मय वार्ता' या नावाचे हे सदर या अंकापासून सुरू होत आहे. पुढील प्रत्येक अंकात हे सदर चालू राहील.

हे सदर सुरू करण्याचा हेतु हा की, विदर्भातील वाङ्मय विषयक हालचालींची नोंद नियमितपणे होत राहावी. विदर्भ साहित्य संघाशी संबंधित अशा वाङ्मय विषयक हालचालींची वार्ता 'संघवार्ता' या सदरात येतच असते. पण संघाशी प्रत्यक्षपणे संबंधित नसलेल्या हालचालीहि 'वाङ्मय वार्ता' या सदरात देऊन समग्र विदर्भातील वाङ्मय–विषयक माहिती 'युगवाणी'च्या वाचकांना होत राहावी व तिची नोंद करून दखल घेतली जावी, हे संघाचे व युगवाणीचे कर्तव्य आहे, असे आम्ही मानतो. तरी सर्वास अशी नम्र व कळकळीची विनंती आहे की त्यांनी हे सदर निर्दोष व परिपूर्ण व्हावे, यासाठी आम्हाला माहिती पुरवून सहकार्य द्यावे.– **संपादक**

★ ★ ★

अनुक्रमणिका

थेंब

चार उन्हाचे थेंब सोनेरी
कोवळिकेतून जिथें फुलतात
पटून जिव्हाळा जन्मांतरीचा
तिथे माझें प्राण हिल्लोलतात

पंख हवेचे कातर सुखाचे
तिथे अनावर झेपावतात
होऊन विन्मुख दृष्टिसन्मुख
तिथेच नेत्र हपापतात

ज्ञानाज्ञानाचे निखळून सांधे
स्पर्श उरात भरती अलोट
प्रचंड आवेग घेत पुनवेचा
समुद्रतरंग विस्तारतात

तिथेच माजते लाटाकाठाची
प्राणजाचक क्षितीजरेषा
अबोल गर्जत थिजल्या वाळूची
माझ्याच मनात फसती भाषा

क्षार क्षणांचे पाय रुपेरी
जिथे मनास हारवतात
लुटून उदार विदारकत्व
थेंब व्यथेचे मिरवतात

—रवीन्द्र बोरगावकर

अनुक्रमणिका

पालवी

गुणाकर देशपांडे

असा पेटला उन्हाळा
आग लागे अंतराळा
माझ्या प्राणांचा फुलोर
कसा निष्फळ वाळला
फुले पाहणारी दीठ
कोळजून अंधारली
गंध देणारी सारीच
अवघ्राणे हारपली
कशी मापावी आता मी
आकाशाची लांबी रुंदी
माझ्या भोवती अंड्याच्या
कवचाची तटबंदी.

गुहेमधील मानवा
गर्भाशयाचा अंधार
रंग उषेचे तांबडे.
लाल जळता अंगार.
तिथे गुहेत अनादि
सूर बोल अंकुरतो
आणि मानवाच्या पोटी
मर्त्य अमर जन्मतो.

तसे उगवेल कधी
ज्ञानबीज तुझ्या रूपे
आणि लागतील हातां
गूढांची अवघ्या मापे
विनाशाच्या कोलाहली
तेव्हा गवसेल सूर
वाळवंटी वाहणारी
सरस्वती सुप्त धार
ओघ तोच शमवील
तृषा युगांची मानवी
माझ्या प्राणांना फुटेल
पुन्हा कोवळी पालवी.

* * *

हवे ! हवे मज !!

यशवंत पारखी

सागरतळचा अनल हवा
सूर्यकरांतुन शीतलता अन्
अन् क्षितिजाचा मज वाक हवा
चंद्रकरांतुन हवी उष्णता
गगनाचा विस्तार हवा मज
काळामधला अंश लघुतम
धरतीचा मृद्‌गंध हवा
व्यापामधला व्याप हवा

गजराजाचा झोक हवा
इंद्रधनूच्या सूत्रांमधुनी
मज विश्वाचा अधिकार हवा
उडुंरत्नांची गुंफुनी माला
शेषाचे सिंहासन हिसकुन
गळ्यात घालुनि, करात एका
धरतीचा शिरी भार हवा
धूमकेतुचा गुच्छ हवा

अनुक्रमणिका

तरणीचा मज तोल हवा — श्याम रंगाचा अश्व हवा
अन् ध्वनी, तेजाचा वेग हवा — करि चपलेचा चाबूक हवा
स्वरामधला ताण हवा — मंजरिचा मकरंद हवा
अन् पाण्याचा अभिमान हवा — मज जगावेगळा छंद हवा

राज्य नको ऐश्वर्य नको मज
विश्वाचा अधिकार हवा
स्वप्नांचा अभास हवा
अन् धुंदीचा क्षणकाल हवा.

* * *

खंत

श्रीपाद गंगाधर कावळे

कल्पनांच्या पंखासवे
भरारते माझे मन
दिसू लागती मला
नवी क्षितिजे महान्—

माझ्या दृष्टीचे पारवे
स्वैर हिंडूनिया येती
भविष्याचे हितगूज
मला येउन सांगती—

युगे चालून आलेला
काळ टिपून घेतो
मागे टाकून काळाला
पुढें निघूनिया जातो—

एव्हढे असून आज
मला वाटे माझी खंत
माझ्या अश्रूमाजी दिसे
माझ्या व्यथा तरंगत


* * *

अनुक्रमणिका

★

डावीकडून-- प्रा. भा. ल. भांबूरकर, न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति, श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. पु. य. देशपांडे, श्री. य. गो. मालोदे, श्री. गो. स. देहाडराय, श्री. ना. रा. शेंडे, ना. बाबू जगजीवनरामजी आदि मंडळी.


★



वि. सा. संघास ना. बाबू जगजीवनरामजी रेल्वे मंत्री, यांनी दि. ४-९-६० रोजी भेट दिली त्यावेळी घेण्यात आलेले छायाचित्र.

अनुक्रमणिका

कै. न्या. रानडे वाद-स्पर्धेतील विजेते



विदर्भ साहित्य संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धेत नागपूर महाविद्यालयाने यावर्षी 'रौप्य ढाल' जिंकली. त्या महाविद्यालयातील श्री. मनोहर शेळके व कु. माया साठे यांना ती विजयाची ढाल बक्षीस देण्यात आली त्यावेळचे छायाचित्र.

हे मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, यांनी वि. सा. संघाकरिता प्रदीप मुद्रणालय, धरमपेठ, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका